६ सप्टेंबर १९६९ ४० पैसे

माणूस

## मनोऱ्यावरील एक....

माणसानं जावं कसं ! जसे रावसाहेब पटवर्धन गेले तसं !

वासांसी जीर्णानी ......

पण रावसाहेबांचं वासस्-वस्त्र जीर्ण झालेलं नव्हतं.

गेल्याच आठवड्यात आमची भेट झालेली होती. ' रावसाहेब आता वृद्ध दिसू लागले आहेत ' एवढेच मला त्यावेळी जाणवले. बाकी फुले, पुस्तके, माणसे याविषयीचे प्रेम जराही कमी झालेले दिसले नाही. समाजहितबुद्धीचा नंदादीप शांतपणे तेवत होता.

※

' चाफा छान घमघमतो आहे ' — मी सहज म्हणालो होतो.

' अहो ! हा गुलाब पहा नं ! ' आपल्या मुलाने परीक्षेत पहिला क्रमांक मिळवून एखादे बक्षिस पटकवल्यावर आईवडिलांच्या बोलण्यात जेवढे कौतुक ओसंडावे तसे रावसाहेबांचे शब्द होते.

※

' काही कामात असलात तर पुन्हा येईन. शेजारी आलो होतो. ते गृहस्थ भेटले नाहीत म्हणून म्हटल आपल्याकड थोडा वेळ बसावं ' मी दाराशी घोटाळतच विचारतो.

' अरे ! You need not be so apolegetic —इतकं संकोचायच कारणच नाही. या. या. ' हातातील पुस्तक खाली ठेवत रावसाहेब मला बसायला सांगतात.

बसता बसता मी पुस्तकावरचे नाव पहातो — **Crises of Indian Planning**

मी विषय काढतो ' Asian Drama 'चा. गुनार मिर्डाल यांच्या सध्या गाजत असलेल्या पुस्तकावर रावसाहेबांनी साधनेत नुकतेच विस्तृत लेखन केलेले होते. त्यांना हा ग्रंथ फारच आवडलेला होता. मी म्हटले : आपल्या परीक्षणात भूदान चळवळीचा मिर्डालने पुस्तकात उल्लेखदेखील करू नये याबद्दल सौम्य टीका आहे. वास्तविक ही टीका अधिक प्रखर असायला हवी होती.

मुखपृष्ठ २ वर...

.मुखपृष्ठ १ वरून

'अहो! अजूनही भूदान अंक—त्यांतील विशेषत: विनोबा, मी निष्ठेने (Religiously) वाचतो. पण मिर्डालवर प्रभाव पडावा असे नवनिर्माणाचे कार्य भूदानक्षेत्रात कुठेही दिसत नाही, तर त्याला तरी दोष किती द्यायचा!'

'पण पाश्चिमात्य धर्तीच्या औद्योगिकरणामुळे हिंदुस्थानसारख्या देशांचे प्रश्न सुटणार नाहीत. यामुळे विषमता वाढेल. Class war अपरिहार्य ठरेल' असे मतप्रतिपादन करणाऱ्या लेखकाने तात्त्विक पातळीवरूनही ग्रामोद्योगप्रधान अहिंसक क्रांतीच्या पर्यायी गांधी-विनोबा मार्गाची दखल घेऊ नये, हे जरा विचित्रच नाही कां?' मी.

'पुस्तक कितीही निर्मळ बुद्धीने लिहिले असले तरी ग्रंथकाराची अशी एक मर्यादा पडतेच. रसेलने अण्वस्त्रविरोधी आंदोलन केले. यासाठी अगदी म्हातारपण असतानाही त्याने तुरुंगवास पत्करला. हे सगळे तंत्र, त्यामागील विचार खरं म्हटलं तर गांधींचा. पण रसेलने आत्मचरित्रात हे ऋण कुठेही मान्य केलेलं नाही. गांधींचा त्यात साधा उल्लेख नाही.' रावसाहेब.

❋

मग आदल्या दिवशी रावसाहेबांकडे आलेल्या फ्रेंच पाहुण्यांचा विषय निघाला. 'फ्रेंड्स ऑफ फ्रान्स' या पुण्यातील संस्थेचे रावसाहेब अध्यक्ष असले तरी संस्थेचे आजवरचे सर्व काम दलरी—अच्युतराव आपटे यांनीच उभे केलेले आहे. पहिली एक-दोन वर्षे रावसाहेबांनी पाहुण्यांच्या आगतस्वागतात रस घेतला. पुढे हा सर्व प्रकार त्यांना एकतर्फी वाटू लागला. परदेशी चलनाच्या टंचाईमुळे आपल्याकडील मंडळींना तिकडे जाण्याची संधी मिळू शकत नव्हती. शिवाय येणाऱ्या पाहुण्यांना भाषेच्या अडचणीमुळे आणि फार वरच्या थरातील कुटुंबातच त्यांची सोय होऊ शकत असल्याने, आपल्याकडील समाजस्थितीचे वास्तव दर्शन महिन्याभरात घडू शकत असेल, याबद्दलही ते साशंक होते. यापेक्षा आशियाई-आफ्रिकन देशांशी संपर्क साधणारी एखादी नवी संस्था सुरू व्हावी असे त्यांना वाटत होते. अशा संस्थेची सुरुवात त्यांच्यामते पुण्यापासूनही होऊ शकत होती. पुण्यात आज आफ्रिकेतून, आशियातील आपल्याला शेजारी असणाऱ्या देशातून आलेले सुमारे पाचेकशे विद्यार्थी आहेत. त्यांना एकत्र आणावे, त्यांच्या अडीअडचणी समजवून घेऊन त्या दूर करण्याचा प्रयत्न करावा, त्यांच्यामार्फत त्यांच्या मायदेशाशी संबंध जोडावा, वकिलातींचे

मलपृष्ठ १ वर...

६ सप्टेंबर १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : नववे – अंक : चौदावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

किमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये

'माणूस'चा ३० ऑगस्ट १९६९ चा अंक वाचला. पुढील गोष्टी फार आवडल्या.

१. जयप्रकाश नारायणांचे पी. एल्. ४८० बाबतचे उद्गार.

२. श्री. ग. माजगांवकरांचा क्रांतिकारक निर्णय.

३. अनामिकांची दिल्ली दिनांक १९ ऑगस्टमधील 'कै. कॉंग्रेस !'


४. विष्णू गुंजाळांची 'चिठ्ठी'

५. 'झुंड'मधील ब्रि. दळवींचे पं. नेहरूंच्या चिन्यांना 'Throw out' करण्याच्या हुकूमावरील भाष्य.

६. पुरंदऱ्यांची 'परखड' आठवण !

ऑगस्ट, ३० — रा. शं. घोरपडे, पुणे

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २६ ऑगस्ट

### इंदिराजींचा अश्वमेध

काल संध्याकाळी दिल्लीश्वरीच्या अश्वमेध यज्ञाची सफळ सांगता झाली. सिंडिकेटच्या साम्राज्यात सर्वत्र दिमाखाने हिंडून इंदिराजींचा घोडा विजयी होऊन परतला. ज्या कांग्रेस कार्यकारिणीच्या गाजलेल्या बैठकीत इंदिराजींच्या विरुद्ध कडक कार्यवाही करण्याचा घाट घालण्यात आला होता त्या बैठकीत अप्पाजीच आरोपी ठरले — फक्त त्यांच्यावरचा आरोप सिद्ध झाला नाही इतकेच.

या उलटया गंगेचा भगीरथ म्हणजे आपले यशवंतराव. प्रस्तुत बैठकीचे भवितव्य मुख्यत: यशवंतराव काय पवित्रा घेतात यावर अवलंबून आहे याची दोन्ही गोटांना कल्पना होती. यशवंतराव सिंडिकेटचे सदस्य नाहीत, पण सिंडिकेटमध्ये घेण्याइतके मोठे आहेत, तेव्हा त्यांनी आपल्या बाजूने कौल दिला तर महाराष्ट्र आपल्याला मिळालाच हे सिंडिकेटने ओळखले होते. उलट यशवंतरावांनी ऐनवेळी एखादा समेटाचा मसुदा आपल्या गारुड्याच्या पोतडीतून बाहेर काढला तर सगळेच कारस्थान ओम्‌फस्‌ होणार हेही त्यांना माहीत होते. — अन्‌ नेमके तेच झाले. चव्हाणांनी इंदिराजींच्या विरुद्ध फासा टाकायला नकार दिला, व कालचा सबंध दिवस आपला समेट फॉर्म्युला दोन्ही गोटांच्या गळी उतरविण्यात खर्च केला. चव्हाणांच्या पहिल्या मसुद्यात झालेली दुफळी म्हणजे 'दुर्दैव' होय येवढेच म्हटले होते. मसुदा पाहून मोरारजी म्हणाले, "येवढ्याने काय होतय्‌? 'निषेध' पाहिजे." तिथून मसुदा इंदिराजींकडे गेला तेव्हा त्या साफ म्हणाल्या, "निषेध मला मान्य नाही," अखेर 'खेद' प्रकट करून पोखरलेल्या डोंगरांतून उंदीर काढण्यात आला.

सबंध काँग्रेसचे अठरा अक्षौहिणी सैन्य चवथ्या भारतीय युद्धासाठी सज्ज झाले असता अचानक हा तह कसा झाला? याचे अप्पा-पक्षीय कारण म्हणजे सिंडिकेटने चव्हाणांचा 'न धरी शस्त्र करी मी, गोष्टी सांगेन युक्तीच्या चार" हा निर्धार पाहिला तेव्हा आपला पराजय मनोमन ओळखला. उलट इंदिराजींच्या गोटात मनाच्या आंतल्या कुठल्या तरी कप्प्यांत इंदिरा — सरकार कोलमडून पडण्याच्या शक्यतेची धास्ती होतीच, अशा परिस्थितींत सरकार सावरण्यासाठी साम्यवाद्यांना

शरण जाण्याचा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर ओढवला असता.

पण ह्या युद्ध-विराम म्हणजे युद्धाचा अंत नव्हे हे दोन्ही गोटांना माहीत आहे. इंदिराजींनी "या आमच्या नेत्यांना बदल नको आहे," असा कोरडा ओढला आहे. तर मोरारजींनी समेटाच्या प्रस्तावाबद्दल स्पष्ट नापसंती व्यक्त केली आहे. कामराज तर म्हणाले, "आम्ही स्वतःची फसवणूक करून घेण्यात सफळ झालो आहोत." थोडक्यात म्हणजे सध्याच्या युद्धतहकुबीमुळे उभयपक्षांना जी उसंत मिळाली आहे तिचा उपयोग दोन्ही गोट आपापल्या तटबंदीची डागडुजी करण्यात खर्च करणार आहेत. पुढचा हल्ला कोणी व केव्हा करायचा येवढाच प्रश्न आहे.

अर्थात् कालचा सनसनाटी दिवस काही अचानक उगवला नाही. त्याच्याआधी आठवडाभर चुलीवर ठेवलेले आधण त्या दिवशी उतू गेले इतकेच. रेड्डींचा पराभव जाहीर झाल्यापासून निजलिंगप्पांनी पक्षशिस्तीचा ध्यास घेतला होता व शिस्तीचा चाबूक थेट प्रधानमंत्र्यांपासून सर्व बंडखोरांच्या पाठीवर उमटला पाहिजे असा हट्ट धरला होता; उलट राष्ट्रपती – निवडणुकीतील विजयश्री अक्षरशः 'पदरां'त पडल्याने बाई-पक्षीयांनी एकदम असा समजूतदारपणाचा आव आणला की झाले गेले विसरून जावे आणि कांग्रेसचे विभाजन थांबवावे. पण अप्पा विचारते झाले: "पक्षाच्या विरुद्ध मतदान करून एकतेवर स्वहस्ते कुठाराघात करणारी मंडळी कोठल्या तोंडाने एकतेच्या गोष्टी करीत आहेत?"

दरम्यान दोन्ही गोटांनी आपले सामर्थ्य दाखविण्यासाठी अटीतटीने प्रयत्न केले. इंदिराजींच्या चेल्यांनी दोन सभा घेऊन त्यांना गणित मांडून दाखविले की, कांग्रेसच्या एकूण ४३२ खासदारांपैकी सुमारे ३०० जणांचा बाईंना जाहीर पाठिंबा आहे–तस्मात् 'खबरदार!' उलट १३० खासदारांनी अप्पांकडे संघटित अर्ज केला की बाईंच्या विरुद्ध शिस्तभंगकारवाई झालीच पाहिजे. शिवाय चव्हाणांचे उच्चतम-स्तरीय समेटप्रयत्न एकीकडे चालू असताना दुसरीकडे इतर चिल्लर नेतेही आपापल्या कुवतीनुसार प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी निरनिराळे उपाय करीत अथवा सुचवीत होते. त्यांतले काही मार्ग गमतीदार होते. उदाहरणार्थ, काही कांग्रेसजन अनवाणी पदयात्रा करीत अप्पा व इंदिराजी दोघांच्याही घरी गेले व त्यांना एकतेच्या अर्ज-विनंत्या करते झाले. कांग्रेस एकीसाठी अक्षरशः अश्रू ढाळणाऱ्या तारकेश्वरी सिन्हांनी इंदिराजींना पत्र पाठवून म्हटले, "गादी सोडा." उलट काही मंडळी निजलिंगप्पांना म्हणाली, "गादी सोडा." याच्याही पुढे जाऊन कोणी तरी म्हटले, "दोघेही गादीवरून खाली उतरा पाहू!" पण दोघेही तत्त्वाला चिकटून राहण्याच्या निमित्ताने गादीला चिकाटीने चिकटून राहिले.

## विरोधकांची विविध-वाक्यता

या सर्व गोंधळात आपापली भर टाकण्याचे महत्कार्य सर्व विरोधी पक्ष हिरीरीने करीत आहेत. प्रथम एक सनसनाटी बातमी राजधानीत पसरली, व की

म्हणजे मार्क्सवादी साम्यवाद्यांनी इंदिराजींना आपला पाठिंबा जाहीर केला इतकेच नव्हे तर त्यांचे अध्वर्यु प्रमोद दासगुप्ता यांनी दिल्लीच्या वास्तव्यात असेही म्हटले की कॉंग्रेसमधील प्रागतिकांना इतर प्रगतिशील (म्हणजे आपल्यासारख्या) पक्षांच्या सहकार्याने नवीन सरकार बनवायचे असेल तर अशा सरकारांत सामील होण्याच्या प्रश्नावरही आपण योग्य वेळी विचार करू ! इंदिराजी डाव्या आहेत हे जगजाहीर असले तरी त्या डाव्यांतही डाव्या आहेत ही कल्पना जरा धक्का देणारीच होती. – पण हाय, दुसऱ्या दिवशी दासगुप्तांनी आपण असे काही म्हटल्याचा इन्कार केला.

संयुक्त समाजवादी मंडळी तर कुठल्यातरी सबबीवर विभक्त होण्याची वाटच पाहत असतात. त्यांना इंदिरा-प्रकरण चांगलेच हाताशी मिळाले. एकीकडे राजनारायण पत्रकावर पत्रके काढीत होते आणि "इंदिराजी, राजीनामा द्या." असा जल्लोष करीत होते तर दुसरीकडे मधू लिमयांनी जाब विचारला की आपण पक्षाच्या स्टॅंडिंग कमिटीचे नियंत्रक असता आपल्याला न विचारता ही पत्रके का काढण्यात आली ? मात्र लिमयांनी स्वतःही या प्रकरणावर एक पत्रक काढले आहे व त्यात दुहेरी आवाहन केले आहे – सिंडिकेटला अनुशासनाची खरोखरीच चाड असेल तर तिने इंदिराजींना पक्षात ठेवू नये, – अन् इंदिराजींना राजकीय नितिमत्तेची चाड असेल तर त्यांनी इतःपर कॉंग्रेसमध्ये राहू नये. कॉंग्रेसमधली ही डावी–उजवी फूट पाहता संसोपाने आपले परंपरागत कॉंग्रेसविरोधी धोरण पुढे चालू ठेवावे की नाही हा यक्षप्रश्न संसोपीय नेत्यांच्या पुढे सध्या उभा आहे. राजनारायण आदि मंडळींच्या मते या धोरणाचा अखेरपर्यंत पाठपुरावा केला पाहिजे, तर इतर काही नेत्यांच्या मते इंदिराजींचे हात बळकट करून समाजवादाचा विकास साधला पाहिजे व त्याचबरोबर त्यांना साम्यवादी मगरमिठीतून वाचविले पाहिजे. मात्र कॉंग्रेसबरोबर 'संयुक्त आघाडी' उघडण्याची भाषा अकाली आहे अशी लिमयांनी एका पत्रकार-परिषदेत ग्यानबाची मेख पाहून ठेवली आहे.

जनसंघाचे अध्यक्ष अटलबिहारी वाजपेयी यांनीही अर्थात् पत्रक काढले आहेच. त्यांच्या भूमिकेचा आशय असा की इंदिराजींनी रेड्डी-प्रकरणी एकदम मोहरा बदलला तो निजलिंगप्पांनी जनसंघाशी बोलणी केल्यानंतर; तेव्हा इंदिराजींचे खरे भांडण सिंडिकेटशी नसून जनसंघाशी आहे. इंदिराजींना प्रधानमंत्री-पदावरून काढून टाकण्यात आले तर आपल्याला आनंद होईल असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले, पण त्याचबरोबर इंदिराजींच्या धैर्याचे आपल्याला कौतुक वाटते असेही उद्‌गार काढले. कॉंग्रेसमधले हे अंतर्गत भांडण कितीही विकोपाचे वाटले तरी तडजोड होईल असेही त्यांनी भाकीत केले ते खरे ठरले आहे.

उलट स्वतंत्र नेते मिनू मसानी यांनी सदोबांच्या पावलावर पाऊल ठेवून येथल्या रोटरी क्लबमध्ये या विषयावर भाषण केले व एकूण कॉंग्रेसवरच झोड उठविली.

इंदिराजींनी बंडाचे निशाण उभारल्यापासून कालपर्यंत घडलेल्या घटनांवर राजधानीतल्या विविध रंगांच्या राजकीय नेत्यांनी प्रकट केलेली ही बहुरूपी प्रतिक्रिया. पण सामान्य दिल्लीकराला काय वाटते? तो निर्विवाद इंदिराजींच्या बाजूचा आहे. "मी गरीबांच्या बाजूची आहे." या बाईंच्या साध्या शब्दांनी सर्व अजाण गरीब जनता त्यांच्या बाजूला आकृष्ट आहे. या घोषणेच्या मागची कार्य-कारण मीमांसा करण्याची किंवा पुढचा अन्वयार्थ लावायची बौद्धिक कुवत या वर्गाच्या अंगी नाही. अन् जे थोडेसे वरच्या वर्गाचे व थोडेसे सुजाण आहेत त्यांची प्रतिक्रिया? उत्तर म्हणून एकाने गालीबचा शेर म्हणून दाखविला :

"सुना था गालिबके उडेंगे पुर्जे
हम भी देखने गये तो तमाशा न हुआ."


— अनामिक


प्रखर देशभक्ती
सूत्रबद्ध संघटना
अमोघ वक्तृत्व
देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच
परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड
हे सर्व हिटलरपाशी होते.
तरी अखेर
त्याचा पराभव का झाला?

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये.



# राष्ट्रपतींची निवडणूक

धा. वा. रानडे

भारतातील राष्ट्रपती निवडणुकीच्या इतिहासात या वेळची निवडणूक अत्यंत अटीतटीची, चुरशीची, शेवटपर्यंत उत्सुकता वाढविणारी व नाटयपूर्ण झाली. सत्तारूढ कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा चौदा हजार मतांनी पराभव करून कम्युनिस्ट व डाव्या गटांनी पाठिंबा दिलेले अपक्ष उमेदवार वराहगिरी व्यंकट गिरी हे निवडून आले. रविवार ता. २४ ऑगस्टला त्यांचा अधिकार-ग्रहण समारंभही झाला. निवडणूक विशेष गाजली, ती कांग्रेस पक्षातील फुटीमुळे ! केवळ कॉंग्रेस संघटनेवरच नव्हे तर देशाच्या भावी राजकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होणार, असे दिसू लागले; पण वर्किंग कमिटीच्या निर्णयाने फूट सध्या तरी टळली आहे !

राष्ट्रपतींची ही पाचवी निवडणूक. या निवडणुकीत संसदेचे लोकनियुक्त सभासद व विधानसभांचे लोकनियुक्त सभासद यांनाच फक्त मतदानाचा हक्क

असतो. एकूण मतदार जवळजवळ चार हजार. मतदारसंघ मर्यादित असल्याने व निकाल उघड असल्याने पहिल्या तीन निवडणुका गाजल्याच नाहीत. देशात काँग्रेस हाच सर्वांत मोठा प्रबळ पक्ष असल्याने काँग्रेस उमेदवारच निवडून येणार, हे उघड होते. पहिल्या तीन निवडणुकींत विजयी उमेदवार व त्या खालोखाल मते मिळविणारा उमेदवार यांना शेकडा मते पुढीलप्रमाणे होती :

| | |
|---|---|
| १९५२ | |
| डॉ. राजेंद्र प्रसाद | ८३·८२ |
| के. टी. शहा | १५·३३ |
| १९५७ | |
| डॉ. राजेंद्र प्रसाद | ९९·२५ |
| नगेंद्र नारायणदास | ०·४३ |
| १९६२ | |
| डॉ. राधाकृष्णन | ९८·२४ |
| चौधरी हरिराम | १·१३ |

## राज्यसभेच्या मतांचे महत्त्व

चौथ्या निवडणुकीपासून मात्र चित्र पालटायला सुरुवात झाली. चौथ्या म्हणजे १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने आठ राज्यांत सत्ता गमावली. संसदेत बहुमत टिकले खरे, पण ते खूपच रोडावले. त्याचा परिणाम राष्ट्रपतींच्या निवडणुकीवरही झाला. आपण एकजुटीने उमेदवार उभा केला तर विरोधी पक्षांना निवडणूक जिकण्याची शक्यता प्रथमच वाटू लागली. डॉ. झाकीर हुसेन यांच्याविरुद्ध त्यांनी सुप्रीम कोर्टाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती के. सुब्बाराव यांना उभे केले. श्री. सुब्बाराव यांच्यापेक्षा १,०७,२७३ मते अधिक मिळवून डॉ. झाकीर हुसेन हे निवडून आले. डॉ. हुसेन यांचा विजय मुख्यत: दोन कारणांमुळे झाला. एक : प्रत्यक्ष मतदानात विरोधी पक्षांची एकजूट टिकली नाही. दोन : राज्यसभेतील मोठ्या काँग्रेस बहुमताचा फायदा डॉ. हुसेन यांना मिळाला. त्या वेळी राज्यसभेच्या एकूण २२८ सभासदांत काँग्रेसचे १६५ व इतर ६३ होते. प्रत्येक सभासदाला ५७६ मते या हिशेबाने नुसत्या राज्यसभेच्या काँग्रेस सभासदांचीच ९५,०४० मते डॉ. हुसेन यांना मिळाली. त्यांना मिळालेल्या १,०७,२७३ मतांच्या आघाडीत सर्वांत मोठा वाटा या ९५,०४० मतांचा होता. राज्यसभेचे सभासद लोकसभेप्रमाणे सार्वत्रिक प्रौढ मतदानाने निवडलेले नसून त्यांची निवड विधानसभांचे सभासद करतात. तसेच दर दोन वर्षांनी त्यांपैकी फक्त एक तृतीयांश सभासद निवडले जातात. दोन तृतीयांश सभासद पूर्वीचे असतात. देशातील बदललेल्या लोकमताचे ते प्रतिनिधी नसतात. १९६७ साली हे प्रकर्षाने दिसून आले. नव्या लोकसभेत काँग्रेसचे २८६ व विरोधी पक्षांचे २३४ सभासद निवडून आले; म्हणजे काँग्रेसला फक्त ५२ सभा-

सदांचे बहुमत मिळाले. याच वेळी राज्यसभेत मात्र कॉंग्रेसचे पक्षबळ १६५ व विरोधकांचे ६३ म्हणजे कॉंग्रेसला तेथे १०२ सभासदांचे बहुमत होते. चौथ्या निवडणुकीतून व्यक्त झालेल्या लोकमताशी राज्यसभेतील हे प्रतिनिधित्व विसंगत होते. खऱ्या लोकशाहीच्या दृष्टीने राज्यसभा सभासदांना राष्ट्रपती निवडणुकीत मतदानाचा हक्क असणे योग्य नाही. त्यांना हा हक्क द्यावयाचाच असेल तर त्यांची निवड लोकसभा सभासदांप्रमाणे झाली पाहिजे.

## कॉंग्रेस पक्षातील फूट

या वेळची राष्ट्रपती निवडणूक विशेष गाजली, ती मुख्यतः कॉंग्रेसमधील फुटीमुळे. वास्तविक एकूण मतांमध्ये कॉंग्रेसपक्षाची मते ५२½ टक्के होती. ती सर्व कॉंग्रेस उमेदवारांस मिळाली असती, तर संजीव रेड्डी दुसऱ्या कोणत्याही पक्षाच्या पाठिंब्याशिवाय निश्चित निवडून आले असते. एकूण ८,६१,६९५ मतांपैकी कॉंग्रेस सभासदांची मते ४,५२,१४७ होती; पण प्रत्यक्षात रेड्डींना पहिल्या पसंतीची ३,१३,५४८ मते मिळाली म्हणजे १,३८,५९९ मते कमी मिळाली. रेड्डींना केवळ कॉंग्रेसची मते प्रत्यक्षात यापेक्षाही कमी पडली असावीत; कारण जनसंघाच्या काही सभासदांनी आपली पहिल्या पसंतीची मते पक्षाच्या निर्णयाप्रमाणे चिंतामण-राव देशमुखांना न देता रेड्डींना दिली. स्वतंत्र पक्ष व जनसंघाचा पाठिंबा देश-मुखांना होता. या दोन पक्षांची एकूण मते १,४४,२५५ होती, पण देशमुखांना प्रत्यक्षात १,१२,७६९ मते पडली. जनसंघाची पहिल्या पसंतीची काही मते रेड्डींना मिळाली हे यावरून उघड होते.

मतदानाच्या आकड्यांवरून विधानसभांपेक्षा संसदेचे कॉंग्रेस खासदार अधिक प्रमाणांत फुटले असे दिसते. संसदेत कॉंग्रेसचे ४३२ सभासद आहेत. त्यांपैकी फक्त २६८ सभासदांनी रेड्डींना मते दिली. म्हणजे १६४ (३८ टक्के) सभासद फुटले. विधानसभांमध्ये कॉंग्रेसचे एकूण १,६०२ सभासद आहेत. त्यांपैकी ३८४ म्हणजे २४ टक्के सभासदांनी रेड्डींना मते दिली नाहीत. राज्यपातळीवर सर्वांत जास्त फूट आंध्र व उत्तर प्रदेशात पडली. आंध्रप्रदेशात १९६ कॉंग्रेस सभासदांपैकी ११८ सभासदांनी व उत्तर प्रदेशात २१६ पैकी १३८ जणांनी रेड्डींना मते दिली. उत्तर प्रदेशातील फूट प्रत्यक्षात यापेक्षा जास्त आहे. कारण रेड्डींना मिळालेली १३८ सभा-सदांची मते ही केवळ कॉंग्रेसची नसून त्यांत ९८ कॉंग्रेस, २० जनसंघ, ४ संयुक्त समाजवादी, १ स्वतंत्र पक्ष, ९ भारतीय क्रांतिदल व ६ अपक्ष अशी विभागणी अस-ल्याचे माहीतगार गोटातून सांगण्यात येते. याचा अर्थ प्रत्यक्षात ११९ कॉंग्रेस सभा-सदांची मते गिरींना मिळाली असावीत; म्हणजे ५५ टक्के कॉंग्रेस सभासद फुटले.

मतदानाच्या आकड्यांवरून मध्यप्रदेशात ६३ कॉंग्रेस सभासदांची मते फुटल्याचे दिसत असले तरी गिरींना मिळालेल्या मतांचा हिशेब करता प्रत्यक्षात ७८ सभासद फुटल्याचे उघड होते. गिरींना १०३ सभासदांची मते मिळाली. संयुक्त समाजवादी

८, प्रसप ३, उजवे कम्युनिस्ट १ आणि पुरोगामी विधायक दल १२ अशा २५ सभासदांचा त्यांना हुकमी पाठिंबा होता. राहिलेल्या ७८ सभासदांची मते अर्थातच काँग्रेस सभासदांची होती व ती मिश्रा गटाची होती. एकूण १७३ काँग्रेस सभासदांपैकी ७८ म्हणजे ४५ टक्के सभासद फुटले.

काश्मीरमध्ये काँग्रेसचे पक्षबळ ६१ असता रेड्डींना ८ च सभासदांची मते मिळाली. याचा अर्थ ५३ सभासदांची मते फुटली, असा नाही. रेड्डींना मिळालेली ८ मते नॅशनल कॉन्फरन्सची आहेत. काँग्रेसची सर्व ६१ मते गिरींना मिळाली.

काँग्रेसमध्ये निम्म्याच्यावर फूट पश्चिम बंगाल व ओरिसामध्ये पडली. पश्चिम बंगाल विधानसभेत काँग्रेसचे ५५ आमदार आहेत; पण रेड्डींना फक्त २५ जणांची मते मिळाली. ओरिसामध्ये काँग्रेसचे पक्षबळ ३१ असता रेड्डींना फक्त १५ जणांची मते पडली. पंजाबमध्येही असेच घडले. तेथे काँग्रेस सभासद ३३ असता रेड्डींना फक्त १० जणांची मते मिळाली.

हरियानातील मतदानाच्या आकड्यांवरून काँग्रेसची ११ च मते फुटली, असे दिसत असले तरी प्रत्यक्षात फूट मोठी आहे. तेथे काँग्रेसचे पक्षबळ ४३ असता रेड्डींना ३२ सभासदांची मते मिळाली. पण यात केवळ काँग्रेसची मते बारापेक्षा अधिक नसून बाकी विशाल हरियाना पक्ष व इतर पक्षांची आहेत.

इतर राज्यांमध्ये फारशी फूट पडलेली नाही. गुजरात; महाराष्ट्र व म्हैसूर हे काँग्रेसपक्ष एकजुटीने रेड्डींमागे उभे राहिले. रेड्डींना काँग्रेसच्या सभासदसंख्येपेक्षा जास्त मते गुजरात, नागालँड, तामिळनाडू व केरळ या राज्यांत मिळाली. गुजरातमध्ये काँग्रेसचे पक्षबळ १००, पण मते मिळाली १०२ सभासदांची. नागालँडमध्ये काँग्रेस पक्षच नाही, पण तेथे अडतीसपैकी चार सभासदांनी रेड्डींना मते दिली. १९६७ च्या निवडणुकीत नागालँडची सर्व मते डॉ. झाकीर हुसेन यांना मिळाली होती. तामिळनाडूमध्ये काँग्रेसचे सभासद ४९ असता ५४ व केरळमध्ये काँग्रेसचे पक्षबळ ९ असता रेड्डींना १५ मते मिळाली. पण फुटलेल्या मतांच्या तुलनेने ही जास्त पडलेली मते फारच थोडी आहेत.

## भाक्रांद–जनसंघ धोरण

मतदानाच्या आकड्यांवरून रेड्डींना काँग्रेसच्या सभासदसंख्येनुसार होणाऱ्या मतांपेक्षा १,४०,५७५ मते कमी पडल्याचे दिसते, पण प्रत्यक्षात खरी फूट कशी जास्त आहे हे आपण पाहिलेच. प्रत्यक्षात फुटलेल्या मतांचा हिशेब केला तर काँग्रेसची १,६४,२१४ मते फुटली असे दिसून येईल. गुप्तमतदान पद्धतीत वास्तविक कोणाला मत दिले हे कळणारच नाही; पण जास्तीत जास्त विश्वसनीय अंदाज आहे.

पहिल्या पसंतीच्या मतांच्या मोजणीत गिरींना ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळू न शकल्याने दुसऱ्या पसंतीची मते मोजावी लागली. पहिल्या पसंतीच्या मतांच्या

[ पृष्ठ ५७ वर ]

# हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन आर्मी

शहर पुणे. पेठ अर्थातच सदाशिव ! केसकर विठोबा नजीकची खोली. १४ वर्षांचा एक मुलगा आंगठे धरून उभा होता. पाठीवर त्याची पाटी-पेन्सील, वह्या अन् पुस्तकांची पिशवी ठेवलेली, फक्त इंग्रजीचे पुस्तक त्यात नव्हते. ते त्याच्या पुढ्यात होते. ओणवे होऊन डोळ्यातील अश्रुधारा सावरीत तो खाली ठेवलेल्या पुस्तकातील धडा वाचीत होता.

इंग्रजी भाषेचा त्याला मनस्वी संताप. एकूणच इंग्रजांचे सर्व त्याला नापसंत. संस्कृतची त्याला गोडी. पण नूतन मराठी

# शहादत के बेताब आशिक

विद्यालयात त्याला इंग्रजी शिकावेच लागे. १४ नोव्हेंबर १९२१ ला नू. म. वि. तर्फे त्याच्या पालकांना आलेल्या पत्रात गणितात १०० पैकी ५० पण इंग्रजीत १०० पैकी १३ गुण असल्याचा शेरा होता. म्हणजे विद्यार्थी मठ्ठ नव्हता, पण इंग्रजीची आफत त्याला खटकत होती. परकीयांची भाषा सक्तीने शिकणे त्याच्या जिवावर आले होते.

आज स्वतंत्र भारतात तो तापट, हेकट मुलगा असता तर 'कॉन्व्हेंट कल्चर'च्या इंग्रजीचे हेल काढून हाल करणाऱ्या पोरांच्या तोंडात मारता मारताच त्याचा जन्म संपला असता. इतका सच्चा भारतीय ओणवे होऊन एक इंग्रजी धडा वाचायची भयानक शिक्षा भोगीत होता. शिक्षा दिली होती सख्ख्या वडील बंधूंनी, आपल्या नवविवाहित वधूसमोर ! नवी वहिनी घरात आली अन् तिच्या पुढ्यात झालेला हा अपमान त्याला कसा सहन होईल ? कसाबसा धडा संपवून तो उभा राहिला, अंगावरचा कोट अन् चेंडू कोपऱ्यात भिरकावला अन घराबाहेर पडला. त्याच्या आईने रॉकेलसाठी ९ पैसे व मोठी बहीण बारूताई हिने अंजिरासाठी २ पैसे त्याला दिले होते. हे अकरा पैसे घेऊन तो बाहेर पडला. इंग्रज, इंग्रजी, ह्या शब्दांच्या

लेखांक । दोन

वसंत पोतदार



# शिवराम हरी राजगुरू

स्मृतींनी कासावीस होत होत मंडईऐवजी पोराने खेडची वाट धरली. १९२३ साल होते ते. ज्येष्ठ वद्य चतुर्दशीचा दिवस. सायंकाळी ५ वाजता मूल जे घराबाहेर पडले ते ८ वर्षांनी भारतमातेच्या कुशीत जाऊनच विसावले. विस्मृतीच्या जात्यात तुम्ही आम्ही मराठी माणसांनी भरडलेले असे हे मूल. महाकाव्याची कथावस्तू व्हावी असा याचा पराक्रम, पण आम्ही त्याची एक साधी वास्तू ह्या पुण्यात, ह्या महाराष्ट्रात उभारू शकलो नाही. हे मूल म्हणजेच शिवराम हरी राजगुरू ! भगतसिंग व सुखदेव ह्यांच्याबरोबर लाहोरात फासाच्या दोरखंडाच्या झोपाळ्यावर मान अडकवून एकाच झोक्यात हौतात्म्याची अमर सफर अनुभवणारा महान तेजस्वी, तापट, तरुण म्हणजेच शिवराम हरी राजगुरू !

घराबाहेर पडलेल्या शिवरामने पुणे स्टेशनात रात्र काढली. सकाळी त्याने पायी प्रवास सुरू केला. वयाच्या १५ व्या वर्षी तो जी तंगडतोड करीत होता त्यात हिरावलेली मातृभूमी परत मिळविण्याची सुप्त जिद्द दडलेली होती.

सकाळी खडकीला अर्ध्या आण्याचे फुटाणे, नंतर इंद्रायणीला १-२ आंबे ह्या पदार्थांवर सायंकाळी ७ वाजता शिवरामने खेड गाठले. अमावस्येची काळीकुट्ट रात्र गावाबाहेरील देवळात काढून सकाळी वतनाचे गाव 'भावडी'चा रस्ता त्याने स्वीकारला. नारायणगाव, बोटेगाव, नांदूर, दोडी पायांखाली घालून शिवराम नाशकात आला. पैसे कधीच संपले होते. पालापाचोळा, वाटेतील गावांत भेटलेल्या ग्रामस्थांनी दिलेला शिधा व ताजे पाणी, इतकेच नव्हे तर एके ठिकाणी 'उतरून'

टाकलेला दही भात अन् मडक्यातले पाणी पीऊन जीव जगवीत, रात्र जागवीत शिवराम नाशकात येऊन पोहोचला. काशीला जाऊन संस्कृत शिकण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'सशस्त्र क्रांती करीता करीताच मरेन' अशी शपथ घेतलेल्या नाशकात हे नासमज पोर जरी संस्कृत विद्याभ्यासाचा निश्चय करीत होते तरी त्या वातावरणात क्रांतीचा विद्युत प्रवाह वाहत असल्याने शिवरामने काशीत जाऊन केलं ते वेगळेच. संस्कृत शिकण्याऐवजी भारतीय संस्कृती राखण्याच्या पुरुषार्थाचेच धडे त्याला काशीला मिळाले.

शिवरामचे काशीतले पहिले वहिले दिवस संस्कृत घोकंपट्टीत गेले. घरी–पुण्यात–हवालदील झालेली आई, अश्रू ढाळणाऱ्या बहिणी व पस्तावलेला मोठा भाऊ ह्यांना काशीतून लिहिलेल्या पहिल्या लांबलचक पत्रातील रोजचे वेळापत्रक वाचनीय आहे. वाचनीय ह्याकरिता की थोड्याच कालावधीनंतरचे दैनंदिन जीवन ह्या वेळापत्रकाहून फार फार भिन्न आहे.

शिवराम ऊर्फ बापू लिहितो,

"येथे दिवस पाच वाजता उगवतो. त्यामुळे मी ५ वाजता उठतो. शौचमुखमार्जन आटोपल्यावर गंगातीरी स्नानास जातो. साडेसहा वाजेपर्यंत घरी आल्यावर ७ वाजता शाळेत जातो. १० वाजता परत आल्यावर मधुकरी मागून जेवणउष्टें करून १२॥ वाजता गुरुजींच्या घरी जाऊन संथा घोकत बसतो. तेथून २-२॥ वाजता घरी येतो व पुन्हा ३ वाजता शाळेत जातो. शाळेतून सहा वाजता घरी आल्यावर इकडे तिकडे हिंडतो. ७-७॥ वाजता अन्नछत्रात जेवावयास जातो. रात्री १॥ वाजता परत आल्यावर झोपतो. मी येथे संहिता, अष्टाध्यायी यांची संथा घेतली आहे. मला येथे नेसण्याची व पैशाची फार अडचण आहे."

बापू काशीत रमला! लोकमान्य टिळक वाचनालयात त्याला मराठी ग्रंथ मिळत होते, महाराष्ट्र विद्यार्थी मंडळात वादविवाद, व्याख्याने, चर्चा त्याच्या कानी पडत होत्या आणि 'भारतसेवा मंडळ' ह्या व्यायामशाळेत लाठी, काठी, दांडपट्टा यांचे शिक्षण मिळत होते. बापूला ह्यापेक्षा इतर काय हवं होतं? पण देशाला राजगुरू हवा होता.

त्या काळी कलकत्ता, पटणा, बनारस, कानपूर, लखनौ, झाशी, मेरठ, दिल्ली, लाहोर ही गावे क्रांतिकारकांची माहेरघरे होती. क्रांतिकारकांची जाळी जरी इतक्या गावांत पसरली होती तरी पं. मदनमोहन मालवीयजींचे हिंदू विद्यापीठ, काशी हेच साऱ्यांचे आश्रयस्थान होते, गुप्तकेन्द्र होते.

मध्यंतरात बापूने अमरावतीच्या हनुमान आखाड्यात व्यायामविशारदाची पदवी मिळविली व हुबळीला डॉक्टर हर्डीकरांकडे सेवादलाचे शिक्षणही संपादिले. हाडापेराने मजबूत, स्वसंरक्षणास सिद्ध, ध्येयाची जिद्द अन दिलेल्या शब्दाला प्राणपणाने जागणारा देशभक्त तरुण शेवटी आपल्या अचूक जीवनप्रवाहाला जाऊन

मिळाला. काशीतच चन्द्रशखर आझादांशी त्याचा परिचय झाला व आझादांनी राजगुरूला पार्टीत घेतले. 'आपणांसारिखे करीती तात्काळ' असे आझाद अन् 'दुजासारीखे होती तात्काळ' असे राजगुरू एकत्र आले अन त्यांचे ३६ गुण जमले. इंग्रज सरकारशी छत्तीसाचा आकडा, हेच ह्या गुणांचे तात्पर्य होते.

हिन्दुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीचे सर्वांत उत्साही जवान म्हणजे राजगुरू. भगतसिंग, सुखदेव, सिन्हा, माहोर, वैशंपायन, आझाद ह्यांच्यासाठी त्याचा ओसंडणारा उत्साह म्हणजे डोकेदुखी होती. दिसायला कुरूप, चालायला बेढब, हिंदी भाषेचे अगाध अज्ञान, हळुवार भावनेशी, रसिकतेशी, काव्य, प्रेम इत्यादींशी प्रामाणिक शत्रुत्व असलेला राजगुरू पार्टीमध्ये 'शहादत के बेताब आशिक' ( हौतात्म्यासाठी हपापलेला दिवाना ) म्हणून ओळखला जाई !

'हौतात्म्य' म्हणजे कुणी एक सुरूप रमणी असून पार्टीत सर्वांच्या अगोदर मी तिला वश करीन हा राजगुरूचा नेहमीचा हट्ट. गंभीर प्रसंगी ह्या हट्टाखातर त्याला शिव्यांची लाखोली मिळे, पण खाण्यापिण्याच्या अभावी हिरमुसलेल्या सदस्यांसाठी राजगुरूचा हा हट्ट म्हणजे कॉमिक रिलिफ होता. हे हौतात्म्य संपादण्यात त्यांना सर्वांत मोठा शत्रू कुणी वाटत होता तर तो भगतसिंग. आपल्या अगोदर भगतसिंग किंवा इतर कुणीही फासावर चढू नये ही राजगुरूंची एकमेव महत्त्वाकांक्षा.

आझाद व राजगुरू काशीत एकत्र तर आले पण 'एक्शन' चा अवसर आला व तुझ्याजोगे काम निघाले तर तुला पार्टीचे आमंत्रण मिळेल असे सांगून आझाद गेले. काही दिवसांनंतर 'पार्टी'चा एक क्रांतिकारक घरभेद्या झाल्याचे आझादांना कळले. शिस्तभंगाचा कायदेशीर इलाज म्हणजे त्याचा वध करणे हे सर्वानुमते ठरले व कानपूरच्या D. A. V. कॉलेजात शिकणाऱ्या श्री. शिव वर्मा ह्यांना कामगिरी-साठी निवडले. त्यांच्यासोबत एक आणखी साथीदार मात्र मिळेना तेव्हा आझादांना राजगुरूंची आठवण झाली. शिव वर्माने बनारसला जाऊन राजगुरूंना योजना समजाऊन द्यावी व त्यांना घेऊन दिल्लीस जाऊन 'त्या' फितुराचा वध करावा असा निर्णय घेण्यात आला. शिव वर्मा कामगिरीवर निघाले.

त्या वेळी राजगुरू बनारसच्या एका म्युनिसिपल शाळेत ड्रील मास्तर होते. 'राज-गुरू' ह्या भरघोस नावाप्रमाणेच व्यक्ती आडदांड असेल हा कयास करून गेलेले वर्मा त्यांना पाहताच चकीत झाले. सावळा रंग, आकर्षणरहित लांब चेहरा, पिचके गाल डोळ्याजवळ आलेली गालांची हाडे असा एक मुलगा खाकी चड्डी-शर्टात त्यांच्या-पुढे आला. गुप्त खुणांचा पडताळा होताच दोघेही गंगाकिनारी गेले व वर्मांनी सर्व योजना राजगुरूंना समजावून सांगितली. अत्यंत निर्विकार चेहरा करून राजगुरूंनी सर्व काही ऐकले व इतकेच म्हणाले, "चलो, पार्टीने किसी काम के योग्य तो मुझे समझा ! "

दोघेही दिल्लीला आले. पण पिस्तुल एकच असल्याने व फितुर जिवाला घाबरून

घराबाहेर क्वचितच पडत असल्याने त्यांची पंचाईत झाली. रात्री ७ ते ८ तो इसम जेथे फिरावयास जात असे तेथे राजगुरूंनी त्याच्या मागावर राहावे असे ठरवून दुसऱ्या पिस्तुलाची व्यवस्था करण्यासाठी वर्मा लाहोरला गेले व तीन दिवसांनी परतले ते हात हलवीतच! संध्याकाळ असल्याने अड्डयावर जाण्याऐवजी वर्मा सरळ 'मोक्या'च्या जागी पोहोचले पण तेथे पोलिसांच्या गाड्या, गोळ्यांचे आवाज व सर्चलाईट पाहून त्यांनी ताडले, की आज राजगुरूंनी गद्दाराचे काम तमाम केले असावे. ते माघारी फिरले व ठरल्याप्रमाणे गाडी गाठून कानपुरास परतले.

इकडे राजगुरूंनी अचूक निशाणाने एकाच गोळीत त्या व्यक्तीचा सफाया केला व मथुरेकडील रेल्वे लाईनवरून पळ काढला. शिट्यांचे कर्णकटू आवाज व सर्चलाइट त्यांचा माग काढीत होते. शेवटी गोळ्यांच्या फैरी झडू लागल्या तेव्हा राजगुरू रेल्वे लाईनखाली उडी टाकून पुलाखालून सरपटत एका शेतात घुसले. दुर्दैवाने ते शेत पाण्याने तुडुंब भरले होते. एव्हाना पोलीस त्या ठिकाणी येऊन पोहोचले व चारी बाजूना प्रकाश फेकून गोळीबार करू लागले. काशीचा पट्टीचा पोहणारा राजगुरू इतक्या कडाक्याच्या थंडीत पाण्याने भरलेल्या शेतात लपून राहू शकेल ही पोलिसांना कल्पना नव्हती. त्यांनी आजूबाजूच्या सुक्या शेतांत २–३ तास


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा! फोंडा! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

**आठ शिवकालीन कथा**

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

शोधाशोध केली व जळफळून निघून गेले. तोपर्यंत राजगुरू चिखलपाण्यात, किडयाकाटयात व भयानक थंडीत निमूटपणे बसून होते. इतर कुणी असता तर दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे कुल्फीरूपी प्रेतच पोलिसांना सापडले असते. पोलीस गेल्यावर ते उठले व पुन्हा मथुरेकडे पळत सुटले. दोन स्टेशने त्यांनी पळतच पार केली. तिसऱ्या स्टेशनवर मथुरेच्या गाडीत बसले व मथुरेत आल्यावर यमुनेकाठी कपडे धुऊन वाळूतच झोपले. तिसऱ्या दिवशी कानपूरला येऊन त्यांनी ही रोमांचकारी हकीकत वर्मांना सांगीतल्यावर त्यांना धक्काच बसला. राजगुरू अत्यंत खुशीत होते. त्यांनी कामगिरीही अत्यंत चोख बजावली होती पण मेला तो फितूर नव्हता तर त्याच्याचसारखा दिसणारा इसम होता हे कळल्यावर ते विव्हल झाले व अक्षरशः रडू लागले. कशीबशी त्यांची समजूत घातली गेली.

परंतु त्या प्रसंगाने राजगुरूंची निखळ देशभक्तांमध्ये गणना होऊ लागली. ते विश्वासपात्र ठरले. पण प्रत्येक 'एक्शन'वर आपलीच नेमणूक व्हावी असा हट्ट हा माणूस धरील ही कल्पना इतरांना त्या वेळी नव्हती. एकतर ते नवे होते व 'झोप' ही त्यांची सर्वाधिक प्रिय आवड असल्याने ते सदैव 'एक्शन'साठी उत्सुक असतील ही कल्पनाच करणे कठीण होते. पण–पण पार्टीला खऱ्या राजगुरूंची ओळख झाली ती सॉंडर्स वधाच्या वेळी.

सायमन कमिशन एकाही भारतीय सदस्याला न घेता भारतात आले. लाहोरला पंजाबकेसरी लाला लजपतराय ह्यांनी कमिशनची वाट अडवली. पोलीस अधिकारी स्कॉट ह्याने सॉंडर्ससमवेत लालाजींच्या छातीवर दंडुक्यांचे प्रहार केले व त्यामुळे लालाजी शहीद झाले. शहादतच्या संध्याकाळी लाहोरच्या प्रचंड सभेत देशबंधू चित्तरंजन दास ह्यांच्या पत्नी गरजल्या.

"लालाजी के चिताकी आग ठंडी होने के पहलेहि किसी भारतीय नौजवानने इस क्रूरताका बदला लेना चाहिए."

सरदार भगतसिंग ह्या शब्दांनी विव्हल झाले व त्यांनी स्कॉटला मारण्याचा प्रस्ताव पार्टीत मांडला. झाले, राजगुरू उडया मारून सभेत अडथळा आणून सर्वांना सांगू लागले की, स्कॉटला मीच मारणार! भगतसिंगाने त्यांना प्रेमाने समजावले की मारेकरी पकडला गेला तर त्याने न्यायालयात तर्कसंगत भाषण करून हे पटवून दिले पाहिजे की, पोलीस सुपरिटेन्डेंड स्कॉटला का मारावे लागले? ब्रिटिश साम्राज्यकर्ते अन् भारतीय जनतेला मारेकऱ्याने पटवून दिले पाहिजे, की मी स्कॉटचा वध कर्तव्य बजाविण्यासाठी अन् बदला घेण्यासाठी केला, न की फक्त जोश अन् मार्यफिरूपणाचे प्रदर्शन करण्यासाठी. भगतसिंग बुद्धिवान होता आणि न्यायालयात तो हे सर्व बोलू शकत होता. म्हणून अनाडी राजगुरूला तो ह्या कामगिरीत सामील करण्यास तयार नव्हता. पण राजगुरूचा हट्ट ईर्षेने पेटून उठला, की भगतसिंग मला बुद्धिवादाने फसवून स्वतः माझ्याअगोदर बलिदान करू पाहत

आहे. सर्वांनी त्याला खूप समजावले पण जेव्हा तो हेका सोडीना तेव्हा त्याचा मोहिमेत समावेश करण्यात आला.

योजना अशी आखण्यात आली की, मालरोड पोलीस स्टेशनवर जय गोपाळ पहारा देऊन स्कॉट किती वाजता तेथे येतो जातो ह्याचे निरीक्षण करील अन् राजगुरू व भगतसिंग जय गोपाळच्या खुणेप्रमाणे गोळ्या घालून त्याचा (स्कॉटचा) वध करतील. वधानंतर जर पोलीस स्टेशनमधून इतर कुणी बाहेर आले तर आझाद त्याचा खातमा करतील.

चार दिवस हे चौघेजण रोज आपल्या कामगिरीवर नियमितपणे गेले पण स्कॉट त्या भागात फिरकलाच नाही. उतावीळ राजगुरू न राहवून आझादांना चौथ्या दिवशी म्हणाले,

"अन्दर जाकर ही ठीक किये आता हूँ." अर्थ हा की स्कॉट जर कोतवालीतच बसला असेल तर आत घुसूनच त्याचे काम तमाम करून येतो.

आझाद अतिशय सावध, शिस्तप्रिय सेनापती ! डोळे वटारून ते म्हणाले,

"लुक लुक ना किया कर, लुक लुक करना है तो घर जा !"

घरी जायचा हुकूम मिळताच राजगुरू चुप झाले.

शेवटी पाचव्या दिवशी कार्यालयातून एक गोरा अधिकारी बाहेर आला. त्याचा मुनशी मोटर सायकल घेऊन त्याच्याबरोबर चालत होता. जय गोपाळने भगतसिंगला खूण केली की, बहुधा हाच स्कॉट असावा. ह्यावर भगतने खुणेनेच सांगितले की, हा नसावा. ही 'नसावा'ची खूण उत्साहाचे वारे डोक्यात शिरलेल्या राजगुरूला समजली नाही. त्याला वाटले भगतसिंग म्हणतो आहे की आता नको मारू, माझ्या निशाणीच्या टप्प्यात आला की मी मारीन.

ही खुणेची चापलूसी राजगुरूला सहन झाली नाही. मुन्शीकडून मोटर सायकल घेऊन साहेब त्यावर पाय ठेवतो आहे नाही तोपर्यंत राजगुरूने गोळी झाडली. ती साहेबाच्या डोक्यातून आरपार गेली. भगतसिंग झटक्यात पुढे झाला आणि आटोमॅटिक कोल्ट पिस्तुलातून ८ गोळ्या झाडून पडलेल्या साहेबाला मालरोडशी जणू बद्ध करून टाकले.

गोळयांच्या आवाजाने पोलीस चौकीतून बरेच लोक आरडाओरडा करीत बाहेर आले. त्यातला मिस्टर फर्न्स राजगुरूवर चालून गेला. राजगुरूने पवित्रा घेतला पण रिव्हॉल्व्हर चालेना अन् फर्न्स तर अंगाशी आलेला. उत्साहाच्या भरात राज-गुरूंनी हत्याराच्या फिरत्या चक्रावरच डावा हात ठेवल्याने ते चालेल कसे ? झटकन रिव्हॉल्हवर खिशात ठेवून त्यांनी फर्न्सची कंबर आवळली अन इतक्या जोरात मालरोडवर त्याला आपटले की तो सर्व 'नाटक' संपेपर्यंत उठलाच नाही. हे मल्लयुद्ध तडकाफडकी आटोपून राजगुरू वर पाहतात तो भगतसिंग आपल्या पिस्तुलाचे 'मॅगझिन' रस्त्यावरच टाकून पळालेला. हे महाशय चौकी-

पर्यंत गेले अन रिकामे मॅगझिन घेऊनच परतले. सुदैवाने सर्व तेथून सहीसलामत निसटले. मेला तो स्कॉट नव्हताच पण त्याचाच सहकारी सँडर्स होता हे कळल्याने विशेष दुःख झाले नाही. पण 'अड्ड्या'वर आल्यानंतर राजगुरूला सर्वांनी खरपूस शिव्या मोजल्या.

राजगुरू फर्न्सला लोळवून चौकीकडे का गेला हे न कळल्याने आझाद भडकून ओरडले, "अब तू उधर उल्टा कहाँ मरने गया था? " राजगुरूनने शांतपणे खिशातले मॅगझिन काढून सर्वांसमोर ठेवले. आझाद मनातून अत्यंत खुश झाले पण वरपांगी चिडून त्यांनी राजगुरूच्या उत्साहाला बांध घालण्याचा प्रयत्न केला.

राजगुरूंची मात्र एकच तक्रार होती, की मी एका गोळीत साहेबाची 'छुट्टी' केली तरीही भगतने आठ गोळ्या निष्कारण फुकट घालविल्या. कित्येक वेळा न पेलणाऱ्या कार्यावर झडप घालण्याचा हट्ट धरून राजगुरू सर्वांचे डोके भणाणून टाकीत. भगतसिंग व दत्त असेंब्लीत बाँब फेकायला जाणार हे त्यांना कसे आवडणार? ते झाशीला आझादांपाशी आले अन् भगतबरोबर मलाच पाठवा म्हणून त्यांनी धरणे धरले. आझादांनी खूप सांगितले की, फक्त स्फोट करायचा नाही तर इंग्रजीतून स्फोटक भाषण द्यायचे आहे. त्यावर राजगुरूंनी मुद्दा मांडला, "उसमें क्या बडी बात है, पंडितजी! अरे लघु सिद्धांत कौमुदी पूरी रगडकर फेंक दी है तो क्या अंग्रेजीका २-४ पन्नोंका एक छोटा बयान न रट सकूंगा?"

पण शेवटी भगतसिंग व दत्त ह्यांची नेमणूक अटळ झालेली पाहून डोक्यात राख घालून राजगुरू स्वस्थ बसले.

पार्टीमध्ये व त्यांना पकडल्यावर जेलमध्ये ते एकतर सर्वांना हसवीत राहत अगर चिडवून बेजार करीत. एखाद्या दिवशी भल्या पहाटेपासून रात्रीपर्यंत ते नुसते शिकांवर शिका काढीत. त्यामुळे इतरांच्या कामात, चर्चेत अडथळा होई. व सर्वजण त्यांच्यावर तुटून पडत. अशा वेळी नाकावर रुमाल ठेवून भावनाशून्य, निर्विकार नजरेने षड्रिपूंवर मात केलेल्या योग्यासारखे एका कोपऱ्यात बसून ते आपल्या भडकलेल्या बांधवांकडे आळीपाळीने पाहत राहत.

रघुनाथ (राजगुरुचे पार्टीतील नाव) झोप काढण्यात कुंभकर्णाचेही पितामह! क्रांतिकारकांच्या जबाबदारीच्या कष्टप्राय जीवनात रघुनाथच्या झोपेचा विषय म्हणजे अत्यंत सुखावह क्षण असे. गृहस्थ चोवीस तास नरेन्द्र पित्तपापडा तेलाचे बुधले टाळूवर ओतल्यासारखा झोपत असे. एकदा भगतसिंगाबरोबर ते स्टेशनवर आले. रात्री दोनच्या गाडीने दोघेही जाणार होते. भगतसिंग २-३ दिवसांपासून अजिबात झोपला नव्हता. त्याला डुलक्या येत होत्या. पण साक्षात निद्राराक्षस सोबत असल्याने ते झोपायला घाबरत होते. शेवटी डोळे अजिबात उघडेनात तेव्हा त्यांनी राजगुरूंना गयावया करून विनवणी केली, की मी थोडा पडतो, तू मला दीड वाजता उठव! "अबे हां हां, तू क्या मुझे कुंभकर्ण समझा है?" असे वाय-

बार सोडून राजगुरूंनी त्याला झटकन् सतरंजी अंथरून दिली. बऱ्याच वेळानंतर भगतसिंग फलाटावरील गडबडीने जागा झाला. तोच घड्याळात टन्न असा आवाज झाला. एक वाजला असेल हा विचार मनात येईपर्यंत दुसरा टोला पडला. बहुतेक बाराचे ठोके पडत असतील म्हणून भगतसिंग जिवाचे कान करून ऐकू लागला. पण चारा ठोके देऊन घडी थांबली. चिडून भगत उठला तर शेजारच्या बाकावर राजगुरूंचे नाक खर्जात वाजत होते. भगतसिंगांचा राग अनावर होऊन त्यांनी जोरात साहेबांना लाथेने हाणले तर गडबडून जागे होत ते उत्तरले,

"ऐ, क्या हुआ ? तुम्हारी कसम मुझे नहीं मालूम क्या हुआ ?"

आग्रा येथे एका घरात जतीनदास बॉंब बनवीत व त्यांच्या सोबत पार्टीच्या कार्यकारी मंडळाचे सभासद राहत. दुसऱ्या घरात इतर सर्व क्रांतिकारक राहत होते. एकदा विजयकुमार सिन्हा (अजून हयात आहेत) ह्यांनी रघुनाथला थोडी रक्कम देऊन मथुरेला जयदेव ह्यांना आणायला पाठविले. ताबडतोब घेऊन ये अशी त्यांना सक्त ताकीद देऊनही राजगुरू मथुरेहून एकटेच परतले. बहुधा जयदेव चेष्टेखातर बाहेर लपून बसला असेल ह्या समजुतीने सिन्हांनी त्याला १-२ वेळा हाका दिल्या अन् नंतर बाहेरच्या बोळापर्यंत जाऊन आले. राजगुरूंवर भडकून जेव्हा विचारपूस केली तेव्हा सिन्हांना ही माहिती मिळाली की, त्यांनी जयदेवने मथुरेलाच राहावे असा निरोप ह्या निद्रासुराच्या हाती पाठविला होता. विजयकुमारने ज्या वेळी निरोप सांगितला त्या वेळी राजगुरू पूर्ण निद्रेत होते. इतकेच नव्हे तर स्टेशनपर्यंतचा सर्व रस्ता ते झोपेत चालून गेले असे नंतर सदाशिवने सर्वांना सांगितले.

एके दिवशी अड्ड्यावर सर्व परेशान झाले. राजगुरू घरात दिसला नाही व कुणाला न सांगता गेला तर कुठे जाईल ह्या भीतीने सर्व अस्वस्थ झाले. आपण सर्व त्याला फार छेडतो म्हणून तर तो भडकून नाहीसा झाला नसेल, हाही विचार सर्वांनी एकमेकांस बोलून दाखविला. एकदोघे त्याला शोधण्यासाठी बाहेरसुद्धा जाऊन परतले. पण बेपत्ता रघुनाथचा तपास लागला नाही.

ह्या चिंतातुर, नीरव वातावरणाचा भंग झाला. एका खुंटीवरची चादर व कपडे अचानक जमिनीवर पडले म्हणून! मंडळी तिकडे बघतात तर भिंतीवर अंग टाकून राजगुरू खुर्राटे भरीत आहेत. त्यांना बुकलून जागे केले तर म्हणाले, "ऊँ हूँ! बोलो मत, सोने दो!" अन् पुन्हा झोपी गेले.

असला हा निद्रा-नवाझ पुढे जाऊन देशाची झोप उडवून गेला. पार्टीमध्ये आझादसुद्धा राजगुरूंच्या साहसी वृत्तीकडे आदराने पाहत असत. एकदा स्वयंपाकाची पाळी आली तेव्हा सर्वांच्या गप्पा ऐकत राजगुरू रोटया शेकू लागले अन् हळूच एक लोखंडी अणकुचीदार सळी शेगडीत खुपसून बसले. विषय असा होता की क्रांतिकारकांना धरल्यावर गौप्यस्फोटाखातर नरकयातनांहून जास्त जिवाचे हाल

केले जातात. शांतपणे ऐकणाऱ्या राजगुरूंनी सळी लाल होताच बाहेर काढली व तीन वेळा छातीवर टोचून घेतली. त्यांना पकडून, सळी हिसकावून ह्या पागल-पणाचा अर्थ विचारला तर हसत हसत म्हणाले, "कुछ नही यार! देख रहा था कि टॉर्चरसे मैं विचलित तो नहीं होऊंगा!"

अशा कृत्यांमुळे आझादांना राजगुरू अतिशय विश्वासपात्र वाटत असत. पण त्यांचे चित्त कधीच थाऱ्यावर नसल्याने आपण फरारी असून पोलिस आपल्या मागावर आहेत हे त्यांना कधीच आठवत नसे. 'एक्शन' हा शब्द निघाला की ते कान टवकारीत. अन्य प्रसंगी शिगोशिग उत्साहात ते झोपत तरी असत किंवा अगदी स्वतंत्र नागरिकाप्रमाणे मोठमोठ्याने गप्पा मारीत रस्त्यांतून भटकत असत.

एकदा आझाद व माहोर ह्यांच्यासह राजगुरू कानपूरहून झाशीला रेल्वेने जात होते. गुप्तहेरांना चुकविण्यासाठी तिघांनीही मवाल्याचा पोशाख केला होता आणि गझल गात, गाली देत हे त्रिकूट प्रवास करीत होते. काल्पी मागे पडले अन् बुंदेलखंडाच्या डोंगरदऱ्या लागल्या त्या क्षणीच राजगुरूंना आपल्या मवालीगिरीचा संपूर्ण विसर पडला व ते बोलू लागले. राजगुरू अगदी बंद खोलीत बोलू लागले तरी साथीदारांना वाटे की बाहेर पडून पोलिसांना आत्मसमर्पण करावे पण ह्यांचं वक्तृत्व नको. आत तर खुद्द कमांडर–इन–चीफ सोबत अन् रेल्वे सारखे धोक्याचे स्थळ. पण शिवाजी बुंदेलखंडात असता तर किती कुशलतेने तो गनिमी युद्ध लढू शकला असता ह्यावर राजगुरूंनी वक्तव्य सुरू केले. आझादांनी शक्य तितके दुर्लक्ष करून माहोरांच्या गझलीला शिवराळ दाद देण्यासाठी आपला आवाज उंचावला. पण सी. आय. डी. अन् पोलिस पार विसरून गेलेले राजगुरू आझादांनी बाही ओढून जेव्हा सारखे सारखे "शिवाजी, शिवाजी, तो फिर पंडितजी, शिवाजी" हेच वारंवार बोलू लागले तेव्हा आझादांनी हात हिसडून शिवाजीला एक इरसाल शिवी हासडून त्यांना गप्प केले. झाशीला पोहोचल्यावर आझादांनी नेहमीप्रमाणे रघुनाथवर शिव्यांचा वर्षाव केला अन् मग दाटून आलेल्या कंठाने ते म्हणाले, "इसने आज मुझसे शिवाजीको गाली दिलवा दी!"

एकदा भगतसिंग साहेब व राजगुरू त्यांचे गडी अशा वेषभूषेत दोघे घराबाहेर पडले आणि स्टेशनवर गेले. पहिल्या वर्गाच्या दरवाज्याशी साहेबी थाटात भगतसिंग फेऱ्या मारू लागले तसे इतके अवजड सामान डोक्यावर घेऊन राजगुरूही त्यांच्याशी पायमिळवणी करून कवाईत करू लागले. भगतसिंगला कळले की, हा गडी, गड्याची भूमिका विसरला. त्याचा पिच्छा सोडविण्यासाठी मग भगतने आपली चाल जलद केली. त्याबरोबर जणू फास्ट वॉकिंगची शर्यत प्लॅटफॉर्मवर चालू आहे अन् हा प्रतिस्पर्धी आपल्यापुढे जाण्याचा अटोकाट प्रयत्न करीत आहे ह्या भावनेत समरस होऊन बोजा सावरीत राजगुरू बाकायदा कदम मिळवून भगतच्या रेसभरसुद्धा मागे राहिनात! प्लॅटफॉर्मचे लोक बघून संशय घेतील म्हणून

बिचाऱ्या भगतसिंगने पुन्हा चाल मंदावली. तक्षणी राजगुरू म्हणतात, "बस ! थक गये इतनेमें ?" ह्या खिजवण्याने भगतसिंगचे डोके आऊट झाले अन ते दाटून म्हणाले, "Look here servent, you sit there !" ह्या वाक्याने राजगुरू शुद्धीवर आले अन् पुन्हा गडयाची भूमिका वठवू लागले.

राजगुरूंचे जीवन केवळ राष्ट्राखातर हौतात्म्य पत्करण्यासाठीच फुलले होते. मला तर वाटते, त्यांच्या जिवंतपणीच जर भारत स्वातंत्र झाला असता तर त्यांना फार फार वाईट वाटले असते. एक शेर आहे,

"वतनपरस्त शहीदों की खाक लाएंगे
हम अपनी आंखका सुरमा उसे बनाएंगे"

म्हणजे आम्ही आमच्या पूर्वी बलिदान केलेल्या शहिदांची पवित्र रक्षा आमच्या डोळयांत सुरमा समजून लावू ! राजगुरूंचे डोळे खरोखरीच ह्या सुरम्याने चकाकत होते. स्त्री, शृंगार, प्रेम ह्या भावनांना मनात, डोळयात कुठेच ठाव नव्हता. मात्र भगतसिंग, माहोर सिन्हा ही शायर व रसिक मंडळी होती. एका पौर्णिमेला दलाचे वास्तव्य आग्रा येथे होते. सहजच सर्वांनी ताजमहालावर जाण्याचे ठरविले. सर्व निघाले म्हणून राजगुरूंनाही जाणे भाग पडले. कवीमंडळाने असे ठरवले होते की, ताजमहालावर गप्पाटप्पा न करता प्रत्येकजण तास-दोन तास स्वतंत्रपणे चांदण्यात न्हाऊन निघालेले ते प्रीतिप्रतीक निरखील, ह्यापासून प्रेरणा घेऊन एखादी आशकी गझल घडवील अन् सकाळी ती अड्ड्यावर म्हणून दाखविल. त्या सुरम्य स्थळी पोहोचताच मौन पाळून प्रत्येक कवी निवांतपणे शतपावली करू लागला. राजगुरूंनी ओळीने प्रत्येकाचा एकाग्रभग करण्याचा मन लावून यत्न केला पण कुणीही दाद देईना. शेवटी न राहवून राजगुरूंनी एकाचे बखोटे धरून जेव्हा पृच्छा केली की तुम्ही असे एकाएकी झपाटले कशाने गेले ? त्यावर त्या शांतिसागराने फक्त इतकेच सांगितले.

"भाई रघुनाथ ! हमे यही रहने दे, तू घर जाकर डंड बैठक मार, काहे को इधर चला आया है ?" कोणीच विचारीनात हे पाहून राजगुरू एका जागी विराजमान झाले व सहृदय होत्साते कवीभावनेची साधना करू लागले.

सकाळी चहापानाच्या वेळी प्रत्येकजण आपल्या शेराचे तुकडे ऐकवू लागला तसे राजगुरू भसाडया आवाजात गरजले.

"अब तक नहीं मालूम था इश्क क्या चीज है
रोजे को देख कर मेरे भी इश्क ने बलवा किया"

सिन्हा विंचू चावल्यासारखे "इश्कने बलवा किया !! असे किंचाळत उठले, बटुकेश्वर धरणीवर कोसळले आणि भगतने आपले पिस्तुल राजगुरूच्या हाती देऊन म्हटले, "तुझे मेरेको जिंदा नहीं रहने देना हो तो ले मार दे, नहीं तो इस बात का वायदा कर कि आयन्दा अब कभी शेर, चीता, भेडिया, बकरी, कुत्ता, गधा कुछ नहीं बनाएंगे !"

राजगुरूंच्या इश्कने ताजमहाल पाहून 'बलवा' केला. पण त्यांच्यावर एकदा असा 'बलवा' प्रसंग आला होता. त्या वेळी त्यांची काय अवस्था झाली होती ह्याचे वर्णन श्री. शिव वर्मा ह्यांनी केले आहे. मागे. दिल्लीत फितुराला मारण्यासाठी राजगुरू व शिव वर्मा गेले होते. त्याच वेळचा प्रसंग! दिल्लीत पोहोचताच दोघेही एका धर्मशाळेत उतरले. शिव वर्मा लागलीच 'त्या' फितुराच्या तपासाकरिता बाहेर पडले व राजगुरू एकटेच बसून राहिले- रात्री वर्मा उशिराने धर्मशाळेत आले तर त्यांना राजगुरू सामानाची बोचकी हातात धरून दरवाज्यात दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत कुडकुडताना दिसले. आश्चर्याने वर्माने विचारले,

"इतनी ठंडमें तुम बाहर मैदानमें क्या कर रहे हो?"

"मैं इस सरायमें एक मिनट भी नहीं ठहरूंगा! हम लोगोंको अभी कहीं दूसरा इंतजाम करना होगा!" राजगुरूंच्या हबकण्याचे कारण वर्मांना समजेना. नाइलाजाने ते बाहेर पडले व स्टेशनवर येऊन बसले. वाटेत राजगुरू धर्मशाळेतील लोकांना 'दुष्ट, खराब, गुंडे, बदचलनी' ह्या शब्दांत पोडतिडिकीने शिव्या घालीत होते. वर्माने जेव्हा धमकाविले की प्रकार काय तो सरळ सांग, तेव्हा त्यावर राजगुरूंनी झेपत, लाजत, संकोच करीत गोरज मुहूर्तावर धर्मशाळेत काय प्रकार घडला तो सांगितला.

वर्मा गेल्यावर एक सफेद दाढीवाले बुजुर्ग मियाभाई राजगुरूंच्या खोलीत आले व आदबशीर सलाम फर्माविला. राजगुरूंनी मोकळेपणाने 'आईये बडे मिया' ह्या शब्दांत त्यांचे स्वागत केले.

बडे मिया लबालब आदब युक्त शब्दांत म्हणाले, "किसी बातकी तकलीफ तो नहीं हुजूर! शर्मानेकी बात नहीं! यह आप ही का घर है! हम लोग ताबेदार हैं! आपके कहने भरकी देर है! सब इन्तजाम आपकी मर्जीके मुताबिक मिनटोंमें हो जायगा।"

राजगुरू एकदम खुश! धर्मशाळेचे लोक किती चांगले......वगैरे मनातल्या मनात म्हणत राजगुरू अर्धवट विचारात म्हणाले,

"नहीं, सब ठीक है, आप फिक्र न करें।" बडे मियांना वाटले की पोरगा संकोची आहे, मला म्हाताऱ्याला बघून मनातले बोलून दाखवीत नाही.

"मुझसे कहनेमें हिचकते हैं? कोई बात नहीं. लडकेको भेज देता हूँ। आपका दमउम्र हैं। उससे खुलकर बातें कर लीजीएगा." असे म्हणून बाअदब सलाम करून राजगुरूंच्या उत्तराची वाट न पाहता बडेमिया निघून गेले.

पाच मिनिटे झाली नाहीत तो एक २२-२३ वर्षांचा खुबसूरत तरुण खोलीत आला आणि 'आदाब अर्ज भाई जान' म्हणत सरळ राजगुरूंच्या खाटेवर बसला. शिववर्मांची चौकशी करीत म्हणाला,

[पृष्ठ ६१ वर]

# मोतीबिंदु

आनंद रामचंद्र फुले

प्रिय शरद...

खरं म्हणजे माझ्या पत्राचं हे प्रिय संबोधन पाहून तू अगदी निश्चितपणं तळमळणार ! पण माझा नाइलाज आहे ! तू पूर्वी जितका मला प्रिय होतास तितकाच ह्या क्षणीही आहेस; किंबहुना जास्तच. कुठे छापून आलेली तुझी कथा पाहिली की माझ्या मनात सदैव असलेली तुझ्याविषयीची आत्मीयता उचंबळून येते. मला तुझा अभिमान वाटतो. तू मोठा लेखक झालास म्हणून नाही तर माझा मित्र एक मोठा लेखक झाला म्हणून ! स्टॉलवर लाईफ-विकली वगैरे विकत घेताना सर्क्युलेटिंग लायब्ररीतनं घरी येणारे मराठी मासिक चाळताना जर तुझी कथा आढळलीच तर तुझ्या कथेसाठी म्हणून त्या मासिकाचा अंक आठवणीने घेतो. ज्या अंकात प्रामुख्याने तुझ्या कथा प्रसिद्ध होत असतात ते अंक चाळून बघतोच. तुझ्या कथा असलेले कितीतरी अंक माझ्या संग्रही जमा झाले आहेत. तुझ्या कथा असलेले जवळजवळ सारेच दिवाळी अंक माझ्याकडे व्यवस्थितपणे ठेवलेले आहेत. घरातली रद्दी काढताना एखादाही अंक जाणार नाही ह्याबाबत मी निश्चित असतो. मला आशाला हे मुद्दाम सांगावे लागत नाही. एवढेच कशाला ? मुंबईला आलो की, तुला भेटल्यावाचून मला राहवतच नाही. प्रत्येक वेळी तुला भेटतोच ना ! तुला ' प्रिय शरद...' असं लिहिताना मला काहीच वाटत नाही. वाटतं ते तुला ! ...हो, तुलाच !

शरद, माझ्याविषयी तुझ्या मनात अढी आहे हे मला कळत नाही असं नाही रे ! ती का आहे हेही मला ठाऊक आहे ! अगदी सारं ठाऊक आहे ! हे सारं कळूनसुद्धा तू मला पूर्वी होतास तेवढाच, किंबहुना जास्तच, प्रिय आहेस. अन् राहशील. माझ्या ह्या पत्राला तू कधीच उत्तर देणार नाहीस हे मला पुरतं ठाऊक आहे. तरीही मी पुन: जेव्हा मुंबईला येईन तेव्हा तुला भेटून जाईनच.

कदाचित तू विचार करशील की हे असं का ? ज्या माणसाला आपल्याविषयी

साधी आस्था वाटत नाही त्याची एवढी पत्रास कशाला बाळगायची ? नाही काही वाटत ना, मग गेला उडत ! तू तुझ्या जगात सुखी राहा. अन् मी माझ्या ! सर्वमान्य जनरीतीही अशीच आहे ! मीही ह्याला अपवाद नाही.

मग तू म्हणशील की, माझी तुझ्याविषयीची अनास्था एवढी जाहीर असताना मग तू माझी एवढी हेतुपुरस्सर उपेक्षा का सहन करतोस ? तेव्हा तुझा स्वाभिमान कुठं जातो ? का म्हणून ही अशी अगतिकता–लाचारी ?

प्रश्न वरपांगी मोठा बुद्धिभेद करणारा वाटला तरी वस्तुतः तसं काहीच नाही. उत्तर अगदी साधं आहे.

अढी आहे ती तुझ्या मनात. माझ्या मनात नाही.

का आहे हे मलाही चांगलं ठाऊक आहे. जवळजवळ तुझ्याएवढंच. आशानंच मला सारं केव्हाच सांगितलं आहे ! होय, तिनंच ! !

आशा–माझी बायको ! तुझी प्रेयसी !

त्या वेळी एकुलत्या एक स्थानिक दैनिकाच्या रविवारच्या साप्ताहिक अंकात तू सातत्याने कथा लिहीत होतास. जवळजवळ दर अंकाआड तुझी कथा प्रकाशित होत होती. आपलं आर्टस् अॅन्ड सायन्स कॉलेज असल्यामुळं मी सायन्सला असूनही मराठी मंडळाच्या कार्यक्रमात भाग घेऊ शकत होतो. त्या वेळी कॉलेज-मध्ये तुझ्या नावाला ग्लॅमर प्राप्त झालं होतं. सतत स्थानिक प्रसिद्धी हे एक कारण तर होतच, पण तुझं आशाचं प्रकरण प्रमुख कारण होतं. आशाच्या सौंदर्याचा सर्व कॉलेजभर जलवा होता. अनेकांना तिच्या सौंदर्यानं भारलं होतं. मीही अशा अनेकांपैकी एक होतो. तुमच्या मराठी मंडळाची ती सहकार्यवाह असल्यामुळंच मीही मराठी मंडळा-



कडं आकर्षिला गेलो होतो. ते एक निव्वळ आकर्षणच होतं. एक निमित्तच होतं. ह्याहून त्याला जास्त किंमत नव्हती. तुझं-आशाचं प्रकरण साऱ्या कॉलेजभर गाजत होतं. नाना आख्यायिका प्रसृत (खरं म्हणजे माझ्यासारख्या प्रेमवीरांना गाजणारं प्रकरण बघून झालेल्या पोटदुखीपायी 'प्रसूत') होत होत्या. तथ्यांशाच्या ऊहापोहात न पडताही एवढं मात्र खरं होतं की एरवी खालच्या मानेनं जाणारी शालीन, सौंदर्यवती आशा तुझ्या सहवासात कळी उमलावी तशी बहरून मनमोकळी व्हायची. खळखळून विमुक्त हसायची.

आशा इतर कित्येकींप्रमाणं माझ्याही मनात भरली होती. मलाही तिच्या सौंदर्यानं बांधलं होतं. पण माझ्यात व इतरांत फरक होता. मी तुझ्यावर जळत, स्वतःशी हळहळत तिच्याविषयीच्या निंदानालस्तीमध्ये प्रत्यक्षाप्रत्यक्ष–परोक्षापरोक्ष भाग घेणारांपैकी नव्हतो.

मी तुझ्या-माझ्या-तिच्या परिस्थितीचं पाणी जोखलं, तशी एक गोष्ट माझ्या लक्षात आली.

तुझं–आशाचं प्रकरण वाटल्यास प्रेमप्रकरण म्हणूया. हे 'प्रकरण' म्हणूनच राहणारं होतं. म्हणूनच संपणारं होतं. प्रेमिकांची ताटातूट होऊन. ह्या इतिश्री-विषयी माझी निश्चिती होती.

आशाच्या वयानं बांधलेल्या नजरेत जरी तू जगातला एकुलता एक पुरुषोत्तम होतास तरी आशाच्या मध्यमवर्गीय परिस्थितीतल्या वडिलांना तुझं स्थळ मान्य होणारं नव्हतं. सरस्वतीनं प्रसन्न होऊन तुझ्यासाठी जरी स्वतःचं शब्दभांडार उघडून दिलं होतं तरी परिस्थितीनं तू आशाच्या लायकीचा नव्हतास हे सत्य होतं. तुझ्याबरोबर आशा स्वप्नं जगू शकत होती. पण परिस्थितीनं तुझी-तिची कायमची निरगाठ बांधली जाऊ शकत नव्हती; हेच कटु सत्य होतं. हीच नियती होती. एकतर आपली जन्मजन्मान्तरीची स्वप्नांकिता प्रियतमा दुःखी होऊ नये म्हणून तूच ऐनवेळी माघार घेऊन वास्तव परिस्थितीचं आव्हान स्वीकारू शकला नसतास किंवा तुझ्या ह्या अशा आव्हान स्वीकारणाऱ्या धाडसाला आशानं साथ दिली नसती. ह्या दोनपैकी कोणत्या तरी एका कारणास्तव तुमच्या प्रकरणाची शोकान्तिका अटळ होती ह्याबाबत माझी निश्चिती झाली.

तुझं–आशाचं लग्न होऊ शकत नव्हतं. माझं मन मला ठामपणं ही ग्वाही देत होतं.

आशाचं लग्न तू सोडून दुसऱ्या कुणाशी होणार होतं. अधिकांशी तिच्या मनाच्या विरुद्ध. उघडच होतं. मग मी नेटानं प्रयत्नास लागलो.

एवीतेवी आशा दुसऱ्या कुणाची बायको होणारच होती. मग माझीच का होऊ नये ? निदान त्या दृष्टीनं प्रयत्न तरी का होऊ नये ? मला परिस्थितीची भरपूर अनुकूलता होती. त्याचा फायदा मी का घेऊ नये ?

असा विचार करून मी नुसता स्वस्थ बसलो नाही. प्रयत्नासच लागलो.

शेवटी आशा माझी बायको झाली.

व्यक्तिशः तुझ्याविषयी मला कधीच आकस नव्हता. उलट तुझ्या कथा मला आवडायच्या. स्थानिक प्रसिद्धीच्या का होईना पण झगमगाटात वावरणारा तू आमच्या कॉलेजचा आहेस ह्याचा मला अभिमान वाटायचा. मराठी मंडळाच्या कार्यक्रमाच्या वेळी मोहरून येणाऱ्या तुझ्या काव्यशास्त्र-विनोदाची खुमारी इतरांप्रमाणं मलाही मंत्रमुग्ध करायची ! तशी तुझ्याशी माझी जुजबीच ओळख झाली होती. पण त्यातच मी खुष होतो.

आशाच्या संदर्भात दुसरं कुणीही तुझ्याचसारख्या परिस्थितीत असतं तरी मी हेच केलं असतं !

तुझ्याविषयी मला कधीच असूया वाटली नाही. कारण तू माझा प्रतिस्पर्धी नव्हतासच मुळी ! आशाच्या संदर्भात आपली स्पर्धाच होऊ शकत नव्हती. परिस्थितीनं माझं पारडं खूप जड होतं. म्हणूनच मला तुझ्याविषयी कधी आकस वाटला नाही.

तू मात्र माझ्याविषयी मनात अढी बाळगत आलास. अजून ती तशीच आहे. अजून तू माझ्यावर मनातल्या मनात जळफळतोस. आपल्या प्रत्येक भेटीत हे मला जाणवतं. विलक्षण स्पष्टपणं जाणवतं. तरीही मी तुला भेटतो. कारण माझं मन स्वच्छ आहे. आशाशी वाङ्‌निश्चय झाला त्या दिवशीसुद्धा मला विजयी झाल्यासारखं वाटलं नाही. आपल्याला आवडलेल्या मुलीशीच आपलं लग्न होणार आहे ह्याचाच निरलस आनंद मला झाला.

तू मात्र माझ्यावर नाराज आहेस. रागावलेला आहेस. उगाच. तुला कदाचित् तुझी ही माझ्या बाबतीतली धारणा योग्य वाटत असेल. एवढंच काय पण मी जर तुझ्या जागी असतो तर कदाचित् तुझ्या धारणेनंच वागलो असतो. पण तुझी धारणा तुझ्या शेवटच्या पत्रांतून व्यक्त होणाऱ्या भूमिकेशी मात्र विसंगत आहे त्याचं काय ?

आठवतं तुला तुझं ते शेवटचं पत्र ?......

तुझ्यासारख्या भावनाप्रधान लेखकानं क्रौंचमरण जगताना लिहिलेलं ते पत्र शब्दशः आता तुला कदाचित् आठवत नसेल, पण मला ते शब्दशः मुखोद्‌गत आहे.

आठवतं, तू लिहिलं होतंस......" आशा, ह्याचा अर्थ एवढाच की, परमेश्वराला आपल्या उत्कट व उदात्त प्रेमाची परिणती वैवाहिक सहजीवनातच व्हावी असे वाटत नाही. हा कौल आपणांसही मान्य करायला हवा. ईश्वरेच्छा बलीयसी हेच खरं !

आशा, कदाचित् असंच असेल की, आपण एकत्र येण्यानं पुढील भविष्यात तू दुःखी झाली असतीस. रुक्ष व्यावहारिक धगीनं तू होरपळून निघाली असतीस. पण

तुझ्या ललाटी हे दुःख लिहिलेलं नसेलच म्हणून हे असं झालं. असं होण्याचा हाच अभिप्रेत अर्थ नाही का ? माझी प्रियतमा सदासर्वदा सुखी असावी हीच माझी ईश्वर-चरणी प्रार्थना. तुला दुरून सुखी झालेली पाहून मी धन्य होईन. आपल्या प्रियतमेला दुःख मिळावं ह्यापरती प्रियकरासाठी दुःखाची दुसरी गोष्ट कोणती असू शकेल ?

आशा, पुनर्जन्मावर माझी श्रद्धा आहे. खऱ्या प्रेमिकांची नाती जन्मजन्मान्तरीची असतात. ह्या नात्याला जरा-मरण नसतं. नाही या जन्मी तर पुढील जन्मी आपल्या उदात्त नि उत्कट अशारीरिक प्रेमाची परिणती व्हायचा ईश्वरीसंकेत असेल. म्हणूनच ह्या जन्मी आपली ताटातूट होणं अपरिहार्य झालं आहे.

तुझं जीवन आता दुसऱ्या एका जीवनाशी एकरूप होणार. अगदी खऱ्या अर्थानं तू कायावाचामनेकरून त्या जीवनात अस्तित्वानिशी विरघळून जा. ते तादात्म्य बघून मी सुखी होईन. तुझ्या मनमंदिरात मी म्हणून तुझ्या जीवनाच्या जोडीदाराची प्रतिष्ठापना कर. लौकिक अर्थानं जरी तू त्याची पत्नी राहशील तरी मनमंदिरात तू माझीच–आपल्या प्रियकराचीच–पूजा बांधीत असशील.

आशा, तेच मी करीन. माझ्या मनात तुझी माझ्या पत्नीच्या रूपात प्रतिष्ठापना करीन. संसार तिच्याशी होईल, पण पूजा तुझीच होईल.

आपले परस्परांचे जीवनप्रवाह समांतर जातील. पण परस्परांत एक अंतर सतत कायम राहील. त्यामुळं तोल सांभाळला जाईल व बाधा येणार नाही.

नियतीचा कौल मान्य करून आता अनिवार्य झालेला संसार आपणा दोघांनाही कर्तव्यभावनेनं बांधून करायला हवा. आपण कर्तव्यात चुकलो तर तो प्रत्यक्ष परमेश्वराचाच अनादर होईल.

आपल्या असिधाराव्रताची सांगता फक्त आपल्या ह्या जन्माच्या मरणानंच होणार आहे.

तोवरच आपली लौकिक अर्थानं तेवढी ताटातूट. पण आपलं नातं अभंग आहे. अभंगच राहील. वासनारहित प्रेमाला कुठलं जरा-मरण ?

आशा, तू ह्या वाटचालीत यशस्वी व्हावीस म्हणून मी तुझ्यासाठी परमकृपाळू परमेश्वराची करुणा भाकतो. तू नक्की यशस्वी होशील बघ.

जन्मजन्मान्तरीचा
फक्त तुझाच
शरद..."

वाचणाराचं मन तुमचं उदात्त प्रेम पाहून हेलावून जावं एवढी किमया त्या शब्दांत निश्चितपणं होती. पहिल्यांदा वाचताना माझ्या नकळत मीही खूप भारावून गेलो होतो. त्या क्षणी मला वाटलं होतं की मी तुम्हा दोघांचा अनंत अपराधी आहे. पण शब्दांच्या त्या मयसभेत लवकरच मी भानावर आलो.

मनात विचार आला. मी तुझ्या जागी असतो तर काय केलं असतं ? आशाला


घऊन पळून गेलो असतो. लग्न उरकलं असतं. तेवढं धैर्य झालं नसतंच तर निदान ही पुनर्जन्माच्या भेटीची पळवाट आपल्याला सुचली नसती.

तू लेखक, तेव्हा तुला हे असं सुचावं ह्यात नवल नाही. तुझ्यातल्या लेखकानं शोधलेली ही माघारवजा पळवाट पत्रांत शब्दबद्ध झाली. पण प्रत्यक्षात तू-माणूस ह्या नात्यानं—आपल्या शब्दांशी इमान राखू शकला नाहीस !

तू शब्दांचा जादूगार होतास. आशाबरोबर पळून जाऊन लग्न करण्याचं धाडस तुझ्यात नव्हतंच. (आशाचा इथं प्रश्नच उपस्थित होत नाही.) ऐन वेळी तू माघार घेतलीस. पण शब्दांच्या वर्खानं त्या माघारीला धीरोदात्त त्यागाचं रूप दिलंस. वाचणाराला वाटावं, तू केवढा असीम त्याग केलास ! पत्राच्या माध्यमानं आशासाठी तू एक मुखवटा घेतलास. पण ह्या साऱ्या प्रयत्नांत फसलास फक्त तू ! तोंडघशी पडलास फक्त तू ! बळी गेला फक्त तुझाच !

तू आशाला कधी पळून जाऊन लग्न करण्याविषयी विचारलं होतंस ? का नाही विचारलंस ? निदान विचारून तर बघायचं होतंस ? फार तर काय झालं असतं ? ऐन वेळी तिनं कच खाल्ली असती. तुला तुझ्या धाडसात सहकार्य देण्याचं नाकारलं असतं. पण ह्यांतही तुला प्रयत्नाचं समाधान मिळालं असत !

पण तू तसं केलं नाहीस. कारण मुळात तुझ्यातच ते धाडस नव्हतं. आशाजवळ ही असमर्थतता व्यक्त करणं अर्थातच तुला शक्य नव्हतं. तुझ्या जागी दुसरं कुणी असतं तर असंच वागलं असतं. मीही बहुधा असाच वागलो असतो. पण तू ठरलास लेखक ! तू आशाच्या मनोविश्वातली आपली प्रतिमा डागाळू नये म्हणून नकळत स्वतःच्या समर्थनासाठी शब्दांच्या लाभलेल्या सामर्थ्यानं एक सुंदर मृगजळ पत्ररूपानं निर्माण केलंस. पुनजन्मावरची श्रद्धा. जन्मजन्मान्तरीचं नातं. परमेश्वराची इच्छा.

प्रेमाला न बाधू शकणारं जरा-मरण. सारं आलं. पण व्यर्थ ! तू निर्माण केलेल्या मयसभेत फक्त तू स्वतःच बंदिस्त झालास. जिच्यासाठी हे सारं केलंस तिच्याबाबतीत फक्त एकच गोष्ट झाली, तिचा भ्रमनिरास झाला. शब्दांच्या फुंकरीनं उमलणाऱ्या स्वप्नकळ्या कथा–कादंबरींतच तेवढ्या मोठ्या इतमामानं जगतात. वास्तवाची धग त्यांना यत्किंचितही सहन होत नाही, ही परखड जाणीव तिला तुझ्या पत्रानं दिली.

भाबडी पोर माझ्या कल्पनेहून धाडसी निघाली. तू पळून जाण्याविषयी नुसत्या एका शब्दानं सुचविलं असतंस तर त्या क्षणी ती तुझ्याबरोबर निघाली असती. एवढी तिच्या मनाची तयारी झाली होती. तुझ्याच कथांमधनं वावरणाऱ्या धाडसी नायकाच्या रूपात तिला तू त्या वेळी अभिप्रेत होतास. तुझ्या पत्रानं तिचा विरस झाला. तिच्या लक्षात आलं, तू सर्वगुणसंपन्न असा पुरुषोत्तम नायक रंगवू शकतोस. पण म्हणून नायक म्हणून जगू शकत नाहीस. झालेल्या प्रेमबाधेपोटी होणारी नायकाची–तुझी गल्लत तिची तिलाच उमजली. तिचा भ्रम दूर झाला. बाधा दूर झाली. तुझी प्रतिमा पुसली गेली. माझी प्रतिमा साकारली.

तू तिला लिहिलेलं पत्र तिनं आपणहून मला वाचावयास दिलं होतं. केव्हा दिलं असेल ? थोडासा कल्पनाशक्तीला ताण दे ! लग्नानंतर ?—केव्हा ? पहिल्या रात्री–माझ्या मनात तुझ्या-तिच्या प्रकरणाविषयी विकल्प राहू नये म्हणून सारं सांगून ! काही महिन्यांनी–माझ्या स्वभावाची पुरेशी कल्पना आल्यावर ! पहिल्या मुलाच्या जन्मानंतर. एव्हाना आमचं वैवाहिक आयुष्य व्यवस्थित रुळल्यावर ! लग्नानंतर नाही शरद. लग्नाआधीच आशानं मला सारं सांगून ते पत्र दाखविलं होतं. तू तिच्या मनातनं उतरल्यावर. पत्रानं तिच्या मनाच्या झालेल्या धाडसी तयारीच्या पार्श्वभूमीवर तुझं खरं रूप तिला जाणवलं. तुझ्याबरोबर तिनं फार मोठी स्वप्नं पाहिली होती. ती सारी क्षणात जमीनदोस्त झाली. निरभ्र मनानं ती लग्नाला तयार झाली. माझ्या आयुष्यात आली. रुळली. लग्नाआधीच तिनं झालेली तुझी बाधा मला सांगितली. पत्रानं भ्रमनिरास कसा झाला तेही सांगितलं.

तू मात्र उगीच त्या प्रेमकरणाच्या कोषात स्वतःला अद्यापपावेतो गुरफटवून घेतलं आहेस.

म्हणूनच माझ्याविषयी तुझ्या मनात अढी आहे. खरं म्हणजे माझ्या निमित्तानं तुझं मन तुलाच खातं. म्हणून तू तो राग माझ्यावर वेगळ्या प्रकारे व्यक्त करतोस.

तुझं-आशाचं जे प्रेमप्रकरण झालं तेही बऱ्हंशी तू कल्पनेनंच जगलास. प्रत्यक्षात जगला नाहीस. त्याचा सल तुला अजूनही व्यथित करतो. माझं निमित्त होतं.

माझ्या कल्पनेप्रमाणं तू भ्रमातच आहेस. आशाच्या मनात माझ्या निमित्तानं तुझी प्रतिष्ठापना वगैरेसारखं काहीही घडलं नाही. पण ह्याची तुला जाणीवच

नाही. तुला अजूनही असंच वाटतं की, आशा तुझ्या प्रतिमेची मानसपूजा करते आहे. त्याच भ्रमात तू वावरतो आहेस. स्वतःला बांधून घेतो आहेस. गेल्या वेळी आम्ही दोघं तिथं आलो असताना मी नेहमीप्रमाणं तुला भेटावयास आलो होतो. तुला भेटीचं निमंत्रण मी दिलं होतं. तू घेतलेल्या भूमिकेशी तू एकनिष्ठ असतास तर आम्हांला भेटावयास जरूर आला असतास. अगत्यानं आम्हांला तुझ्या घरच्या भेटीचं निमंत्रण दिलं असतंस. पण तुझ्यानं असं काही झालं नाही. असं काही होणार ह्याविषयी मी निश्चित होतो अन् तसंच झालं. तुझं मन तुलाच खातं म्हणून तू आशाला सामोरा जाऊ शकत नाहीस.

एवढंच काय पण तुझी प्रत्येक कथा वाचताना मी ह्या प्रकरणाच्या ओझरत्या का होईना पण उल्लेखाच्या मागावर मला कळत नकळत असतो. तेही धाडस तुला नाही. अजूनपर्यंत तू स्वतःच्या पराभवाला (तुझ्या दृष्टीनं) विकृतपणं का होईना पण शब्दरूप दिलेलं नाहीस. तेवढं बेशरम धाडसही तुझ्याजवळ नाही.

तू म्हणशील – एवढं सारं असताना मी प्रत्येक वेळी तुला आवर्जून का भेटतो ? तुझी हेतुपुरस्सर उपेक्षा का सहन करतो ?

कारण माझं मन स्वच्छ आहे. माझ्या मनात तुझ्याविषयी अढी नाही, किन्तु नाही. पूर्वी जितकं मला तुझ्याविषयी वाटायचं तितकंच आत्ताही वाटतं. वाचकाला बांधून ठेवण्याचं तुझं शब्दसामर्थ्य वादातीत आहे. मी अजूनही तुझा चाहता आहे. खरं म्हणजे तुझ्यातल्या लेखकाचाच. माणूस म्हणून मला तू गौण नाहीस. प्रत्येक माणसाला मर्यादा असतात हे मीही जाणतो. आशा-प्रकरणी तू जसा वागलास कदाचित तसाच मी वागलो असतो. शेवटी प्रत्येक मनुष्य आपल्या परिस्थितीचा गुलाम असतो. तुझ्याचसारखं मीही स्वतःचं समर्थन केलं असतं. पत्रानं नाही तर भेटीच्या वेळी. माझ्या परिस्थितीत तू असतास तर माझ्यासारखाच वागला असतास, ह्याची मला जाणीव आहे. म्हणूनच माझ्या मनात तुझ्याविषयी विकल्प नाही. माझं मन स्वच्छ आहे.

तुझ्या मनात मात्र माझ्याविषयी अढी आहे, उगाचच. कारण तू अजूनही भ्रमात आहेस. स्वतःच्या शब्दांच्या मृगजळामागं आहेस. ह्या पत्रानं वस्तुस्थिती कळून तुझा भ्रमनिरास व्हावा अशी अपेक्षा आहे.

ह्याची प्रचिती लवकरच मला येईल. माझ्या तिथं येण्याचा योग लौकरच जुळून येईल अशी परिस्थिती दिसते आहे.

तेव्हा आपण भेटूच.

तूर्त एवढंच पुरे !

तुझा स्नेहाकांक्षी,
श्रीधर शेजवलकर

□ □ □



# धोकेबाज आगपेटी

ठरल्याप्रमाणे मी भूमिगत चळवळीतील अनेक सच्चा कार्यकर्त्यांना भेटलो. या कामात मनाला मोठा आनंद लाभला. अखेर जवळजवळ एक आठवड्यानंतर कॉर्नेलिस व्हेर्लूपची पाळी आली. परंतु व्हेर्लूपला संशय येऊ नये ही या खटाटोपामागे असलेली माझी इच्छा शंभर टक्के सफळ झाली नाही. कारण ज्या दिवशी ठरल्याप्रमाणे व्हेर्लूप मला भेटणार होता त्याच्या आदल्या दिवशी खुद्द आमच्या मध्यवर्ती कार्यालयात मोठ्या अधिकारावर काम करणाऱ्या माझ्या मित्राकडून मला गुप्त संदेश मिळाला. त्या संदेशात असे म्हटले होते की ' नुकत्याच गिरफदार केलेल्या पायदळाच्या एका जर्मन अधिकाऱ्याने आईंडहॉवेन परिसरात त्याला मदत करणाऱ्या फितुरांमध्ये कॉर्नेलिस व्हेर्लूपचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. ' व्हेर्लूपला मी ताबडतोब कैद करावे आणि त्याची कसून उलटतपासणी घेऊन, तो दोषी आहे का निर्दोषी याचा निर्णय घ्यावा, अशीदेखील सूचना त्या संदेशात दिलेली होती.

त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या घरीच व्हेर्लूपला अटक करण्यात आली आणि माझ्यासमोर आणण्यात आले. या वेळपर्यंत जरी संदेशाने, हेन्ड्रिकने व्हेर्लूप-

# अनंत भावे

बद्दल व्यक्त केलेला संशय अधिकच बळकट केला असला तरी मी मोकळ्या, पूर्वग्रह-रहित मनाने व्हेर्लूपची परीक्षा घेणार होतो. युद्ध अजून संपलेले नव्हते आणि एक दिवस पुन्हा आईन्डहॉवेन काबीज करण्याची आशा जर्मनांना वाटत असण्याचा संभव होता. अशा परिस्थितीत या परिसरातील फितुरांचा गौप्यस्फोट एका जर्मन सेनाधिकाऱ्याने करणे वेडेपणाचे होते. कदाचित त्या अधिकाऱ्याला अगदी सहज व्हेर्लूपचे नाव माहीत असेल. रेडिओ कारखान्यात महत्त्वाचे काम करीत असल्यामुळे तशी शक्यता नाकारण्यासारखी नव्हती आणि हे सहज माहीत असलेले नाव सांगून त्याला त्यात गुंतवून आमच्या प्रतिहेरखात्याचे काम वाढविण्याचा प्रयत्न या लबाड अधिकाऱ्याने कशावरून केला नसेल, अशी कल्पना माझ्या मनात आली.

## संशयिताची झडती

व्हेर्लूपच्या बाबतीतदेखील यथाक्रम सगळे विधी पार पाडण्यात आले. त्याची कसून झडती घेण्यात आली आणि झडतीत सापडलेल्या साऱ्या वस्तू माझ्यासमोर ठेवण्यात आल्या. त्या वेळी स्वतः व्हेर्लूपला एका कोठडीत डांबून ठेवून त्याच्यावर पहारा बसविण्यात आला होता. उलटतपासणी सुरू करण्यापूर्वी संशयीत व्यक्तीकडे आढळणाऱ्या सगळ्या वस्तूंची कसून पाहणी करणे आवश्यक असते.कारण या वस्तूंवरून संशयिताच्या व्यक्तिमत्त्वावर बराच प्रकाश पडण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ एखादा संशयित मनुष्य आपल्याजवळ कंगवा, छोटीशी कात्री, नखे घासण्याची कानस अशा वस्तू बाळगीत असेल तर तो स्वतःच्या दिसण्याची फार काळजी घेत असला पाहिजे, आपल्या देखणेपणाचा त्याला गर्व वाटत असला पाहिजे, असे अनुमान काढणे कठीण नाही किंवा आपल्या पाकिटात बीभत्स, अश्लील चित्रे बाळगणाऱ्या माणसाचे लैंगिक जीवन उघडच समाधानकारक नाही आणि या अनुमानांच्या आधारे, उलटतपासणी घेणाऱ्या अधिकाऱ्याला आपल्या प्रश्नावलीची सिद्धता करता येते.

पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की ज्या साधनांच्या साहाय्याने संशयित मनुष्य शत्रूशी संधान बांधीत असतो ती साधने किंवा त्यांच्याशी संबंधित वस्तू संशयिताजवळ असण्याचा संभव असतो. मिळविलेली माहिती शत्रूला कळविता आली

नाही तर फितुरी करण्याचा काहीच उपयोग नाही. साहजिकच ही माहिती कळविण्याच्या दृष्टीने अनेक युक्त्याप्रयुक्त्या योजल्या जात असत. उदाहरणार्थ, जर्मनांनी अगदी साध्या फाऊंटनपेनच्या नळीत बसविता येईल असा अत्यंत छुपा कॅमेरा शोधून काढला होता. त्या कॅमेऱ्याने टाचणीच्या डोक्याएवढे सूक्ष्म छायाचित्र घेता येई. आणि हे छायाचित्र शंभरपट मोठे केल्यानंतरदेखील तितकेच स्पष्ट आणि रेखीव राहील याचीही काळजी त्यांनी घेतली होती. कोठल्यातरी तटस्थ देशात पाठविल्या जाणाऱ्या पत्रावर लावलेल्या टपाल-तिकिटाखाली फोटोची ही निगेटिव्ह ठेवणे शक्य होते. आणि पत्रावरील पत्ता संशयास्पद ठरेपर्यंत कधीही त्या निगेटिव्हचा शोध लागणे सुतराम अशक्य होते.

## संशयास्पद दैनंदिनी

म्हणून माझ्या टेबलावर गोळा झालेल्या व्हेर्लूपच्या वस्तूंची मी कसून पाहणी केली. खरे सांगायचे तर सर्वसामान्यपणे सहज कोणाजवळही आढळाव्यात अशाच वस्तू होत्या त्या. त्याच्या फाऊंटनपेनचे नळकांडे आणि टोपण मी बारकाईने पाहिले; पण त्यात संशयास्पद काहीही नव्हते. त्याच्या रुमालावर एखादा नकाशा काढलेला नव्हता आणि त्याच्या पाकिटात असणाऱ्या चलनी नोटा ज्या वेळी प्रखर प्रकाशात धरल्या त्या वेळी त्यांच्यावर कसलीही गुप्त अक्षरे प्रकट झाली नाहीत. त्याच्या घड्याळाचा पट्टा मी उसवून पाहिला, त्याची काच काढली, केस उघडली पण तेथेही संशयास्पद काही आढळले नाही. त्याच्या पाकिटात नोटांशिवाय त्याचे ओळखपत्र, काही टपालाची तिकिटे, एक स्मितमुखी स्त्री आणि लहान मुलगी यांचे छायाचित्र आणि छोटीशी दैनंदिनी होती. दैनंदिनीचे मला कुतूहल वाटले. तिच्या प्रत्येक पानावर, अगदी त्या दिवसापर्यंत काही आकडे लिहिलेले होते आणि त्यात काही सांकेतिक अर्थ असावा, असे मला वाटले. व्हेर्लूपला प्रश्न विचारताना या दैनंदिनीवर लक्ष केंद्रित करण्याचे मी ठरविले. याशिवाय आणखी एकच वस्तू त्याच्याजवळ होती आणि ती म्हणजे एक आगपेटी.

या एवढ्या थोड्या आणि साध्या वस्तूंची माझ्या पद्धतीने तपासणी करण्यात सगळी सकाळ खर्च झाली. व्हेर्लूपला सकाळचे जेवण लवकर देण्याची व्यवस्था मी केली. मी स्वत: लवकर जेवण घेतले. आणि दुपारी एक ही उलटतपासणीची वेळ निश्चित केली.

बरोबर एक वाजता मी व्हेर्लूपला माझ्यापुढे आणण्यास फर्माविले. व्हेर्लूप माझ्या खोलीत आला आणि शरीररक्षकाला मी बाहेर जाण्यास सांगितले. व्हेर्लूपला हातानेच मी समोरच्या खुर्चीवर बसण्यास सांगितले आणि क्षण-दोन क्षण त्याचे बारकाईने निरीक्षण केले. निर्मळ डोळ्यांचा, रुबाबदार दिसणारा, तिशीतील तरुण वाटला तो मला. हेन्ड्रिकने प्रकृतीबद्दलच्या त्याच्या आस्थेवाईकपणाबद्दल आधीच पुष्कळ सांगून ठेवले होते; आणि खोलीत येताना त्याने जी काही मोजकीच पावले

टाकली त्यांवरून मला ते सहज पटले. मी त्याच्यासमोर सिगारेटचे पाकीट टाकले. त्याने मोठ्या रुबाबात, हातानेच खुणावून सिगारेट नाकारली. ते योग्यच होते म्हणा. आपल्या प्रकृतीची इतकी काळजी घेणाऱ्या माणसाला सिगारेटसारखे व्यसन असेलच कसे ? मी सिगारेट पेटविली आणि व्हेर्लूप धो धो बोलतच सुटला. आपल्याच देशाने संशयित म्हणून आपल्यासारख्या निष्ठावंत देशभक्ताला अटक करावी या घटनेने तो गोंधळला होता, पिसाळला होता. "आणि अटकसुद्धा दिवसाढवळ्या ? " व्हेर्लूप कडवटपणे म्हणाला, "आणि तीदेखील माझ्या घरात ! सारे शेजारीपाजारी पाहत असताना ! मी तुम्हांला सांगतो, या चिखलफेकीतून काही सुटका होत नाही माझी. मी निरपराध आहे हे माहीत आहे मला; आणि तुम्हांलादेखील लवकरच खात्री पटेल त्याची. पण माझ्या सगळ्या मित्रांना काय वाटेल ? ते फितूर म्हणूनच बोट दाखवतील माझ्याकडं आणि माझ्या पाठीमागं नाही नाही ती कुजबुजदेखील करतील."

"तुझ्याबद्दलच्या इतक्या गलिच्छ आरोपांवर विश्वास ठेवायला तत्पर असलेल्या त्या लोकांना मित्र कशाला म्हणायचं ?" मी व्हेर्लूपला सांगितले, "व्हेर्लूप, तू काही काळजी करू नकोस. तू म्हणतोस तसा तू खरोखरच निरपराध असलास तर शेजाऱ्यापाजाऱ्यांची तशी खात्री पटविण्याची जिम्मेदारी मी घेतो, मग तर झालं ? "

"ते ठीक आहे. पण माझ्यावर आरोप तरी कसला आहे ? " त्याने रागावून विचारले, "आणि माझ्यावर आरोप ठेववतो तरी कसा तुम्हांला ? मी जर युद्धकाळात नुसताच फालतूपणं वेळ घालविला असता आणि युद्धाप्रयत्नांना काहीच मदत केली नसती तर एक वेळ हे समजण्यासारखं तरी होतं. मी भूमिगत चळवळीत काम केलंय. माझा जीव धोक्यात घातलाय. आणि त्याचं हे असलं बक्षिस मिळावं मला ? तुम्ही आमच्या प्रमुखाशी–खुद्द हेन्ड्रिकशी–का नाही बोलत ? तो चांगला मनुष्य आहे; आणि देशासाठी मला शक्य होतं तितकं सारं मी केलं आहे याची साक्ष देईल तो तुम्हांला."

मी काही बोललो नाही. मात्र मला थोडे हसू आले. मी त्याला तसेच थोडे बोलू दिले आणि मग एकदम मध्येच अडवून सांगितले, "कॉर्नेलिस व्हेर्लूप, असं पाहा, जितक्या लवकर आपण आपल्या कामाला सुरुवात करू तितक्या लवकर तू म्हणतोस त्याप्रमाणं निरपराध असल्याची खात्री पटविण्याची संधी मिळेल तुला. तेव्हा आता मला तुझ्याबद्दलची सगळी माहिती सांग. तुझं वय, तुझं काम, भूमिगत चळवळीत तू कसा सामील झालास–असं जे तुला महत्त्वाचं वाटेल ते सगळं सांग. आणि सावकाश सांग. घाई करायचं काही कारण नाही."

## नोकरी करणं अपरिहार्य

व्हेर्लूप बोलायला उत्सुक होताच. त्याने आपले निवेदन अस्खलित चालू ठेवले. शाळेमध्ये आपण असामान्य क्रीडापटू होतो आणि चारशे व आठशे मीटर्स अंतराच्या

धावण्याच्या कित्येक शर्यतींत आपण अनेक पदके मिळविली असल्याचे त्याने अभिमानाने सांगितले. त्याशिवाय तो उत्कृष्ट जलतरणपटू होता आणि आपल्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व त्याने केले होते. हॉलंडमध्ये जलतरणपटूंचा दर्जा नेहमीच उत्कृष्ट असतो. त्यामुळे त्यांतील व्हेर्लूपच्या कौशल्याबद्दल माझी खात्री पटली. शाळेत असताना पुस्तकांशी त्याचे फारसे जमले नाही. परंतु पहिल्यापासून विद्युत्-यंत्रांबद्दल त्याला फार कुतूहल होते; इतकेच नव्हे तर त्यात चांगली गतीही होती. आणि म्हणून एकोणिसशेबत्तीस साली, जेव्हा त्याने शाळा सोडली, त्या वेळी तो स्थानिक रेडिओ कारखान्यात जाणे स्वाभाविकच होते. कारखान्यात त्याने मन लावून काम केले. कारखान्याच्या जलतरणसंघात त्याचा अंतर्भाव झाल्याने व्यवस्था-पकांच्या तो नजरेत भरला. अनेक वरच्या वरिष्ठ सहकाऱ्यांना डावलून त्याच्या खात्यात त्याला ज्युनियर फोरमनची जागा देण्यात आली होती आणि एकोणिसशे एकूणचाळीस साली, युद्ध सुरू होण्यापूर्वी थोडे दिवस, त्याचे लग्न झाले. त्या सुमारास, अवघ्या चोविसाव्या वर्षी, त्याला खातेप्रमुख नेमण्यात आले एकोणिसशे-चाळीस साली त्याला एक मुलगी झाली, आणि जर्मनांनी हॉलंडवर आक्रमण करून त्यांच्या युद्धयंत्रणेला मदत करणारे प्रत्येक औद्योगिक केंद्र हस्तगत केल्यानंतरदेखील व्हेर्लूप कारखान्यात काम करीतच होता.

या ठिकाणी मी त्याला काही प्रश्न विचारण्याचे ठरविले. " एकोणिसशे एकुण-चाळीस साली तर तू चांगलाच जवान होतास, " मी म्हटले, " मग फ्रेंच आणि ब्रिटिशांनी जर्मनीशी युद्ध पुकारलं तेव्हा डच सैन्यात का सामील झाला नाहीस तू ? सुरुवातीला हॉलंड युद्धात पडलं नव्हतं हे खरं आहे; परंतु सैन्याचा विस्तार तर वाढविला असेल की नाही ? आणि त्यांना स्वयंसेवकांची गरजदेखील असणार. "

व्हेर्लूप थोडासा हसला. म्हणाला, " मी सांगतो ते फार शूरपणाचं किंवा देशा-भिमानाचंदेखील वाटणार नाही कदाचित; पण आमच्यापैकी बहुतेकांची युद्धाशी आपला काही संबंधच नाही अशी भावना होती. " व्हेर्लूप पुढे स्पष्टीकरण करू लागला, " नाही म्हटलं तरी पहिल्या महायुद्धात हॉलंड तटस्थ होतं आणि याही महायुद्धात आपण तटस्थच राहू असं बहुतेकांना वाटत होतं. त्याशिवाय, माझ्या-पुरतं बोलायचं तर, मी लग्न करून बसलो होतो. त्यामुळे नोकरी करणं अपरिहार्य होतं मला. "

## जगा आणि जगवा

मी मान हलविली. व्हेर्लूपने अगदी स्पष्ट उत्तर दिले होते. युद्धाच्या सुरुवातीला तरी, सारे पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्याकडे लोकांचा कल होता; आणि जेव्हा झंझा-वाती वेगाने जर्मनांनी देशांमागून देश पादाक्रांत केले तेव्हा कुठे पराभुतांना युद्धाची खरी कल्पना आली.

मी प्रश्न विचारणे चालूच ठेवले, "तू आताच सांगितलंस मला की, एकोणिसशे बेचाळीस साली तू भूमिगत चळवळीत सामील झालास. म्हणजे नाझींनी हॉलंड पादाक्रांत करून दोन वर्षं झाल्यानंतर. ही एवढी दिरंगाई का व्हावी ?"

व्हेर्लूपने खांदे उडविले. "तुम्ही माझ्या जागी आहात अशी कल्पना करा, साहेब." तो म्हणाला, "म्हणजे माझं म्हणणं कळेल तुम्हांला. खरं सांगायचं तर मला कसलीही जोखीम नको होती. मला चांगली नोकरी होती. बायको आणि मुलगी सर्वस्वी माझ्यावर अवलंबून होती. जर्मनांनी अनेक लोकांना वाईट वागवलं हे ठाऊक आहे मला. पण ते सहन करण्यावाचून आपल्याला गत्यंतरच नसतं. व्यक्तिश: माझ्या बाबतीत बोलायचं तर जर्मन अधिकारी फार चांगलं वागले माझ्याशी. आपलं काम निमूट आणि व्यवस्थित केल्यावर ते तरी कशाला त्रास देतील ? शिवाय मी काम सोडलं असतं तर दुसरा कोणी ते काम करायला मिळाला नसता असं थोडंच होतं ? त्यामुळं काम चालू ठेवण्यात मी काही देशद्रोह केला असं नाही वाटत मला. बरं, तुमचं काम चांगलं असलं तर कधीकधी त्यांच्याकडून मेहेरबानीदेखील व्हायची. कुठं लोणी म्हणा, कुठं जादा साखर म्हणा, अशी गोष्टी मिळायच्या. बायको आणि लहान मूल सांभाळायला लागलं म्हणजे या गोष्टींचं मोल कळतं, साहेब."

माझ्या चेहऱ्यावरची प्रतिक्रिया त्याने पाहिली असावी म्हणून तो घाईघाईने म्हणाला, "गैरसमज करून घेऊ नका आपण. मी आपला मार्ग सोडून जर्मनांना वेगळी मदत करण्याचा कधीही प्रयत्न केला नाही, साहेब. मी फक्त माझं काम केलं. ते मात्र नीट, व्यवस्थित केलं. पण तेवढंच. त्यापलीकडे त्यांना मदत करण्याइतका हलकट नव्हतो मी. पण त्याबरोबरच, मला वाटतं, वीरपुरुष होणं, शौर्य गाजवणं, यासाठी जन्मच नाही माझा. जगा आणि जगवा हे तर आपलं ब्रीदवाक्य होतं, साहेब !"

## बायकोनं मन वळवलं

मी काही न बोलता नुसती मान हलविली. मी खरोखरच त्याला दोष देऊ शकत नव्हतो. ज्याच्या भूमीत पार रोवून परकीय सेना कधी राहिलीच नाही, त्याला जित-जेत्यांच्या गुंतागुंतीच्या परस्परसंबंधांची पुरेशी कल्पना येणे कठीणच असते. म्हणून व्हेर्लूपच्या वर्तनावर भाष्य न करता मी त्याला विचारले, "मग भूमिगत चळवळीत कसा काय सामील झालास तू ?"

"गमतीची गोष्ट अशी की, सरतेशेवटी माझ्या पत्नीनं मन वळवलं माझं. इथल्या भूमिगत चळवळीचा म्होरक्या—हेन्ड्रिक-पहिल्यापासूनच मागं लागला होता माझ्या. माझ्या कामाचं स्वरूपच असं होतं की त्यामुळं मला सर्व कारखान्यांत फिरावं लागे, हे हेन्ड्रिकला ठाऊक होतं. त्यामुळं दगाफटका करून किंवा कारखान्यात कोणत्या प्रकारचं साहित्य निर्माण केलं जात आहे आणि ते कुठं आणि कसं पाठविलं जाणार आहे याची माहिती देऊन मला भूमिगत चळवळीला मदत करता

यईल अशी त्याची कल्पना होती; परंतु जर्मनांची मालावरील देखरेख अत्यंत करडी होती आणि दगाफटका झाल्यास त्याचं उगमस्थान ते सहज शोधू शकले असते. म्हणून मी तसा धोका पत्करायला तयार नव्हतो. तसं हेन्ड्रिकला मी स्पष्ट सांगितलंदेखील. पण अखेर काही विशेष माल कारखान्यातून बाहेर पाठविला जाणार असेल तर त्याबद्दलची पूर्वसूचना हेन्ड्रिकला देण्याची तयारी मी दर्शविली. कारण स्टेशनात उभ्या असलेल्या मालगाडीतल्या महत्त्वाच्या साहित्याचा विध्वंस हेन्ड्रिकनं आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केला तर ती माझी जबाबदारी नव्हती."

"तेव्हा भूमिगत कार्यकर्त्यांना गुप्त माहिती पुरवून आपल्या कामाला सुरुवात केलीस तू, असंच ना?"

"होय. हे माहिती पुरविण्याचं काम कित्येक महिने चाललं. मग यातूनच दुसरं काम उद्भवलं. कारखान्यातल्या अनेक प्रयोगशाळांपैकी ज्या एका प्रयोगशाळेत काही गुप्त प्रयोग चालत असत ती प्रयोगशाळाच एका रात्री उडवून लावण्याचा बेत हेन्ड्रिकनं योजला. कारखान्याची सर्वांत जास्त माहिती मला होती. त्याशिवाय जर्मन पहारेकऱ्यांच्या गस्तीच्या वाटादेखील मला माहीत होत्या. त्यामुळं या मोहिमेत मार्गदर्शनाचं महत्त्वाचं काम माझ्यावर पडलं. उभ्या आयुष्यात मी एवढा भेदरलो नव्हतो."

मला व्हेर्लूपबद्दल थोडी आस्था वाटू लागली होती. त्याच्या बालिश हास्याची माझ्यावर मोहिनी पडली होती. आपल्या क्रीडानैपुण्याचा त्याला अहंकार आहे असे सुरुवातीला मला वाटले होते; पण आता मात्र आपल्याजवळ शौर्य-धैर्य नसल्याची त्याची प्रामाणिक कबुली ऐकून मला आल्हाद वाटला होता. मी त्याला पुढचा प्रश्न विचारला, "एकूण एकोणिसशेबेचाळीसच्या अखेरीला तू या भूमिगत चळवळीत सामील झालास. आता माझ्या हाती आलेल्या माहितीवरून असं दिसतं की तू मोठा दैववान असावास. तू ज्या मोहिमेत होतास त्या गनिमी मोहिमेवर जर्मनांची, त्यांचा बंदोबस्त कडक असूनही, कधी धाडच पडली नाही आणि तू नसलेल्या मोहिमेवर मात्र जर्मनांची धाड अचूक पडायची. याचं काही स्पष्टीकरण देऊ शकशील का तू?"

त्याने अगतिकपणे आपले हात पसरून म्हटले, "कसं देणार? असं घडतं कधी कधी! पत्त्यांच्या खेळात काही लोक सतत जिंकतात आणि काही बिचारे सतत हरतात, ते का? हा नशिबाचा मामला आहे, साहेब. माझ्याबद्दलच्या अफवांची पूर्ण कल्पना आहे मला. या भूमिगत चळवळीत ज्या लोकांचा बळी गेला त्यांच्या बायकांनी उठवल्या आहेत या अफवा. मात्र मी त्या बिचाऱ्यांना दोष देऊ शकत नाही. कारण मी बळी गेलो असतो तर माझी बायकोदेखील तसंच काहीतरी म्हणाली असती....पण त्यामुळं काही अफवा खऱ्या ठरत नाहीत. अफवा त्या अफवाच."

" पण मग ज्या मोहिमा तू टाळल्यास त्यांचं काय ? मला असं सांगण्यात आलं आहे की साधं सर्दी-खोकल्याचं निमित्तदेखील मोहीम टाळायला पुरायचं तुला."

" अगदी बरोबर माहिती आहे तुमची." व्हेर्लूप काहीसा रुष्ट होऊन म्हणाला. " कर्नलसाहेब, रात्रीच्या वेळी टेहळणीची कामं तुम्ही कधी केली आहेत की नाही, ते माहीत नाही मला. म्हणजे काय होतं, तुम्ही गर्द काळोखात श्वास रोखून उभे असता. तुमच्या आजूबाजूला कसले कसले चमत्कारिक आवाज होत असतात, कधी बुटांचा आवाज होतो तर कधी बंदूक सज्ज केल्याचा खटका वाजतो आणि तुम्ही पुतळ्यासारखे उभे राहून, आपण इथं आहो हे कोणाला कळू नये अशी परमेश्वराची करुणा भाकीत असता. आता अशा वेळी जर एखाद्या मूर्खाला झड-झडून शिंक आली किंवा खोकल्याची उबळ आली तर सारा खेळ खलास व्हायचा ! एका माणसाच्या खोकल्यापायी गटातल्या दहा माणसांचा प्राण हकनाक जायचा. सर्दी-खोकला झालेल्या एकाही माणसाला मी स्वतः कधी साथीला घेतलं नव्हतं; त्यामुळं मला सर्दी-खोकला झाला असताना मी कोणाबरोबर जाणं हे योग्य नव्हतं. माझं म्हणणं पटत नाही का तुम्हांला ?

" तुझ्या म्हणण्यात न पटण्यासारखं काहीच नाही " मी म्हटले. आणि व्हेर्लूपचे म्हणणे मला खरोखरीच पटत होते. मी त्याला पुढे विचारले, " पण तुझ्याबद्दल आणखी एक गोष्ट ऐकली मी. तू म्हणे कुठला तरी चुकीचाच पूल उडवून लावलास ?"

व्हेर्लूपचा चेहरा रागाने फुलला. तो म्हणाला, " हे सारं कुणी सांगितलं तुम्हांला, कळत नाही मला. पण तो माझा हितशत्रू असला पाहिजे हे नक्की ! हवा होता तो पूल न उडवता मी दुसराच पूल उडविला हे अगदी खरं. पण तेवढ्यावरून काही मी लगेच जर्मनांचा हस्तक ठरत नाही. निदान मी चुकीचा का होईना पण एक पूल तरी उडवला की नाही ? शाही विमानदलाची विमानं कधीकधी मोहिमेवर जातात आणि त्यांचा मारा सपशेल हुकतो अगदी. पण म्हणून काही तो कर्णधार आणि त्याचे साथीदार शत्रूला सामील आहेत, असं म्हणतं का कुणी ?"

व्हेर्लूपच्या या प्रश्नाला उत्तर देणे मला शक्य नव्हते. आतापर्यंतच्या व्हेर्लूपच्या स्पष्टवक्तेपणाने आणि माझ्या प्रश्नांना त्याने दिलेल्या नेमक्या आणि समाधान-कारक उत्तरांमुळे मी प्रभावित झालो होतो. आपण वीरपुरुष वगैरे कोणी नाही अशी मोकळी कबुली त्याने दिली होती; आणि तरीदेखील आपल्या कुवतीप्रमाणे देशसेवेचा वाटा उचलला होता. हेन्ड्रिक अत्यंत निश्चयी आणि कठोर होता. आणि त्याच्या उच्च अपेक्षा पुऱ्या करण्यास व्हेर्लूप असमर्थ ठरल्यामुळे हेन्ड्रिकचे मूल्यमापन त्याच्या बाबतीत चुकलेले असावे, असे मला वाटले. या दिशेने माझे विचार पुढे सरकत असताना मी दुसरी सिगारेट काढली आणि अभावितपणे पाकीट व्हेर्लूपकडे सरकविले. व्हेर्लूप हसला आणि माझा हात बाजूला करीत तो म्हणाला, " नाही

सिगारेट नाही ओढीत मी."

"माफ कर. ही गोष्ट मी आपला सारखा विसरूनच जातो. सिगारेट प्रकृतीला अपायकारक असते असं तुझं मत आहे, नाही का?"

## हे कसले आकडे?

सिगारेटचे पाकीट टेबलावर त्याच्या पैशाच्या पाकिटाजवळच पडले होते. मी ते पैशाचे पाकीट उचलले आणि त्यातील एक छायाचित्र पाहत व्हेर्लूपला विचारले, "तुझी बायको आणि छोकरी का ही?"

"होय" त्याने साभिमान उत्तर दिले.

"वा: छान आहेत हं दोघी. आणि हे काय —?"— एका लांबट चौकोनी कार्डाला उद्देशून मी म्हटले. ते कार्ड शुभ्र होते. त्याच्या एका बाजूला काही मजकूर छापला होता. दुसरी बाजू मात्र कोरी होती. मजकूर असलेल्या बाजूच्या कोपऱ्यात व्हेर्लूपचा स्वतःचा फोटो होता, आणि त्याखाली त्याची सही होती.

"ते होय? — तो कारखान्याचा पास आहे माझा." व्हेर्लूपने सांगितले, "बहुतेक सगळ्या कामगारांचा पास हिरव्या रंगाचा आहे. तो पास दाखविल्याशिवाय मुख्य दरवाज्यातून आत जाता येत नाही त्यांना. माझा हा पांढरा पास मात्र वेगळा आहे. या पासावर कारखान्याच्या सगळ्या विभागात मुक्तद्वार आहे मला."

"असं होय?" मी सहज म्हटले. दैनंदिनीसंबंधीचा हुकमी प्रश्न आता विचारावा असे मला वाटले. व्हेर्लूपची छोटीशी दैनंदिनी मी उचलली आणि तिची पाने चाळू लागलो. पाने चाळताचाळता व्हेर्लूपचा चेहरा मी बायकाईने निरखीत होतो. परतु त्यावर कसलाच बदल झालेला मला दिसला नाही. मी म्हणालो, "व्हेर्लूप, यात प्रत्येक पानावर काही आकडे लिहिलेले आहेत. हे बघ. इथे ६६·५ असा आकडा आहे. त्याच्यापुढे ६२ आणि नंतर १६. दुसऱ्या दिवशी पुन्हा ६६·४. मग ६४. मग पुन्हा १६. आणि असेच आकडे आत्तापर्यंत लिहिलेले आहेत. यांचा अर्थ सांगू शकशील का तू मला?"

व्हेर्लूपने ती दैनंदिनी माझ्या हातातून घेतली आणि काही पानांवरून नजर फिरविली. नंतरच्या त्याच्या प्रतिक्रियेने मी आश्चर्यचकित झालो. त्याने आपले डोके खुर्चीच्या पाठीवरून मागे फेकले आणि तो खदखदून हसला. हसतच राहिला. माझा आश्चर्यचकित भाव पाहून तो पुढे म्हणाला, "माफ करा. मी आपली क्षमा मागतो. मी असं मोठ्यानं हसायला नको होतं. तुम्हांला ते आकडे पाहून काय वाटलं त्याची कल्पना आहे मला. पण ते खरं नाही असं आश्वासन देतो मी तुम्हांला. त्या आकड्यांना कसलाही सांकेतिक अर्थ नाही साहेब. जर्मनांना गुप्त माहिती पुरवण्यासाठी त्या सांकेतिक आकड्यांचा उपयोग मी केला अशी जर तुमची कल्पना असेल तर ती साफ चुकीची आहे. त्याचा अर्थ अगदी साधा आहे. रोजच्या रोज, व्यायाम केल्यानंतर किंवा पोहून आल्यानंतर मी आपलं वजन घेतो,

नाडीचे ठोके मोजतो आणि श्वसनाचा वेग पाहतो – आणि त्यांची या दैनंदिनीत नोंद करून ठेवतो. पाहा, ६६·५ म्हणजे साडेसहासष्ट किलो – हे माझं वजन. ६४ – इतके त्या दिवशी भरलेले माझ्या नाडीचे ठोके. आणि १६–हा माझा दर मिनिटाला असलेला श्वसनाचा वेग. इतका साधा आणि सरळ हिशेब आहे हा सगळा."

हे स्पष्टीकरण ऐकल्यावर मीदेखील त्याच्या हास्याला साथ दिली. एखाद्या साक्षेपी क्रीडापटूने अशा तऱ्हेची नोंद ठेवणे योग्यच होते.

## आगपेट्यांचे रहस्य

व्हेर्लूपची दैनंदिनी चाळीत असताना, टेबलावरचे रक्षापात्र म्हणून काम करीत असलेल्या एका पत्र्याच्या डबड्यात मी माझी जळती सिगारेट ठेवली होती. आता जेव्हा मी पुन्हा उचलली तेव्हा ती विझली होती. मी चिडलो. अभावितपणे हात लांबवून व्हेर्लूपच्याच सामानात असलेली आगपेटी मी उचलली. ती उचलताना चुकून माझी नजर त्याच्या चेहऱ्याकडे गेली. एक क्षणभर त्याच्या चेहऱ्यावरून भीतीची एक छाया सरकत गेली असे मला वाटले. कदाचित मला तसा भास झाला असेल. आगपेटी हातात घेऊन मी तिचे वजन अजमावले आणि ती हलवली. तिच्यातील काड्या वाजल्या. मग मी ती उघडली आणि तिच्यातील काड्या ओळीने टेबलावर मांडल्या. मला वाटले, व्हेर्लूपने आपला श्वास रोधून धरला आहे.



सगळ्या काड्या प्रथम एकासारख्या एक दिसत होत्या. मग मी त्यांच्याकडे अधिक बारकाईने पाहिले. मग माझ्या लक्षात आले, त्या सगळ्या काड्यांमध्ये चार काड्यांच्या गुलाचा रंग इतरांपेक्षा थोडा फिकट होता. मी सरळ कॉर्नेलिस व्हेर्लूपच्या डोळ्याला डोळा भिडवला आणि म्हटले, " मी तुला एक गोष्ट सांगतो... चालेल ?...दोन वर्षांपूर्वी एका होडीमधून दोन डच भाऊ इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरले. जर्मनीचे पक्षपाती आहोत अशी बतावणी करून आपण त्यांच्याकडून हेर-

गिरीचं सारं शिक्षण घतलं आहे, अशी माहिती त्यांनी आमच्या वरिष्ठांना दिली. अधिकृत निर्वासित म्हणून इंग्लंडमध्ये राहावं आणि जर्मन गुप्तहेरखात्याला आवश्यक ती माहिती पुरवावी अशी कामगिरी जर्मन हेरखात्यानं त्यांच्यावर टाकली होती, असंही त्यांनी सांगितलं. पण जर्मनांचं दुर्दैव असं की ते दोघे डच बंधू सच्चे देशभक्त होते. जर्मनांना त्यांनी बेमालूम चकविलं होतं, आणि आता दोस्तांच्यासाठी काम करण्याची त्यांची तयारी होती. आपण खरोखरच दोस्तांचे पक्षपाती आहोत, दोस्तांना मदत करण्याची आपली कळकळ खोटी नाही हे खात्रीलायकपणे पटविण्यासाठी त्यांनी मुळी ज्या साधनांच्या साहाय्यानं जर्मन गुप्तहेरखात्याला ते माहिती पाठविणार होते ती साधनं आणि त्यांचं रहस्य आमच्यापुढं उघडं केलं. हा पुढचा भाग मी तुला सांगितलाच पाहिजे काय ?"

"तुमची इच्छा असेल तर सांगा. पण याचा माझ्याशी संबंध काय ते अजूनही ध्यानात येत नाही माझ्या."

"असा त्रागा करू नकोस. हवंच असेल तर सांगतो मी सारं. त्या डच भावांजवळ केवढ्यातरी आगपेट्या होत्या. त्या आगपेट्यांमध्ये असलेल्या काड्यांपैकी काही आपल्या नेहमीच्या काड्या होत्या म्हणजे त्यांनी सिगारेट–बिगारेट पेटविता यायची. पण तू तर मुळी सिगारेटच ओढीत नाहीस. खरं की नाही ? मला आपला पुन्हा पुन्हा विसर पडतो या गोष्टीचा. पण नेहमीच्या काड्यांबरोबर ज्या दुसऱ्या काड्या होत्या त्या मात्र बनावट होत्या. त्यांचं गूल काही खास रासायनिक द्रव्यांपासून बनविण्यात आलं होतं. ते गूल ओलं केलं म्हणजे त्याच्या साहाय्यानं कागदावर अदृश्य अक्षरं लिहिता यायची. या बनावट काड्या अगदी खऱ्या काड्यांसारख्या होत्या. फरक इतकाच की बनावट काड्यांचं गूल खऱ्या काड्यांपेक्षा थोडंसं फिकट रंगाचं होतं, म्हणजे आता या आपल्यासमोर असलेल्या चार काड्यांचं आहे ना तसं. काय ? आता तरी सिगारेट ओढणार का माझ्याबरोबर ?... बघ, मी पुन्हा विसरलो तू तर मुळी सिगारेटच ओढीत नाहीस, नाही का ? तुझ्या तंदुरुस्तीला त्यांनी अपाय होईल, नाही ? पण अशा सिगारेट न ओढणाऱ्या माणसानं आपल्या सिगारेट ओढणाऱ्या मित्रांच्या सोयीसाठी स्वतःजवळ आगपेटी बाळगणं ही परोपकाराच्या भावनेची कमालच म्हटली पाहिजे. बघ हां, आता मी ही फिकट गुलाची काडी पेटवून पाहतो...अरेच्या, ही तर बेटी पेटतच नाही. अगदीच निरुपयोगी आहे ही काडी. पण निरुपयोगी म्हणावी तर तिचीही काही खास उपयुक्तता आहे,-नाही का, व्हेर्लूप ? जर्मनांनी मोठ्या धोरणीपणानं देऊ केलेला खास पास आपल्याजवळ आहेच. त्या पांढऱ्या पासाची एक बाजू छान कोरीच आहे. त्या बाजूला या खास काड्यांनी भूमिगत चळवळीसंबंधी माहिती लिहायची. कारखान्याच्या गुप्त विभागात प्रवेश करण्यापूर्वी दारावर असलेल्या पहारेकऱ्याच्या हाती सहज हा पास द्यायचा; आणि पुन्हा एक-दोन तासांनी बाहेर पडताना त्यानं तो आपल्याला परत

करायचा! –हा असा सारा प्रकार घडत असला पाहिजे, नाही का व्हेर्लूप ?"

## शरणागती

मी खुर्चीत मागे रेलून बसलो आणि अपेक्षित असे विकार व्हेर्लूपच्या चेहऱ्यावर उमटतात किंवा नाही ते पाहू लागलो. त्याने डोळ्यांची उघडझाप केली आणि आवंढा गिळला. मी नुसते त्याच्याकडे रोखून पाहिले आणि उजव्या हाताचा अंगठा आणि तर्जनी यांत दोन-तीन फिकट गुलाच्या काड्या धरून, त्या खेळवीत त्याच्याशी बोलू लागलो. व्हेर्लूप भारल्यासारख्या काड्यांकडे पाहत राहिला आणि अल्पावधीतच त्याने शरणागती पत्करली.

मग त्याने आपली साद्यंत कहाणी सांगितली. भूमिगत चळवळीत तो प्रामाणिकपणाने सामील झाला होता. अर्थात मागे सांगितल्याप्रमाणे त्याची बायकोच त्याला कारण होती. त्याच्या नाकर्तेपणावरून ती त्याला सतत टोचून बोलत असे; इतकेच नव्हे तर भूमिगत चळवळीत सामील होईपर्यंत तिने मुळी त्याच्याशी शैय्यासोबत करायलाच नकार दिला होता भूमिगत चळवळीमध्ये सामील होण्याइतका पुरुषार्थ जर त्याच्याकडे नसेल तर रतिक्रीडेतदेखील त्याने आपला पुरुषी अधिकार बजावू नये, असे तिने स्पष्ट सांगितले होते. म्हणून तो चळवळीत सामील झाला खरा; पण त्याचे मन त्यात नव्हते. थोड्याच काळात त्याचा धीर सुटला होता. तो सरळ जर्मनांकडे गेला आणि भूमिगत चळवळीबद्दल माहिती पुरविण्याच्या बदल्यात त्याने आपल्या प्राणांची भिक्षा मागितली. जर्मनांनी हेन्ड्रिकच्या टोळीत राहण्यासाठी त्याला प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर तो ज्या मोहिमेत असेल त्या मोहिमेला अभयदान देण्याची व्यवस्था केली. इतकेच नव्हे तर संशय येऊ नये म्हणून एका प्रसंगी दुसरा चुकीचा पूल उडवायचीदेखील संधी जर्मनांनी त्याला दिली. त्यात भूमिगत चळवळीतील आपला वाटा व्हेर्लूप नेकीने उचलीत आहे, अशी त्याच्या सहकाऱ्यांची समजूत व्हावी हा उद्देश अगदी स्पष्ट होता.

देशद्रोह आणि हेरगिरी या आरोपांवरून हॉलंडमध्ये व्हेर्लूपवर खटला भरण्यात आला. देहांताच्या शिक्षेतून तो कसावसा सुटला. पण त्याला जन्मठेप भोगावी लागली.

व्हेर्लूपच्या रहस्यभेदाला दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. एक म्हणजे स्वतः सिगारेट ओढीत नसतानादेखील जवळ आगपेटी बाळगून लक्ष वेधून घेण्याची चूक त्याने केली होती, आणि दुसरी म्हणजे ज्या गुप्त साधनांतील गुप्तता उघड झाली होती तेच गुप्त साधन त्याच्या हाती सोपविण्याचा आंधळा दुराग्रहीपणा त्यांच्या जर्मन मालकांनी केला होता.

## समाप्त

# पुस्तके

## एक अभिनंदनीय प्रयत्न ‘ चित्रपट–कथा ’

**रतनलाल भंडारी**

‘ चित्रपट–कथा ’ म्हटल्याबरोबर आपल्या नजरेपुढे साधारणतः पटकथांचा (Screen-Play) सांगाडा उभा राहतो. हवालदारांच्या या सहाही पुस्तकांमध्ये कथा–चित्रपट कथा–पटकथा असा क्रम नसून कथा–पटकथा–चित्रपट कथा असा क्रम आहे. त्यामुळे या चित्रपट–कथा प्रत्यक्ष रुपेरी पडद्यावरच्या त्यांच्या दर्शनाच्या बऱ्याचशा जवळ गेल्या आहेत. चित्रपटांशी त्या अधिक प्रामाणिक आहेत.

या सर्व अठराच्या अठरा कथा परदेशी चित्रपटांच्या आहेत. अमेरिकन मासिकांमध्ये चित्रपटांच्या कथा प्रसिद्ध केल्या जातात. “ चित्रपटात असलेले सारे सारे सांगणे ” हाही प्रसिद्धीच्या तंत्राचा एक भाग असतो. निव्वळ अमेरिकेतच नव्हे तर जगभर अशा कथांचा एक खास वाचकवर्ग तयार झालेला आहे. मराठीतील त्यांच्या रूपांतरामुळे वाचकांची दोन तऱ्हेने सोय होते. काही चित्रपट भाषेच्या अडचणीमुळे काही प्रेक्षकांना समजत नाहीत त्या समजण्याची सोय होते. काहींना पुनप्रत्ययाचा आनंद मिळतो.

‘ चित्रपट–कथां ’मध्ये घटनांना एक प्रकारचा वेग असतो. त्यात शिथिलता आली तर त्या निरस आणि कंटाळवाण्या होतात. या सर्व चित्रपटकथांचा आवश्यक तो वेग राखण्यात हवालदार बरेचसे यशस्वी झाले आहेत.

मराठी वाङ्मयात श्री. श्रीकृष्ण हवालदार हे सातत्याने चित्रपटविषयक साहित्य लिहीत आहेत. त्यांच्या लिखाणाचे स्वरूप बरेचसे नियमित असल्यामुळे त्यांमध्ये स्थितिदर्शन स्वाभाविकच आलेले आहे, तरीसुद्धा त्यांनी या कथांचे स्वतंत्र

**[“ गाजलेल्या चित्रपट–कथा ” भाग १ ते ६. मूल्य–प्रत्येकी १। रुपया. निवेदक– श्रीकृष्ण हवालदार. प्रकाशक – रम्यकथा प्रकाशन, ३९२, नारायण पेठ, पुणे २. ]**

प्रकाशन केल्यामुळे त्यांच्या आजवरच्या या क्षेत्रातील धडपडीची दखल घेतली जाणे आवश्यक आहे. कधी कधी अशा प्रयत्नांना 'त्यात काय विशेष' म्हणून दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती असते. त्यांनी आजवर निव्वळ हॉलिवूडच्याच नव्हे, तर युरोपीय देशांमधील चित्रसृष्टीचेही दर्शन अभ्यासपूर्ण रीतीने घडविले आहे. त्यांच्या या प्रयत्नांतून 'डॅनिश' चित्रसृष्टीही सुटलेली नाही. त्यामुळे श्रीकृष्ण हवालदारांचे चित्रपटविषयक लेखन व प्रस्तुनच्या चित्रपट–कथा खास आवडीने वाचणारा फार मोठा वाचकवर्ग निर्माण झालेला आहे. त्यांचे रशियन चित्रसृष्टीवरील लेख तर त्यांच्या सातत्याने केलेल्या परिश्रमाचीच साक्ष देत असतात.

चित्रपट–कथा हा एक वाङ्मय प्रकार आहे. या संग्रहामधून सगळ्या कथा 'गाजलेल्या' चित्रपट–कथा नसल्यातरी 'माय गैशा,' 'वेस्ट साईड स्टोरी'-सारख्या अनेक चित्रपट–कथांचा समावेश यांमध्ये आहे. अशाच पद्धतीने मराठी–हिंदी चित्रपटांच्या गाजलेल्या कथा नियमितपणे का प्रसिद्ध होऊ नयेत? मराठीत 'चित्रकथा' अशा नावाखाली आचार्य अत्र्यांच्या चित्रपटांच्या पटकथांचा संग्रह प्रसिद्ध झालेला होता. त्यानंतर काही किरकोळ मासिकांद्वारे प्रसिद्ध झालेल्या फुटकळ पट–कथा सोडल्या तर वाङ्मयाचे हे दालन अद्यापही अप्रकाशितच आहे.

□ □ □


# इझिडेन्ट

लहान मुलांना दात सुलभ रीतीने येण्यास मदत करते.

ताप, जुलाब, सर्दी वगैरे कोणताही त्रास होत नाही.

प्रतिबंधक म्हणून चौथ्या महिन्यातच सुरू करा.

उत्पादक :

**न्यू इरा**
**होमिओपॅथिक फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर
(पश्चिम) मुंबई – २८.

**एजन्सी नसलेल्या गावी**
**एजन्टस् नेमणे आहेत.**



मी जनरल प्रसादना कळवले, ‘ ताबडतोब मला हेलिकॉप्टर पाठवा. इथून पुढे माझ्या तुकडीचे नेतृत्व करणे मला अशक्य आहे. ’ आणि पुढे मी बोलू नये ते शब्द बोलून गेलो......

लष्करीदृष्टच्या सांगले हे ठिकाणी निरुपयोगी होते. भारत सरकारला चिन्यांशी वाटाघाटी करायच्या का त्यांना धडा शिकवायचा या वैचारिक गोंधळातून मार्ग सापडत नव्हता. भारत सरकारचा हुकूम सुटला होता की, ‘ Hold our present positions ! ’ उपयोगी असो किंवा निरुपयोगी असो; आपल्या कबजात असतील ती ठिकाणे सोडू नका. राजकीय आणि मानसिक विचारसरणी ही प्रत्येक वेळी ७ व्या पायदळ तुकडीला चिन्यांच्या तोफेच्या तोंडी देत होती. वस्तुतः सांगले ह्या ठिकाणाचा कबजा आपण ता. ४ ऑक्टोबरला केला होता. तत्पूर्वी तिथे कुणीच नव्हते. अडचणीत आलेल्या भारत सरकारला फक्त हे दाखवायचे होते की, ‘ आम्ही काहीतरी करतोय ! ’ परमेश्वरानेच जणू काही आम्हांला सुबुद्धी दिली की भारत सरकारला कळवा की अजून सांगले ‘ मोकळे ’ आहे. त्याचा कबजा घ्या ! म्हणून मला हुकूम सुटला की, “ सांगले हे ठिकाण सोडू नकोस ! ” आम्ही चिन्यांशी लढू शकतो, आमच्याकडे भरपूर सैन्य आहे हे भूतानी लोकांना समजावे म्हणून सांगले सोडायचे नाही. सुरुवातीपासूनच सांगले हे ठिकाण म्हणजे एक डोकेदुखी होती. तिथे जायला चांगला रस्ताच नव्हता. द्राविडीप्राणायाम करून सांगधरवरून

जावे लागत असे. तिथे सामान वाहून नेणाऱ्या हमालांनाच १० दिवसांचे अन्न बरोबर न्यावे लागे. थंडीपासून अगदी शंभर टक्के संरक्षण होऊ शकेल असे उबदार कपडे हमालांना द्यावे लागत. त्याशिवाय १५,५०० फूट उंचीवर ते कामच करू शकले नसते. पण त्यामुळे नाम-काचू-मध्ये प्रत्यक्ष लढणारे जवान रागावले. म्हणाले, "हे काय ? हमालांना उबदार कपडे आणि आम्हा लढणारांना काही नाही ?"

एकूण परिस्थिती पाहून मी जनरल प्रसादना म्हटले, "सांगले हे ठिकाण सोडून देण्याची मला परवानगी द्या. आपली शक्ती तिथं उगाच खर्च होत आहे." त्यावर जनरल प्रसाद मला म्हणाले, "तसं नाही करता येणार. कारण जनरल कौलचा असा सक्त हुकूम आहे की चिन्यांकडून हल्ला होऊन धोका उत्पन्न झाला तरच सांगले हे ठिकाण सोडून द्या. एरव्ही सोडू नका!" एवढ्यावरच भागले नाही. ता. १७ ऑक्टोबरला सांगले या ठिकाणी असलेल्या पंजाबी जवानांचे हात बळकट करण्यासाठी आणखी एक गुरखा 'पनी पाठवायचा हुकूम मला मिळाला आणि सर्वांत

---

अनुवाद . . . . . . . . . . . . . . . . . . ॲडव्होकेट माधव कानिटकर
लेखक . . . . . . . . . . . . . . . . . . ब्रिगेडिअर जे. पी. दळवी
लेखांक . . . . . . . . . . . . . . . . . . तेवीस

---

कहर म्हणजे ता. १९ ऑक्टोबरला मला असा हुकूम दिला गेला की, बाकीचे गुरखे पण सांगले या ठिकाणी पाठवून दे. नशीब की ही हालचाल मी घडवून आणली नाही. कारण तसे केले असते तर हास्यास्पद परिस्थिती निर्माण झाली असती. एकाच ठिकाणी पाच कंपन्या आणि १० मैलांच्या विस्तीर्ण प्रदेशात फक्त १० कंपन्या.

समोर चिनी अशी जबरदस्त तयारी करीत होते की, त्यांचे हेतू कुणाच्याही सहज लक्षात यावेत.

सांगले ह्या ठिकाणचा लढाईच्या दृष्टीने काय उपयोग आहे ते तरी सांगा; नाहीतर ते ठिकाण सोडून द्यायची परवानगी द्या असा जेव्हा मी हट्टाग्रह धरला तेव्हा मला सांगण्यात आले की, सांगले हे ठिकाण सांभाळणे हा 'उच्च पातळीवरून' (This move had been ordered at the highest level!) घेण्यात आलेला निर्णय आहे!

'लोकनियुक्त प्रतिनिधींचा सर्वोच्च अधिकार' या अजब भाषेचा खरा अर्थ कळायला हवा असेल तर हे 'सांगले' प्रकरण लक्ष देण्यासारखे आहे. जनरल प्रसाद यांचेदेखील मत असे होते की, सांगलेवर फार लक्ष केंद्रित करण्यात अर्थ

नाही. ते करताना लष्करीदृष्टचा महत्त्वाचे असे दुसरे एखादे ठिकाण गमवावे लागेल. त्यांचे कुणी ऐकले नाही. खुद्द जनरल कौल असे म्हणतात की, "राजकीय नेत्यांना आणि वरिष्ठ लष्करी अधिकारी जनरल थापर आणि जनरल सेन यांना मी खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, सांगले हे ठिकाण सोडून द्या. पण त्याचा काही उपयोग झाला नाही."

जनरल कौल फक्त कागदी घोडे नाचवीत होते. ता. १० ऑक्टोबरनंतर तर त्यांचे दर्शनच मला घेता आले नाही.

त्या वेळी मला ठाऊक नव्हते पण नंतर कळले की, ही 'उच्च पातळी' कोण? तर संरक्षण मंत्री व्ही. के. कृष्णमेनन! जनरल कौल असे म्हणतात की, ता. १७ ऑक्टोबरला मेननसाहेब मला म्हणाले की, सांगले हे ठिकाण भारत, भूतान आणि तिबेट यांच्या (?) तिठ्यावर येते (Tri-Junction). राजकीयदृष्टचा ते ठिकाण सोडता कामा नये.' याला म्हणतात लोकनियुक्त प्रतिनिधींचा सर्वोच्च अधिकार! नोव्हेंबर १९६७ मध्येदेखील श्री. व्ही. के. कृष्णमेनन उद्दामपणे असे म्हणाले की, 'अशा प्रकारचे निर्णय सरकारने नाही घ्यायचे तर मग कुणी घ्यायचे?'

लष्करी निर्णयांपेक्षा राजकीय निर्णय श्रेष्ठ ठरले आणि त्यांनी भारतीय सैन्याच्या पराभवाला हातभार लावला. चिन्यांची तयारी कशी जोरदार होत आहे याचे रिपोर्टस् दररोज संरक्षण मंत्री मेननना पाठविले जात होते आणि तरीदेखील त्यांच्या राजकीय निर्णयांपासून ते एक इंच मागे गेले नाहीत. काय परिणाम झाला त्याचा? आपले बरेचसे सैन्य नाम-काचूच्या परिसरात पाठविण्याऐवजी ते सांगले या कुचकामी ठिकाणी पाठविले गेले. लढाईसाठी कुठले ठिकाण निवडायचे, कुठे जमवाजमव करायची हे निदान आपल्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना तरी कळायला हवे होते. नाम-काचूच्या परिसरातल्या लष्करी अधिकाऱ्यांना तर असे वाटू लागले की, काही राजकीय आणि लष्करी वरिष्ठांची ही अपवित्र युती आणि राक्षसी बनाव आहे.

ता. २० ऑक्टोबरला ज्यांनी कळस गाठला अशा घडत असलेल्या घटना सांगण्यापूर्वी 'लंडन टाईम्स' या वृत्तपत्राचा वार्ताहर काय लिहितो ते पाहा. सेंग-जांग या ठिकाणी ता. १० ऑक्टोबरला चिन्यांशी झालेल्या चकमकीनंतर हा वार्ताहर लिहितो,

'भारतानं जी लढाई चालू केली आहे त्याची लष्करीदृष्टचा खरी व्याप्ती किती आहे याची जाणीव इथं (नव्या दिल्लीत) कुणालाच नाही आहे. ज्यांना परिस्थितीचं खरं ज्ञान हवं ती मंडळी अजून हलक्या फुलक्या भाषेत बोलत आहेत. त्यांची अशी समजूत आहे की फक्त तीन–चारशे चिन्यांनाच ताबडतोब हुसकून द्यायचं आहे. चिन्यांच्या संख्येत सतत वाढ होत गेल्याच्या अधिकृत संदेशांकडं दुर्लक्ष केलं जात आहे.'

एका परदेशी पत्रकाराला जे कळले ते भारत सरकारला कळत नव्हते यावर विश्वास तरी कसा ठेवायचा ?

ता. १५ ऑक्टोबरचा कोलंबो येथे पत्रकारांशी बोलताना नेहरू म्हणाले, 'चिनी सरकारचा असा बेत दिसतोय की आधी भारताची भूमी बळकवायची आणि मग वाटाघाटी सुरू करायच्या. आम्हांला हे साफ नामंजूर आहे. पुढं स्वस्तात सौदा पटविता यावा या हेतूनं अगोदरच चिन्यांना भारताची भूमी गिळंकृत करू द्यायला आता भारत तयार नाही !" आणि हे सगळे केव्हा बोलले नेहरू ? तर ता. ११ ऑक्टोबरला. नेफामध्ये काय परिस्थिती आहे याची माहिती त्यांना दिल्यानंतर ! असली स्वगत भाषणे कधी पत्रकारांपुढे करायची नसतात. पंडित नेहरूंनी हेच सगळे फक्त मंत्रीमंडळाला सांगायला हवे होते. म्हणजे चिन्यांविरुद्ध काय हालचाली करायच्या ते नीट ठरविता आले असते.

ता. १६ ऑक्टोबरला मला जनरल प्रसादांचा फोन् आला. मी फोनची वाटच बघत होतो. पण झाले भलतेच ! जनरल प्रसादनी मला बातमी दिली की, जनरल कौल त्यांच्या राजकीय वरिष्ठांची, आपण चिन्यांना हुसकून देण्यास असमर्थ आहोत अशी खात्री पटवू शकले नाहीत. संरक्षण मंत्री श्री. मेनन यांनी चिन्यांना हुसकून देण्याची ता. १ नोव्हेंबर ही अखेरची तारीख मुक्रर केली आहे. ते विचारताहेत की, चिन्यांना हुसकून देण्यासाठी काय काय लागेल ते सांगा ! हे ऐकून मला पक्ष-घाताचा झटका आल्याचा भास झाला. मी जेव्हा भानावर आलो तेव्हा मला राग आला. मनात म्हटले 'काय हे ? माझ्याजवळ कपडे नाहीत, अन्न नाही, दारूगोळा नाही आणि हे ठाऊक असून मेननसाहेब विचारताहेत की चिन्यांना हुसकून देण्यासाठी काय काय लागेल ते सांगा !' मी वैतागाने जनरल प्रसादना फोनवर म्हटले की, "मला एक डिव्हिजन शस्त्रसज्ज सैन्य आणि २०० तोफा पाठवून द्यायला सांगा !" जनरल प्रसाद माझ्याशी सहमत झाले की आपल्या संरक्षण मंत्र्यांच्या या दातृत्वाला लष्करीदृष्ट्या काहीच अर्थ नाही आहे. जनरल प्रसाद मला पुढे असेही म्हणाले की, "आपले दोघांचे विचार मी कोअर कमांडरला कळवीन." मला या कळवाकळवीचा आता कंटाळा आला होता. आघाडीवरच्या कमांडर्सचे विचार आता ४ थ्या वेळेला वरिष्ठांपुढे मांडले जाणार होते. मला कळेना की आमचे जर का ऐकायचेच नाही आहे तर मग आमच्याशी सल्लामसलत करतातच कशाला ? आघाडीवरच्या अधिकाऱ्यांच्या, जवानांच्या मनावर या वेळ-काढूपणाचा ताण पडला होता.

ता. १० सप्टेंबरलाच जनरल प्रसाद मला भेटण्यासाठी तावांगमध्ये आले होते. माझे कोअर कमांडर जनरल उमरावसिंग यांना कळवायचे त्यांनी कबूल केले होते. ता. २९ सप्टेंबरला जनरल उमराव लखनौला जाऊन आर्मी कमांडरपुढे हे विचार मांडणार होते. ता. १० ऑक्टोबरला जनरल कौल पंतप्रधान पं. नेहरूंना हेच सांगायला

गेले होते की, चिन्यांना हुसकून देणे केवळ अशक्य आहे आणि आता पुन्हा जनरल प्रसाद जनरल कौलमार्फत संरक्षणमंत्र्यांचे मन वळवायचा प्रयत्न करणार होते. मला असा प्रश्न पडला की या प्रातिनिधिक विचारांना प्रतिसाद देऊन योग्य तो लष्करी निर्णय घेणारी व्यक्ती आहे तरी कोण ? कोण कुणाचा हुकूम मोडतंय ? आर्मी कमांड करते तरी काय ? का आपले नुसतेच धावताहेत इकडून तिकडे पट्टेवाल्यांसारखे ! कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता.

मला बऱ्याच वेळा असे विचारण्यात येते की, परिस्थिती जर का अशी होती तर त्याच वेळी मी लष्करी नोकरीचा राजीनामा का दिला नाही ? मी राजीनामा दिला नाही याला अनेक कारणे आहेत. त्यांतले प्रमुख म्हणजे माझ्यापेक्षा वरिष्ठ असलेला प्रत्येक लष्करी अधिकारी माझ्या विचारांशी सहमत होता. मी चुकतोय असे त्यांच्यापैकी एकहीजण म्हणत नव्हता. राजकीय नेतृत्वाच्या मूर्खपणाचे भांडवल करून ब्रिगेडिअर्स जर का असे राजीनामे द्यायला लागले तर त्यांचे कर्तव्य कुणी पार पाडायचे ?

मी, ता. १७ ऑक्टोबरलाच जनरल प्रसादना कळवले की, ' राजकारणी लोकांचे हेतू काहीही असोत, माझी ब्रिगेड नाम-काचूपासून ताबडतोब मागे घ्यायला मला परवानगी द्या. त्या ब्रिगेडला इथून पुढे नुसते पोसता येणे अशक्य आहे. त्यावर जनरल प्रसाद पुन्हा मला म्हणाले, ' मी तुमचे विचार ४ थ्या कोअरच्या हेड क्वार्टरला कळवतो ! ' हेडक्वार्टरने माझ्या विनंतीचा विचार करण्याऐवजी मलाच एक नवा हुकूम दिला की, ' सांगले या ठिकाणाजवळ एक तळे आहे. ते कुठेसे आहे ते शोधून काढा आणि हिवाळ्यात त्यातल्या बर्फाचा थर किती इंचांचा असतो याचा साद्यंत अहवाल ताबडतोब पाठवून द्या ! ' का ? कारण उच्च पातळीवरून असा निर्णय घेण्यात आला होता की, पायदळ तुकडीची एक कंपनी सांगले या ठिकाणी असावी आणि हे जवान हेलिकॉप्टरने या तळ्यावर उतरविले जाणार होते. मला असे सांगण्यात आले की या कामात मी मुलकी अधिकाऱ्यांची मदत घ्यावी. मी रागाने टेलिफोन खाली आदळला आणि बंद करून टाकला. जाता जाता मी ओरडून सांगितले की नाम–काचूमध्ये ज्याच्याशी मी संपर्क साधू शकेन असा एकही मुलकी अधिकारी नाही. चिनी झुंडीने जमा होत असतानाच हे प्रकार घडत होते. आमच्या त्या बाबतीतल्या रिपोर्टसकडे दुर्लक्ष केले जात होते.

ता. १८ ऑक्टोबरला चिन्यांनी त्यांच्या तयारीवर अखेरचा हात फिरविला. त्यांचे सैन्य कसे विभागले जातेय आणि ते कशा जागा घेताहेत हे आम्ही पाहत होतो. ४ थ्या कोअरला वेडापिसा होऊन मी संदेश पोहोचविला की ' सावधान ! त्यांची तयारी झालेली आहे. बहुधा वाटचाल करून ते कुठल्याही दिवशी पहाटे भारतावर आक्रमक हल्ला करतील ! ' पण माझं ऐकतो कोण ? सगळेजण कानांवर हात ठेवून आणि डोळे बंद करून घेऊन सुन्न होऊन बसलेले.

ता. १८ ऑक्टोबरला रात्री कमांडिंग ऑफीसर (4 Grenadiers) कडून मला संदेश आला की तो आणि पूल क्रमांक एक जवळचे पंजाबी जवान यांच्यामधून चिन्यांची एक तुकडी आत घुसलेली आहे. आम्ही दोघांनी विचार केला की, काहीही करून त्यांचा परत जायचा रस्ता तोडला पाहिजे. त्यांना विचारले पाहिजे की, 'आमच्या हद्दीत का आलात ?' पण विचारायचे कसे ? मला चिनी भाषा येत नव्हती. कारण चिनी भाषेत बोलू शकणारा एकमेव दुभाष्या त्या वेळी दिल्लीत होता. दुर्दैवाने त्यांच्यापैकी कुणाला अटक करण्यापूर्वीच घनदाट जंगल आणि अंधार यांचा फायदा घेऊन हे घुसलेले चिनी निसटले आणि परत गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ६।। वाजता मला टेलिफोनवरून विचारण्यात आले की, 'भारतीय प्रदेशात चिन्यांना तुम्ही का घुसून दिलत याच एक्स्प्लनेशन द्या !'

ता. १८ ऑक्टोबरला संध्याकाळी लेफ्टनंट कर्नल के. के. तिवारी, ४ थ्या डिव्हिजनचे कमांडर सिग्नल्स मला भेटले. त्यांनी मला सांगितले की लवकरच ७ वी पायदळ तुकडी मागे घेतली जाईल. फक्त राजकीय कारणास्तव सांगले या ठिकाणी आपली एक कंपनी राहील. हे वेगळे सांगण्याची जरुरी नाही की असे कधी घडलेच नाही.

कर्नल तिवारी हा एक सभ्य आणि परमेश्वराला भिऊन काम करणारा सज्जन माणूस होता. कुठल्या अडचणींना तोंड देऊन ते काम करीत होते हे त्यांचे त्यांनाच ठाऊक ! त्यांच श्रेय त्यांना द्यायलाच पाहिजे. त्यांच्या कामाचे कौतुक होण्याऐवजी त्यांच्यावरच टीका केली गेली. ते काय जादू करू शकणार होते ? तशाही स्थितीत त्यांनी सिग्नल देण्याची व्यवस्था केली. एकदा मला असे सांगण्यात आले की, ब्रिगेड सिग्नल ऑफिसरला नोकरीवरून काढून टाक ! पण मी सांगितले की, नाही ! एकवेळ मी स्वतः राजीनामा देईन; पण त्याला काढणार नाही. तो जे



काम करतोय तेच त्याच्या ताकदीच्या बाहेरचं आहे! लक्ष्मणसिंग नावाचा तो तरुण सिग्नल ऑफिसर माझ्यामुळे वाचला. माझी अशी प्रामाणिक इच्छा आहे की या लक्ष्मणसिंगने हे पुस्तक वाचून एका कृतज्ञ ब्रिगेडिअरने त्याला दिलेले हे प्रशस्तिपत्रक वाचावे.

कर्नल तिवारी यांच्या व माझ्या भेटीचे परिणाम फार गभीर झाले. त्यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, १/९ गुरखाजच्या जवानांना जरा भेट देऊन येतो. ज्या वेळी गुरख्यांवर चिन्यांनी हल्ला केला तेव्हा त्या भाऊगर्दीत कर्नल तिवारी उगाचच सापडले. चिन्यांनी त्यांना युद्धकैदी म्हणून पकडून नेले. मला काय कल्पना की, उद्याच चिनी हल्ला करणार आहेत म्हणून? तशी कल्पना असती तर कर्नल तिवारींना मी मागे डिव्हिजनल हेड क्वार्टरमध्ये ठेवले असते.

अखेर ता. १९ ऑक्टोबर उजाडला! भारत सरकारचा इतक्या वर्षांचा भोळेपणा, निष्काळजीपणा आणि लोकनियुक्त प्रतिनिधींचा सर्वोच्च अधिकार यांबाबत झालेली गैरसमजूत याचे फळ आता लौकरच मिळणार होते. ७ वी पायदळ तुकडी आता अशा तऱ्हेने विखुरली गेली होती की ती चिन्यांच्या जबड्यातच शिरली होती. चिन्यांच्या प्रचंड तयारीचे वर पाठवलेले रिपोर्टस् कुणी वाचून त्यांची दखल घेत नव्हता.

ता. १९ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी जनरल प्रसाद यांचा मला फोन आला. त्यांनी मला फोनवरून हुकूम दिला की, १/९ गुरखाज या तुकडीतले उरलेले जवान सांगले या ठिकाणी पाठवून दे! या चुकीच्या हुकमाविरुद्ध मी निषेध नोंदविला. मी म्हटले, "जनरल प्रसाद, चिन्यांच्या तयारीचे रिपोर्टस् तुम्ही वाचलेले आहेत का? चिन्यांची सबंध एक बटालियन डम डम–ला या ठिकाणी आहे. शिवाय २००० चिनी सैनिक थाग-लामध्ये सांगले या ठिकाणासमोर जाताना दिसताहेत. चिन्यांनी ही हालचाल हल्ला करण्यासाठीच केली असली पाहिजे. कारण ता. १८ ऑक्टोबरलाच त्यांनी तिथली आपली ताकद अजमावून पाहायचा प्रयत्न केला. त्यात अनेक चिनी जखमी झालेत आणि म्हणूनच हे २००० चिनी सैनिक तिकडे त्यांनी पाठवलेत!"

मी जनरल प्रसादना असेही म्हटले की "आपले गुरखा जवान ज्या हालचाली करतील त्या चिनी समोरून सहज पाहू शकतील. लष्करी तयारी नसताना चिन्यांशी सामना देण्याचा प्रयत्न केला तर काय परिणाम होतात हे ता. १० ऑक्टोबरला सेंग-जाँग या ठिकाणच्या चकमकीत आपण शिकलो आहोत ना? चिन्यांनी हल्ला केला नाही तरीदेखील या जवानांना नुसते पोसणेदेखील मला अशक्य आहे!" आणि त्यावर जनरल प्रसादनी मला अजब उत्तर दिले की, "काहीही असो! अन्न आणि शस्त्रास्त्रांशिवायच हे जवान पुढे पाठवून दे!"

त्यानंतर मी विचार करू लागलो की, सांगलेकडे जातानाच या जवानांवर

चिन्यांनी हल्ला चढवला तर नामका–चू मध्ये लढणार कोण ? गेल्या वेळी आपले पंजाबी जवान चिन्यांनी कसे मारले ते मी डोळ्यांनी पाहिले होते. या जवानांची कत्तल मला होऊ द्यायची नव्हती. हा हुकूम 'ब्रिगेडिअर जे. पी. दळवींनी दिला !' असे उद्या लोकांनी म्हणायला नको. जबाबदारी माझ्यावर नको, म्हणून मी जनरल प्रसादना फोनवर म्हटले की. "गुरखा जवान पुढं पाठव असा मला लेखी हुकूम द्या !" मी ठरवूनच ठेवले होते की या बाबतीत गुन्हेगार कोण आहे याचा कागदोपत्री पुरावा जमा करून ठेवू या. या फोनवरून मिळणाऱ्या हुकमांचा मला वैताग आला होता. लेखी हुकूम कुणीच देत नव्हता. नुसत्या घोषणा आणि टेलिफोन्स. नामका–चू नदी ही आता अडचण राहिली नव्हती. चिनी कुठल्याही क्षणी ती ओलांडू शकले असते.

मी जनरल प्रसादना पुन्हा एकदा आठवण करून दिली की, परिस्थिती प्रतिकूल आहे. आपले सैन्य हजारो यार्डांवर विखुरले गेले .आहे आणि चिन्यांना हल्ला चढवायला अनेक जागा अक्षरशः मोकळ्या आहेत. गुरखा जवान सांगले या ठिकाणी पाठविण्यापेक्षा लुंपूपर्यंत मागे आलेले बरे. हे जवान सांगले या ठिकाणी गेले तर नामका–चूमधली आपली ताकद कमी होईल. चिनी योग्य वेळी आपल्याला पाचर मारतील आणि सांगधर या ठिकाणची आपली व्यवस्था नष्ट करून टाकतील. सांगधर या ठिकाणी असलेली शस्त्रास्त्रे आणि तिथली रसद टाकण्याची जागा यांचे संरक्षण करायला कुणी उतरणार आहे आकाशातून ?

त्यावर जनरल प्रसादनी मला एक गंभीर बातमी दिली की, "जनरल कौल आजारी पडलेत. त्यांची परिस्थिती चिंताजनक आहे आणि म्हणून त्यांना दिल्लीला हलविण्यात आले आहे. त्यांनी स्वतः दिलेल्या हुकमात कोअर हेड क्वार्टरपैकी कुणी बदल करू शकेल असे वाटत नाही !"

ता. १७–१८–१९ ऑक्टोबरला वरून काहीच हुकूम का आला नाही ? अजूनही गुरखा जवान 'पुढे पाठव' असा अट्टाहास का आहे ? त्याचे कारण मला आत्ता कळले !

चिनी कशा तऱ्हेने हल्ला चढवू शकतील या बाबतीतले माझे अंदाज मी जनरल प्रसादना कळविले. ते असे :–

१. ता. २० ऑक्टोबरला चिनी नक्कीच सांगले या ठिकाणचा त्यांचा पराभव घुऊन काढतील आणि सांगलेवर कबजा करतील.

२. पुढच्या दोन दिवसांत चिनी सांगधरपर्यंत धडक मारतील. असे झालेच तर माझी सबंध ब्रिगेड त्यांच्या पोतडीत जाईल.

३. आपले सैन्य आधीच कमी आहे, तशातच शस्त्रास्त्रे कमी आहेत. शिवाय आहे ते सैन्य विखुरलेले आहे. अशा परिस्थितीत चिनी आपल्याला सहज मागे रेटवून देऊ शकतील.

मी त्यांना संतापाने पुढे म्हटले की, "माझे जवान कसे मरताहेत ते पाहणं इथून पुढं मला असह्य आणि अशक्य आहे. कुणीतरी वरिष्ठ अधिकाऱ्याने आता खंबीर भूमिका घ्यायला पाहिजे."

माझा हा संताप पाहून जनरल प्रसाद मला म्हणाले, "तुझं म्हणणं मी डिव्हिजन हेड क्वार्टरला कळवतो. माझा पुन्हा फोन येईपर्यंत घाईगर्दीनं कुठलीही हालचाल करू नकोस. आणि आहे ती जागा सोडू नकोस. तुला मागं येण्याची परवानगी देणारा हुकूम देण्याची मलाच परवानगी नाही." माझा संताप कमी करण्यासाठी म्हणून की काय जनरल प्रसाद जाता जाता एवढे वाक्य बोलले की, "मात्र तिथली परिस्थिती आणि तुझ्या सूचना यांच्याशी व्यक्तिशः मी सहमत आहे!"

थोड्या वेळाने जनरल प्रसाद यांचा मला फोन आला. ते म्हणाले " B. G. S. ब्रिगेडिअर के. के. सिंग दिल्लीत असलेल्या जनरल कौलबरोबर संपर्क साधण्याचा प्रयत्न करताहेत. ब्रिगेडिअर जनरल स्टाफला मात्र असं वाटतंय की मागे येण्याचा हुकूम देण्याचा अधिकार त्यांना नाही." असे म्हणतात की पुढे B. G. S. असे म्हणाले की "काळजी करण्याचं कारण नाही. चिनी बहुतकरून हल्ला करणार नाहीत."

हे ऐकल्याबरोबर मी जनरल प्रसादना म्हटलं, "उद्याच्या उद्या मला एक हेलिकॉप्टर पाठवून द्या. इथं राहून सातव्या पायदळ तुकडीचं नेतृत्व करण्याची मला इच्छा नाही." त्या वेळी मी बोलू नयेत असे शब्द बोलून गेलो! ( I then used some un parliamentary language ) आणि जनरल प्रसादवर आरोप केला की तुम्ही जाणून बुजून जनरल कौलचा आजार माझ्यापासून लपवून ठेवलात. मला जर का त्यांचा हा आजार आधी कळला असता तर मला शंका आली असती की चिन्यांचा हल्ला तोंडावर आलेला असतानाच नेमके ते आजारी कसे काय झाले? गेल्या दोन-तीन दिवसांत आपण स्वस्थ का बसलो? आता माझा तुमच्यावर विश्वास नाही. कुणावरच नाही! एकीकडे माझे विचार पटतात असेही सर्व म्हणता आणि दुसरीकडे दिलेले शब्द मोडून माझ्या तुकडीला खाली मान घालायला लागेल असे हुकूम देता. ता. १० ऑक्टोबरनंतर मला एकही जनरल ऑफिसर भेटला नव्हता. सगळे दिल्लीत आणि तेझपूरमध्ये बसून चर्चा करीत होते. आघाडीवरचा कत्तलखाना पाहायला यायलादेखील कुणाला वेळ नव्हता.

मी इतके बोलल्यावर जनरल प्रसादना भरून आले. ते म्हणाले, "खरं आहे तुझं म्हणणं. मी स्वतः उद्या सकाळी तुला भेटतो. मला पण हे सगळं असह्य झालंय."

त्यांचे अवसान गळावे यात मला काहीच तथ्य वाटले नाही. २० तारखेला सकाळी सांगधर विमानतळावर भेटण्याची अॅपॉईंमेंट मी पक्की केली.

मी वर दिलेले विलक्षण संवाद मेजर बलराजसिंग निज्जर, कॅप्टन तलवार

आणि माझा स्टाफ यांच्यादेखत घडलेले आहेत. कधी कधी आपण काहीतरी बोलून जातो आणि नंतर आपल्यालाच त्याचे वाईट वाटते. मला नंतर दुःख झाले, विशाद वाटला आणि परिणामी थकवा आला. मी माझ्या तंबूत जाऊन झोपलो.

काय चुकले होते जनरल प्रसादांचे? त्यांची काहीच चूक नव्हती. आपण उगाच बोललो त्यांना. या लोकनियुक्त प्रतिनिधींनी सत्यानाश करून टाकला सगळा. या भारत सरकारला युद्धशास्त्राचे अत्युत्तम ज्ञान असलेले लष्करी अधिकारी नकोत. त्यांना फक्त भाडोत्री 'होयबा!' पाहिजेत.

मला जनरल प्रसादांबद्दल सहानुभूती वाटते. ता. ८ सप्टेंबर ते ता. २० ऑक्टोबर या कालखंडात त्यांना असह्य मनःस्ताप झाला. माझ्या जवानांनी काय हाल काढले ते त्यांना ठाऊक होते. ते स्वतः जनरल ऑफिसर होते पण त्यांचा सल्ला कुणी मागतच नव्हते. ते लोकनियुक्त प्रतिनिधींच्या जवळपास जाऊन तथाकथित नॅशनल पॉलिसीत बदल घडवून आणण्याइतके सिनियर नव्हते आणि आघाडीपासून मागे राहण्या-इतके ते ज्युनियर नव्हते.

घोर पराभवाची जबाबदारी जनरल प्रसादवर टाकली जाते. वस्तुतः तो त्यांच्यावर अन्याय आहे. कारण त्या वेळी जनरल प्रसादना स्वतंत्र निर्णय घेण्याची परवानगीच नव्हती. मी प्रामाणिकपणे आणि अंतःकरणापासून सांगतो की जनरल प्रसाद लष्करी अधिकारी या नात्याने कुठेही उणे पडत नव्हते.

मला वाईट फक्त याचेच वाटते की ता. १३ ऑक्टोबरनंतर नामका–चू मध्ये ठाण




मांडन बसण्याचा चुकीचा हुकूम मिळाल्यानंतरदेखील त्यांनी राजीनामा का दिला नाही? नाहीतर ता. १९ ऑक्टोबरलाच स्वतःच्या अंगावर जबाबदारी घेऊन त्यांनी योग्य ते हुकूम का दिले नाहीत? जनरल कौल आजारी असल्यामुळे तेच ह्या वेळी कोअर कमांडर म्हणून काम पाहत होते.

ता. १७–१८ ऑक्टोबरचा जनरल कौल यांचा अचानक आलेला आजार आणि ता. २९ ऑक्टोबरला त्यांना परत बोलवून घेऊन त्यांच्या हाती पुन्हा दिली गेलेली आघाडी सूत्रे या बाबतीत वादंग माजले होते. त्यांच्या या अचानक आजारीपणाबद्दल अनेकदा गैरवाजवी, अयोग्य आणि खोचक बोलले जाते. त्यांच्यावर भ्याडपणाचा आरोपदेखील केला जातो. त्यांच्या आजारीपणामुळे ता. १८-१९-२० ऑक्टोबर हे ३ दिवस ७ व्या पायदळ तुकडीला कुणाचेच नेतृत्व मिळू शकत नाही. त्यांच्या अनुपस्थितीत अधिकृत डेप्युटी कोअर कमांडर म्हणून कुणाचीच नेमणूक झाली नव्हती. सैन्यात राजकारणी रोगाच्या जंतूंचा फैलाव झाला होता. मी प्रथम हे कबूल करतो की कमांडर्स हे किती झाले तरी अखेर माणसेच असतात. माणूस म्हटला म्हणजे तो आजारी पडणे साहजिक आहे. आजारी पडलेले जनरल कौल यांनी जेव्हा तेझपूर सोडले तेव्हा त्यांचा भ्रमनिरास झाला होता. ते निराश झाले होते. त्यांची मनःस्थिती खिन्न झाली होती. काही लोक तर पुढच्या थराला जाऊन असे म्हणतात की, त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला होता. ज्या पद्धतीने जनरल कौलना आजारी म्हणून हलविण्यात आले आणि पुन्हा परत बोलाविण्यात आले ती पद्धत पाहून जनरल कौलचा पाणउतारा करण्याची इच्छा असलेल्या लोकांना त्यांच्याबद्दल बोलण्याची संधी मिळाली. "राजकीय कारणास्तव सांगले सोडू नका!" ह्या १७ ऑक्टोबरला मेननसाहेबांनी घेतलेल्या निर्णयात जनरल कौल बदल घडवून आणू शकले नाहीत. जनरल कौल नेफामध्ये परत आलेच नसते तर त्यांचे आजारीपण इतिहासजमा झाले असते. त्यांच्या अनुपस्थितीत पुढे पाकिस्तानबरोबर १९६५ मध्ये झालेल्या लढाईत वेस्टर्न कमांडचे नेतृत्व करणारे लेफ्टनंट जनरल हरबक्षसिंग हे उत्तम रीतीने जवानांचे नीतिधैर्य सांभाळीत होते. पण ता. २९ ऑक्टोबरला जनरल कौल परत आघाडीवर येताहेत हे कळल्यावर अनेकजण अनेक शंकाकुशंका आणि अंदाज व्यक्त करू लागले. पहिली अफवा अशी उठली की, जनरल कौलतर्फे पंडित नेहरू मध्ये पडले. भारतीय लष्कराला ठाऊक होते की अवघ्या ११ दिवसांत फुफ्फुसाला झालेला रोग बरा होत नसतो. प्रत्येकाने त्यांच्या या विश्रांतीशिवाय अचानक बऱ्या होण्याकडे संशयास्पद दृष्टीने पाहिले. त्या वेळी असेही म्हटले जात होते की, अगदी आघाडीवरून मागे हलविण्याइतके जनरल कौल आजारी नव्हतेच! बाकीचे म्हणत होते की, "नाहीतरी चिन्यांना नेफामध्ये जे काही करायचं होतं ते त्यांनी केलेलंच आहे हे पंडित नेहरूंना ठाऊक आहे. सध्या आघाडी शांत असली तरी जनरल कौलचं तेज थोडंसं कमीच झालं आहे. त्यांना पुन्हा एकदा सुस्थिती

प्राप्त करून देण्यासाठीच पंडित नेहरूंनी त्यांना परत बोलवून घेतलंय! कारण एकतर चिनी पुढं यण्याचा संभव नाही असं नेहरूंना वाटतंय आणि दुसरं म्हणजे तो पंडित नेहरूंचा लाडका जनरल आहे!" ६२ चे गुन्हेगार ( The guilty men of 1962 ) या पुस्तकाचे लेखक श्री. डी. आर. मंकीकर आपल्या पुस्तकात म्हणतात, "जनरल कौलचा चेहरा पुन्हा एकदा उजळावा म्हणून विकलांग अवस्थेत देशाचं संरक्षण पणाला लावून त्यांनाच आघाडीवर आणणं ही भारत सरकारची अक्षम्य घोडचूक होती. ज्याची तब्येत अजून ठीक नाही, ज्याच्या डोक्याला फार त्रास झालेला आहे, ज्याच्या शरीरात त्राण नाही तो आपला कोअर कमांडर होता. असं म्हणतात की, जनरल सेन यांचा या गोष्टीला सक्त विरोध होता; पण सेनापती जनरल थापर यांनी जनरल सेनना धुडकावून दिले. कारण उच्च पातळीवरून जनरल कौलला पुन्हा एकदा सुस्थिती प्राप्त करून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता!"

तावांग आणि थाग-ला रीजमध्ये झालेल्या पराभवामुळे जनरल कौलच्या नावाला काळीमा लागला आहे आणि ते निंदेस पात्र ठरलेत हे काही आता गुपित राहिलेले नाही. त्यांच्या नेतृत्वावर कुणाचाच विश्वास नव्हता. ता. २९ ऑक्टोबरला रेडिओ-जवळ गर्दी करून उभ्या असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांत एक होते मेजर जनरल ए. एस्. पठानिया. जनरल कौलना आघाडीची सूत्रे स्वीकारण्याइतपत बरं वाटतंय आणि ४ थ्या कोअरचा त्यांनी पुन्हा चार्ज घेतलाय ही बातमी एकून ते किंचाळले की "काय? तो पुन्हा परत आला? परमेश्वरा, आता तूच आम्हांला वाचव!" लष्करात ज्या वेळी अशा तऱ्हेने अविश्वास निर्माण झालेला असतो त्या वेळी परिणाम काहीही होवोत तो अविश्वास निर्माण होण्यास कारणीभूत असलेल्या कमांडरला डच्चू द्यावा लागतो. कमांडर इन चीफ, फील्ड मार्शल अचिन-लेक ( Auchinleck ) काय कमी पराक्रमी होता? प्रत्यक्ष जर्मनांनी "अचिनलेक सारखा फील्ड मार्शल उत्तर आफ्रिकेत नसता तर आमच्या रोमेलनी त्यांचा धुव्वाच उडवला असता!" या शब्दात त्याची स्तुती केलेली आहे. अशा माणसाला चर्चिलसाहेबांनी काढून टाकले. आणि लढाईची सूत्रे जनरल मॉंटेगोमेरीच्या हातात दिली. पुष्कळांना या बदलीचे वाईट वाटले. सर विन्स्टन चर्चिलचे पत्र घेऊन जाणारा सर आयन जाकब ( Sir Ian Jacob ) म्हणतो, "फील्ड मार्शल अचिनलेकला ते पत्र देत असताना मला तर असं वाटलं की एका विश्वासू मित्राचा मी खून करतोय!" का केला चर्चिलने हा बदल? एकतर अनेक ठिकाणी फील्ड-मार्शल अचिनलेकला माघार घ्यावी लागली होती. कैरोहून युद्धकाळातल्या संयुक्त सरकाराचे उपपंतप्रधान श्री. ॲटली यांना पाठवलेल्या पत्रात चर्चिल म्हणतात, "मला सांगायला खेद होतो की सध्या माझ्या लष्करात नेत्याबद्दल आत्मविश्वास राहिलेला नाही. हा बदल कदाचित लष्करात नवीन उत्साह निर्माण करू शकेल."

शिवाय ब्रिटिश जनता जागृत होती. ती ब्रिटिश सरकारला खडसावून विचारीत होती की "तुमचा विचार तरी काय आहे ? ही लढाई आपण नक्की जिंकू याचा पुरावा द्या !"

ब्रिटिश जनता आणि ब्रिटिश लष्कर यांचा विश्वास संपादन करण्यासाठीं चर्चिलने अचिनलेकवर थोडासा अन्याय करून त्याला काढून टाकले. कां ? कारण चर्चिलसाहेबांच्या मते कुणा एका व्यक्तीवर अन्याय झाला तरी चालेल पण लोकांचे आणि लष्कराचे नीतिधैर्य अगोदर सांभाळले पाहिजे.

युद्धशास्त्राचा चांगला अभ्यास केलेल्या एन. सी. चौधरी या एकमेव लेखकाने जनरल कौलचे समर्थन केले आहे. आपल्या लिखाणात एन्. सी. चौधरी म्हणतात –

(क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)

# राष्ट्रपतींची निवडणूक

[ पृष्ठ ९ वरून ]

मोजणीत गिरींना रेड्डींपेक्षा ८७,९६७ मते जास्त मिळाली होती. दुसऱ्या पसंतीच्या मताच्या मोजणीनंतर हे अंतर बरेच कमी झाले व गिरी रेड्डींपेक्षा फक्त १४,६५० मते अधिक पडून निवडून आले. जनसंघ व स्वतंत्र पक्षाने दुसऱ्या पसंतीचे मत रेड्डींना देण्याचे ठरविले होते. या दोन पक्षांच्या सभासदांची एकूण मते १,४४,२५५ होती. ही सर्व दुसऱ्या पसंतीची मते रेड्डींना मिळाली असती तर ते निश्चित निवडून आले असते. कारण निवडणूक जिंकण्यासाठी किमान ४,१८,११८ मते मिळणे जरूर होते व रेड्डींना दुसऱ्या पसंतीच्या मतांपैकी १,०४,५७० मतांची आवश्यकता होती. हा हिशेब चुकण्याचे कारण जनसंघाच्या काही सभासदांनी रेड्डींना पहिल्या पसंतीची मते दिली त्या प्रमाणात दुसऱ्या पसंतीच्या मतांची संख्या स्वाभाविकच कमी झाली व रेड्डी पराभूत झाले.

गिरींच्या विजयाचे व रेड्डींच्या पराजयाचे आणखी एक कारण म्हणजे भारतीय क्रांतिदलाचे धोरण. जनसंघ, स्वतंत्र पक्ष, भारतीय क्रांतिदल आघाडीने पहिल्या पसंतीची मते देशमुखांना द्यावयाचे ठरविले होते; पण दुसऱ्या पसंतीच्या मतांबाबत त्यांच्यांत एकवाक्यता नव्हती. जनसंघ व स्वतंत्र पक्षाने दुसरे मत रेड्डींना देण्याचे ठरविले तर भारतीय क्रांतिदलाने दुसरे मत गिरींना देण्याचा निर्णय घेतला. या पक्षाची एकूण मते २२,०६१ होती. अटीतटीच्या सामन्यात गिरींचे पारडे जड करून त्यांना विजय मिळवून देण्यास या मतांची बहुमोल मदत झाली. याशिवाय हरिजन, मुसलमान यांसारख्या अल्पसंख्य जमातींची मते गिरींना मोठ्या प्रमाणांत मिळाली.

राष्ट्रपती निवडणुकीतील गिरींचा विजय म्हणजे डाव्या व पुरोगामी शक्तींचा विजय आहे असे म्हटले जाते. पण ते पूर्णार्थाने खरे नाही. मुस्लीम लीग, अकाली दल यांसारख्या जातीयवादी पक्षांनी व द्रवीड मुन्नेत्र कळघमसारख्या प्रांतीयवादी पक्षांनी त्यांना पाठिंबा दिला. या पक्षांना समाजवादी व पुरोगामी कार्यक्रमाचे सोयरसुतक नाही.

## फूट तात्त्विक की वैयक्तिक ?

या निवडणुकीत काँग्रेसमध्ये पडलेली फूट तात्त्विक होती की वैयक्तिक होती ? फूट मूलतः वैयक्तिक होती. आपली पसंती डावलून पार्लमेंटरी बोर्डाने संजीव रेड्डींना बहुमताने उमेदवार निवडले ही पंतप्रधान श्रीमती गांधींना स्वतःची व स्वतःच्या पदाची मानहानी वाटली. यातून सिंडिकेटशी निर्माण झालेल्या वैयक्तिक संघर्षाला नंतर त्यांनी तात्त्विक व वैचारिक मुलामा दिला. मोरारजींकडून अर्थखाते काढून घणे, मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे ही पावले त्यांनी तडकाफडकी उचलून

क्षातीलच नव्हे, तर देशातील बहुसंख्य जनतेचा पाठिंबा आपल्या बाजूला मिळविला आणि सिंडिकेटवर मात केली. राष्ट्राध्यक्षपदी काँग्रेसने गिरींना उमेदवार निवडले असते तर या गोष्टी एवढ्या तातडीने झाल्या नसत्या. श्रीमती गांधींना पंतप्रधानपदावरून काढून जनसंघ व स्वतंत्र पक्षांच्या सहकार्याने संमिश्र सरकार स्थापन करण्याचा कट सिंडिकेटने केला असून त्याच दृष्टीने रेड्डींना पाठिंबा मिळविण्यासाठी जनसंघ व स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांशी निजलिंगप्पांनी बोलणी केली, असा आरोप पंतप्रधान गटाने केला. सिंडिकेटचे नेते हे पंतप्रधान कम्युनिस्टांच्या आहारी गेल्याचा आरोप करीत होते त्याला हे प्रत्युत्तर होते. पण पंतप्रधान गटाचा हा प्रचार प्रभावी ठरला. रेड्डींचा पराभव होण्याइतकी मोठी फूट पक्षात पडली.

पंतप्रधान व सिंडिकेट यांच्यांतील या संघर्षातून काँग्रेस पक्ष दुभंगण्याची वेळ आली होती. वर्किंग कमिटीच्या निर्णयाने ही फूट तात्पुरती तरी टळली आहे, पण आचार्य कृपलानींनी म्हटल्याप्रमाणे वर्किंग कमिटीचा ठराव म्हणजे ठिगळ आहे. ठिगळाने कपड्याचे आयुष्य थोडे वाढते पण काही दिवसांनी तो पुनः फाटतोच. पक्षात ऐक्य राखण्याचा ठराव झाला खरा पण दोन्ही गटांच्या नेत्यांची मने सांधली गेलेली नाहीत. पंतप्रधान गटाविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई न करण्याचा वर्किंग कमिटीचा निर्णय म्हणजे पंतप्रधानांचा विजय असेल तर निजलिंगप्पांवरील आरोप चुकीच्या समजुतीवर आधारलेले व न टिकणारे आहेत. हा वर्किंग कमिटीचा ठराव म्हणजे निजलिंगप्पांचा विजय म्हणावा लागेल. पण शिस्तभंग कारवाई रद्द झाली हा पंतप्रधान गटाने मिळविलेला विजय अधिक मोठा आहे. पक्षांतर्गत लढ्यात सध्या तरी इंदिरा गांधींची सरशी झाली असून सिंडिकेटला नमते घ्यावे लागले आहे. या वेळी शिस्तभंग कारवाईचा आग्रह धरल्यास आपण एकाकी पडू व बहुसंख्य सभासद इंदिरा गांधींच्या मागे



जातील. सबंध पक्षसंघटना व काँग्रेस मंत्रिमंडळेही त्यांच्या गटाच्या नियंत्रणाखाली जातील असे चिन्ह दिसू लागल्यामुळेच सिंडिकेटने नमते घेतले.

निवडणुकीत मतदारांनी पक्षाच्या आदेशानुसार मत द्यावे की सदसद्विवेक-बुद्धीचा कौल मानावा असा वाद या निवडणुकीत उपस्थित झाला. "मी कोणत्याही पक्षाचा उमेदवार नाही. तुमच्या सदसद्विवेकबुद्धिनुसार मला मत द्या," असा प्रचार गिरींनी केला होता, पण सदसद्विवेकबुद्धीची त्यांना आठवण झाली ती काँग्रेसने त्यांना उभे करण्याचे नाकारल्यावर. काँग्रेसने त्यांना उमेदवार निवडले असते तर सदसद्विवेकबुद्धीला आवाहन त्यांनी केले असते का? तसेच गिरी काँग्रेसचे उमेदवार असते तर मतस्वातंत्र्याची आणि सदसद्विवेक बुद्धीची आठवण इंदिरा गांधी गटालाही झाली नसती. निवडणुका राजकीय पक्ष लढवितात तेव्हा

## राष्ट्रपती निवडणूक कशी होते?

आपल्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीची पद्धत काहीशी गुंतागुंतीची आहे. निवडणुकीत संसद व विधानसभांच्या सभासदांना मतदानाचा हक्क असतो. पण त्यांच्या मताचे मूल्य लोकसंख्येच्या प्रमाणात ठरविण्यात आले आहे. राज्यांच्या लोकसंख्येस तेथील विधानसभेच्या लोकनियुक्त सभासदांच्या संख्येने भागून येणाऱ्या संख्येस पुन: एक हजारने भागल्यावर येणारा आकडा तो त्या राज्यांच्या विधानसभा सभासदांच्या मतांचे मूल्य. सर्व लोकनियुक्त विधानसभा सभासदांना असलेल्या एकूण मतांना पार्लमेंटच्या सर्व लोक-नियुक्त सभासदांच्या संख्येने भागून येणारा आकडा म्हणजे प्रत्येक पार्लमेंट सभासदास असलेली मते. प्रत्येक पार्लमेंट सभासदाच्या मतांचे मूल्य ५७६ आहे. राज्यवार विधानसभा आमदारांच्या मतांचे मूल्य पुढीलप्रमाणे आहे. आंध्र १२५, आसाम ९४, बिहार १४६, गुजराथ १२३, हरियाना ९४, काश्मीर ५९, केरळ १२७, मध्यप्रदेश १०९, तामिळनाडू १४४, महाराष्ट्र १४६, म्हैसूर १०९, नागालँड ७, ओरिसा १२५, पंजाब १०७, राजस्थान ११०, उत्तरप्रदेश १७४, पश्चिम बंगाल १२५.

निवडणूक क्रमदेय मतदान पद्धतीने होते. म्हणजे उमेदवारांच्या नावापुढे १, २, ३, ४, असे पसंतीचे आकडे मतदारांनी टाकावयाचे असतात. पहिल्या पसंतीच्या मतांच्या मोजणीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते कोणालाच न मिळाल्यास सर्वांत कमी मते असलेला उमेदवार बाद होऊन त्याची दुसऱ्या पसंतीची मते मोजून त्या त्या उमेदवारांच्या मतात समाविष्ट केली जातात, कोणाला तरी पन्नास टक्क्यांहून अधिक मते मिळेपर्यंत ही मोजणी चालते.

आपल्या पक्षाच्या सभासदांना त्यांनी आदेश द्यावेत हे स्वाभाविक आहे. मतदार राजकीय पक्ष निवडतात तेव्हा त्या पक्षाचा कार्यक्रम व भूमिका त्यांच्या सदसद्‌विवेकबुद्धीला पटते म्हणूनच त्याची निवड त्यांनी केलेली असते.

## अध्यक्षीय लोकशाही हवी

राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या निमित्ताने आपल्या घटनेतील राष्ट्रपतींचे स्थान व अधिकाराचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. संसदीय लोकशाहीत राष्ट्रपती किंवा राष्ट्राध्यक्ष केवळ घटनात्मक प्रमुख असतो. खरी सत्ता पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या हाती असते. राष्ट्रपतींनी पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसारच वागले पाहिजे, ही प्रथा आपल्याकडे घटना अमलात आल्यापासून गेली एकोणीस वर्षे पडली आहे. संसदीय लोकशाहीच्या यशासाठी दोन तुल्यबळ पक्ष आवश्यक असतात. आपल्याकडे काँग्रेसला तुल्यबळ पक्ष निर्माण होऊ शकला नाही व काँग्रेसही पूर्वीसारखा प्रबळ व एकजिनसी पक्ष राहिला नाही. त्यामुळे काही राज्यांत तर अस्थिरता निर्माण झालीच आहे; पण १९७२ च्या निवडणुकींत लोकसभेत काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळाले नाही तर केंद्रात तीच परिस्थिती निर्माण होण्याचा संभव आहे. संसदीय लोकशाही आपल्याकडे यशस्वी झालेली नाही, असाच याचा अर्थ आहे. कोणत्याही नेत्यास किंवा पक्षास आपला कार्यक्रम परिणामकारकपणे पार पाडावयाचा असेल तर स्थिर सरकार ही किमान आवश्यक गोष्ट आहे. अमेरिकेप्रमाणे अध्यक्षीय लोकशाहीचा स्वीकार आपण केल्यास हे साधेल. अमेरिकेत अध्यक्ष लोकांनी निवडलेला असतो, तो आपले मंत्रिमंडळ निवडतो. त्याचे अस्तित्व काँग्रेसवर (अमेरिकन पार्लमेंट) अवलंबून नसते. अध्यक्ष हुकमशहा बनू नये यासाठी त्याच्या धोरणावर काँग्रेसचे नियंत्रण असतेच. आजच्या परिस्थितीस अनुरूप असे योग्य ते बदल करून अध्यक्षीय लोकशाहीचा स्वीकार आपण केल्यानेच आपल्या लोकशाहीचे पाऊल पुढे पडेल. अशा लोकशाहीत राष्ट्रपती किंवा राष्ट्राध्यक्ष हा खरा सत्ताधारी असेल. सध्याप्रमाणे नामधारी प्रमुख असणार नाही. ◻ ◻ ◻


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

" आपके दोस्त क्यों चले गये ?"

" नहीं, वे किसी कामसे गये हैं. दस साडे दसतक लौटेंगे. " 'एक्शन'चा हेतू लपवीत राजगुरू उत्तरले.

" वह काम तो हमारी मार्फत भी हो सकता था। जाडोंके दिनोंमें बेकार इतनी बहमत मोल ली. "

" नहीं, वे एक खास काम से गये हैं. " – राजगुरू.

" उनकी कोई खास जगह होगी. वरना एक बार यहां आकर दूसरी जगह तो कोई जाता नहीं है. आप नहीं गये उनके साथ ?"

" मेरी तबीयत ठीक नहीं हैं. सरमें दर्द है " – काहीतरी सांगायचे म्हणून राजगुरूंनी सांगितले.

" तो आपके लिये यही इंतजाम किया जाय ?"

" किस बातका ?" राजगुरू गोंधळले.

" सर दर्द ठीक करनेका. मैं दो तीनको बुलाए देता हूँ. जबतक चाहें खिदमत ले सकते हैं। हाथ-पेर दबा देंगी, तबियत हल्की हो जाएगी. "

आता ह्या पुणेकर-बनारसी व्यायामशिक्षकाच्या डोक्यात लख्कन प्रकाश पडला की हे दोघेही दलाल आहेत. एकूण असा प्रकार आहे हे कळल्यावर लाजत लाजत राजगुरू पुटपुटले,

" नहीं नहीं, कोई जरूरत नहीं. "

हा इनकार म्हणजे इकरार समजून तो तरणा दलाल खसकला अन थोड्याच वेळात तीन मुलींना घेऊन खोलीत आला.

मुलींना पाहून राजगुरूंनी क्षणात कांबळे व झोळी उचलली अन् इतक्या जलदीने खोलीतून धूम ठोकली की त्या मुली खळखळून हसू लागल्या.


हा किस्सा ऐकून वर्मांना हसू फुटले अन् ह्या मासूम मुलाची टर उडविण्यासाठी वर्मा म्हणाले,

" तो इसमें इतना घवड़ाने और डरकर भागने की क्या बात थी. वे तुम्हें खा तो जाती नहीं. "

" नहीं भाई, वे तीन थी. पता नहीं, सब मिल कर मेरी क्या गत बना देती। मेरे तो दिलकी धडकन रुकी जा रही थी. " अत्यंत सरळपणे राजगुरूंनी कबुली दिली आणि मग आपल्या खास स्वभावानुसार म्हणाले,

" तुम्हें मेरी खुबसूरती की धाक तो माननी ही पडेगी, प्रभात. वरना एकसाथ तीन तीन लड़कियोंका आशिक हो जाना कोई मामुली बात नहीं. " असे म्हणून

# कॅमल शाई चांगलीच!
# कोणतीही घ्या




## कॅमल 'स्पेशल' शाई

माफक किमतीची, झरझर वाहणारी ही शाई नेहमीच्या वापरासाठी सर्वोत्तम. लवकर वाळते, पेनमध्ये कचरा साठू देत नाही. कॅमल 'स्पेशल' शाईमुळे लिहिताना पेन कधीही झटकावे लागत नाही. असा दर्जा व एवढी माफक किंमत —हेच कॅमल स्पेशल शाईचे वैशिष्ठ्य.




## कॅमल 'डीलक्स' शाई

ही आमची नवीन शाई. तुमचे पेन किंमती असेल तर त्याकरिता या शाईसारखी दुसरी शाई नाही. झरझर वाहते, लवकर वाळते, लिहिता लिहिताच तुमचे पेन साफ करते. पेनमध्ये कचरा साठू देत नाही. तुमच्या पेनचें संपूर्ण संरक्षण करते. कॅमल 'डीलक्स' शाई टेबलावर अभिमानाने ठेवा. असा शाईचा दर्जा— तसाच तिचा नूर आहे.

vision 000 mar

स्वतःच स्वतःची पाठ थोपटू लागले अन् इतके हसू लागले की वर्मांना वताग आला! कुठून ह्याची छेड काढली असे त्यांना झाले. कारण त्यानंतर दोनएक तास राजगुरू स्वतःच्या खुबसूरतीवर अन् विनोदावर हसत राहिले.

राजगुरू वर्षाकाठी आपल्या मातोश्रींना भेटण्यासाठी पुण्यात येऊन जाई. महान मातृभक्त! पण 'काय करतो' ह्याचे उत्तर इतकेच देई, "आई, तुझा एक मुलगा तुझी सेवा करीतच आहे. मी मोठ्या आईची सेवा करू इच्छितो तरी तू मला अडवू नकोस."

फरारी अवस्थेत ते नागपूरमार्गे पुण्यास येत असताना डॉ. हेडगेवार व इतर मंडळींनी त्यांना पुण्यात जाऊ नका म्हणून आग्रहाने सांगितले. पण मातृभेट करून येतो, असे सांगून राजगुरू रात्रीचे पुण्यात आले. त्या वेळीं मातोश्री लोखंडे तालमी-जवळ भटांच्या वाड्यात राहत होत्या. मध्यरात्री भेट घेऊन राजगुरू मित्राकडे झोपायला गेले. पेरूगेटापासून अनाथ विद्यार्थीगृहाकडे जाताना 'मंगलभुवन' ह्या वाड्यात त्या वेळी विद्यार्थी वसतीगृह होते. तेथेच राजगुरू थांबले अन् गाढ झोपेत पकडले गेले. पुणेकर राष्ट्रीय वीराला पुण्यातच अटक झाली. पोलिसला कोणी सुगावा दिला हे आजतरी निश्चित ठाऊक नसल्याने मी सबळ पुराव्याच्या अभावी नाव लिहू शकत नाही.

त्यांच्या पकडीची वरील माहिती त्यांच्या पुण्यात वास्तव्य करणाऱ्या एका बहिणीकडून मिळाली. एका पुस्तिकेत ते महाराष्ट्रीय मंडळाजवळच एका परटिणीच्या घरात सापडल्याचा उल्लेख आहे. पण ते कुठे पकडले गेले हा मुद्दा गौण असून पकडून देणारे कोण होते हे अचूक समजणे आवश्यक आहे.

राजगुरूंना लाहोर कोर्टात आणताच त्यांनी जोरजोरात 'इन्किलाब झिंदाबाद'च्या घोषणा दिल्या अन् प्रत्येक सहकाऱ्याला इतके कडकडून भेटले की जसे परदेशस्थ भाऊ भाऊ अनेक वर्षांनंतर एकमेकांना भेटत असावेत. "अपने आशिकको ढूंढने निकलें" ह्या ओळी गात गात न्यायालयात इतक्या आनंदाने वावरणाऱ्या त्या दिवाण्या देशभक्ताला पाहून राजनिष्ठ भारतीय चाकरवर्गाने माना खाली घातल्या असतील! राजगुरूंची फाशी तर अटळ होतीच; पण ते आल्याने इतर सर्व क्रांतिकारकांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वारे शिरले. राजगुरूंच्या आगमनापूर्वी ह्या वीरांनी राजकैद्यांची वागणूक आम्हांस मिळावी ह्यासाठी कठोर उपोषण केले होते. आता पुन्हा त्यांनी उपोषणास सुरुवात केली. राजगुरू अर्थातच पुढाकार घेत होते. रोज डॉक्टर १०-१२ पहिलवान कैद्यांना घेऊन रबरी नळीने दूध पाजण्यासाठी त्यांच्या खोलीत आले की कमीत कमी अर्धा तास तरी राजगुरू लाथाबुक्या झाडीत, मारहाण करीत. उपोषणाने ताकद कमी झालेली, त्यामुळे एकाच वेळी दहा दादांशी सामना करून ते पार थकून जात. मग डॉक्टर तोंडात नळी खुपसून दूध पाजीत. एके दिवशी दोघा डॉक्टरांनीच घाईघाईत नळी खुपसली ती पोटाऐवजी बाजूच्या आतड्यात शिरली व शेरभर दूध त्यातच




ओतले गेले. राजगुरू मरणप्राय अवस्थेत तळमळत होते पण तोंडातून चकार शब्द त्यांनी काढला नाही. २-३ दिवसांत त्यांची प्रकृती ढासळली व ते फासावर चढण्यापूर्वीच खतम होतात की काय ही भीती सरकारला वाटू लागली. तशातही भगतसिंगाला ते हसून म्हणाले,

"मेरे पहले पकडे गये और मुझे यहीं छोडके 'उपर' जाने का इरादा कर रहे थे. मगर मैं ऐसी हार माननेवाला नहीं हूँ." राजगुरूंच्या प्रकृतीने चिंताग्रस्त असणाऱ्या क्रांतिकारकांना हे शब्द ऐकून एकाच वेळी उफाळलेले आसू अन् हसू आवरता येईना!

त्या आजारातून ते बरे झाले पण एकाएकी अबोल बनले. सहकारीवर्ग काळजी करू लागले की, हा वडबड्या रघुनाथ एकाएकी अबोल कसा झाला? ज्या दिवशी खटल्याचा निकाल लागला व त्यांची फाशीची शिक्षा शिक्कामोर्तब झाली त्या दिवशी त्यांचे मौन सुटले व ते अत्यंत आनंदी मूडमध्ये वावरू लागले.

आजारातून मरण टळल्यावर त्यांना हेच दुःख होते की फाशीची शिक्षा जर चुकून 'काळ्यापाण्या'वर गेली तर आपण देशप्रीतीच्या परीक्षेत नापास झालेले ठरू!

पण नाही! राजगुरू, तुम्ही बलिदानाच्या कसोटीला पुरेपूर उतरलात! ज्या २३ मार्च १९३१ च्या संध्याकाळी भगत व सुखदेवला प्रेमभराने आलिंगन देऊन तुम्ही फासाच्या चौथऱ्यावर चढलात तो तुमच्यासाठी सर्वोच्च आनंदाचा क्षण ठरला व आम्हा स्वतंत्र भारतीयांसाठी अक्षय प्रेरणेचा क्षण ठरला व ठरत राहणार आहे.

तुमचे साथीदार तुम्हांला 'शहादतके बेताब आशिक' म्हणत असत. फासाच्या झोपाळ्यावर बसण्याचा तुमचा हट्ट आमच्या मायबाप सरकारने शेवटी पुरवलाच. कुठलाही पक्षी, प्राणी स्वतंत्र राहावे यासाठी धडपडत असतो. पण तुम्ही शिकाऱ्याच्या हाती मरण्यातच मौज बाळगणारे, हौतात्म्याचे पंख लावलेले होतात.

तुमचे यथार्थ वर्णन ह्याच 'शेर'मध्ये होऊ शकते,

"यों तो ऐ सैयाद, आज़ादी के हैं लाखो मजे।
दामनके नीचे तडपनेका मजा कुछ और है।"

□ □ □

...मुखपृष्ठ २ वरून

साहाय्य मिळवावे, मासिके-पुस्तके यांच्या द्वारा माहिती जमा करावी – अशी सर्वसाधारणपणे त्यांची या नव्या संस्थेविषयीची कल्पना होती.

मी निघण्याच्या विचारात होतो. एवढ्यात एक काँग्रेस कार्यकर्ते आले. रावसाहेबांशी त्यांचे खूपच घनिष्ट संबंध होते. आल्याआल्याच रावसाहेब त्यांना थट्टेने म्हणाले : अरे ! आम्हाला वाटलं काही पेढेबिढे घेऊन याल आमच्यासाठी ! तडजोड होणार नं आतां ?

आणि मग गप्पांचा ओघ दिल्लीकडे वळला. आदल्या दिवशी टाईम्समध्ये कुठल्यातरी Group of young business executives च्या वतीने 'इंदिरा गांधींना पाठिंबा द्या' अशा मजकुराची एक प्रचंड जाहिरात प्रसिद्ध झालेली होती. या प्रचारयुद्धाची रावसाहेब रेवडी उडवीत होते. या गप्पातले रावसाहेबांचे एक वाक्य आठवते ते असे : अरे ! रस्त्यावर मारामाऱ्या – शिवीगाळ करावी तसे भांडता ! काही dignity – काही लाजलज्जा !

रावसाहेब व्यथित होते – निदान या वेळी तरी – असे मला आढळले नाही. जे घडत होते त्यापासून ते खूप खूप दूर उभे होते. हर्षामर्ष संपले होते. उबग येण्याची अवस्थाही उलटली होती. कुतुबमिनारातून दिल्लीकडे आणि देशातील एकूण राजकीय घडामोडींकडे पाहावे तसे त्यांचे पाहणे होते.

या मिनारावर मात्र त्यांच्या एका हातात पुस्तक होते, एका हातात सुंदर गुलाबाची फुले होती.


माणसांची त्यांना ओढ होती. यासाठी पुष्कळदा ते खाली उतरत. आपल्याबरोबर केव्हा केव्हा काहींना वर घेऊन जात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांना याशिवाय दुसरा पर्यायच उरला नव्हता.
त्यांचा सत्याग्रही राजकारणावर पोसलेला पिंड लोकशाही व्यवहाराशी कसा समरस होऊ शकला असता ?

फारच थोड्या नेत्यांना वीस वर्षांपूर्वी हे उमगले. रावसाहेब अशा फार थोड्यांपैकी एक होते.

त्यांच्या ठायी असलेल्या या अभिजात विवेकबुद्धीला माझे वंदन आहे.

– श्री. ग. माजगावकर



" ठीक ! ठीक ! पक्षाच्या ऐक्यासाठी शिस्तीचा नाद आपण सोडून देऊ या. पण ह्या वेळेपुरतेच हं ! इत:पर मात्र शिस्तभंगाला क्षमा होणार नाही – सांगून ठेवतो ! ! "

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर